



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शुक्रवार ११ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


## वांगचुक पुन्हा एकदा आंदोलनाच्या तयारीत

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा आणि संविधानाच्या सहाव्या अनुसूचीअंतर्गत घटनात्मक संरक्षण देण्याच्या मागणीवरू न केंद्र सरकार आणि लडाखच्या प्रतिनिधींमध्ये नवी दिल्लीत ९ सप्टेंबरला झालेली बैठक निष्फळ ठरली. या बैठकीत ठोस काहीच निष्पन्न न झाल्याने पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी केंद्र सरकारवर तीव्र नाराजी व्यक्त केली. दिवंगत कॉमेडियन आणि अभिनेते जसपाल भट्टी यांच्या फ्लाप शो या मालिकेतील एक व्हिडीओ क्लीप शेअर करत त्यांनी सरकारला टोला लगावला. सरकारी बैठकांचे फलित फक्त पुढच्या बैठकीची तारीख ठरवणे एवढेच असते, अशी टीका वांगचुक यांनी यामाध्यमातून केली.

# ऐन पोळ्याच्या दिवशी शेतक-याची आत्महत्या




## दुष्काळामुळे गावात पोळा भरलाच नाही!
## यवतमाळ जिल्ह्यात अस्वस्थ करणारे चित्र

**यवतमाळ/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात सर्वत्र पोळा हा बळीराजाचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत असताना, पश्चिम विदर्भातून मात्र शेतक-यांच्या भीषण दुरवस्थेची आणि अस्वस्थ करणारी चित्रे समोर आली आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील करणवाडी (ता. मारेगाव) येथे आज गुरु वारी पोळ्याच्याच दिवशी एका तरु ण शेतक-याने आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केली, तर शेतीवरील संकट आणि दुष्काळी परिस्थितीमुळे केळापूर तालुक्यातील उमरी गावात शेतक-यांनी यंदा पोळा सण साजरा न करण्याचा अत्यंत वेदनादायी निर्णय घेतला.

करणवाडी येथील प्रणित नेहारे या युवा शेतक-याने सततची नापिकी आणि कर्जाच्या वाढत्या ओझ्याला कंटाळून आपले जीवन संपवले. निसर्गाची अवकृपा आणि उसनवारीने घेतलेल्या कर्जाचा डोंगर यामुळे हा तरु ण शेतकरी प्रचंड तणावाखाली होता. ऐन सणाच्या दिवशीच घडलेल्या या घटनेमुळे करणवाडी गावावर शोककळा पसरली आहे. विदर्भ जनआंदोलन समितीचे नेते किशारे तिवारी यांनी मृताच्या कुटुंबियाची भेट घेवून, शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणांवर जोरदार टीका केली. यावेळी प्रणित यांच्या कुटुंबियांनी केलेला आक्रोश मन हेलावून टाकणारा होता.

**१९७२ पेक्षाही गंभीर परिस्थिती; उमरीत पोळाच नाही**-दुसरीकडे, जिल्ह्यातील केळापूर तालुक्यातील उमरी या गावात यावर्षी भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. स्थानिक शेतक-यांच्या मते, १९७२ च्या ऐतिहासिक दुष्काळानंतर यंदा प्रथमच अशी परिस्थिती पाहायला मिळत आहे. ऐन पिकांच्या वाढीच्या आणि फुलो-याच्या काळात पावसाने दीर्घ दडी मारल्यामुळे उभी पिके करपून गेली आहेत. दुबार-तिबार पेरणीचा खर्च, बियाणे, खते आणि मजुरीचा खर्च वाया गेल्याने शेतक-यांची आर्थिक स्थिती पूर्णपणे कोलमडली आहे. या गंभीर संकटामुळे सर्जा-राजाची पूजा करण्याची आणि सण साजरा करण्याची मानसिकता उरली नसल्याने गावक-यांनी पोळ्यावर बहिष्कार टाकल्याचे गावकरी रमेश चव्हाण, प्रशांत बोंडे आणि आकाश राठोड यांनी सांगितले.

### ग्रामीण अर्थव्यवस्था धोक्यात

**विदर्भात यंदा दुबार आणि तिबार पेरणी करूनही पावसाच्या खंडाने पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. कापूस, सोयाबीन आणि तूर ही प्रमुख पिके हातातून गेल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. पिके करपल्याने केवळ शेतक-यांचाच नव्हे, तर शेतमजूर आणि ग्रामीण भागातील व्यापारी, कृषी सेवा केंद्रांवरही याचा विपरीत परिणाम झाला असून संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थाच धोक्यात आली आहे.**

**तातडीने दुष्काळ जाहीर करण्याची मागणी**

या भीषण पार्श्वभूमीवर विदर्भ जनआंदोलन समितीचे नेते किशोर तिवारी यांच्यासह स्थानिक शेतकरी प्रतिनिधींनी प्रशासनाकडे युद्धपातळीवर पंचनामे करण्याची मागणी केली आहे. प्रभावित भागात कोरडा दुष्काळ जाहीर करू न शेतक-यांना तातडीने आर्थिक मदत, पीककर्जाचे पुनर्गठन, पीकविम्याची रक्कम आणि शेतमजुरांसाठी रोहयोची कामे सुरू करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. शासनाने प्रशासकीय निकषांच्या जाचात न अडकवता पीडित शेतकरी कुटुंबांना तातडीने आधार द्यावा, अशी आग्रही मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## एमपीएससी पेपरफुटी प्रकरणाची एसआयटी चौकशी

# सन 2025 च्या मुख्य परिक्षेतील प्रश्नपत्रिकांची फेरतपासणी

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मोठा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य लोकसेवा आयोगाच्या गट ब आणि गट क मुख्य आणि पूर्व परीक्षा २०२५ ची विशेष तपास पथकाच्या( एसआयटी) माध्यमातून चौकशी करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरु वारी केली. त्याचप्रमाणे सन२०२५च्या मुख्य परिक्षेतील प्रश्नपत्रिकांची फेरतपासणी करण्याची आणि तोवर मुलाखतींचा कार्यक्रम स्थगित करण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर आपल्या मागण्या मान्य झाल्याचे उमेदवारांनी स्पष्ट केले. राज्य लोकसवा आयोगाकडून गेल्या दोन वर्षात घेण्यात आलेल्या विविध पदभरतीच्या परिक्षांचे पेपर फुटल्यावरु न आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी राज्यभरातील उमेदवारांनी आंदोलन सुरु केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज एमपीएससीच्या राज्यभरातून आलेल्या उमेदवारांच्या प्रतिनिधींची भेट घेउन त्यांच्याशी विविध मागण्यांवर चर्चा केली. त्यांच्या सर्व मागण्या ऐकून घेतल्यानंतर फडणवीस यांनी त्यांच्याशी संवाद साधत सर्व मागण्या मान्य केल्या. राज्यात घडलेल्या पेपरफुटीच्या घटना आणि त्यानंतर विद्यार्थ्यांच्या भावनांचा झालेला उद्रेक याच्याशी आपणही सहमत असल्याचे प्रारंभीच स्पष्ट करीत मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मान्य करण्याची घोषणा केली. या घटनांमुळे आयोगाच्या कारभारात सुधारणा करण्याची संधी मिळाली असून या सुधारणांसदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या अप्पर मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात





आली आहे. या समितीच्या अहवालानंतर आयोगाच्या कारभारात आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली.आयोगाकडून घेण्यात आलेल्या ग्रुप बी आणि ग्रुप सीच्या २०२५ची मुख्य परिक्षेसह मागील दोन-तीन वर्षांत लेंडवे, मराठे, नखाते यांच्या काळात झालेल्या सर्व परीक्षांची चौकशी एसआयटीमार्फत केली जाईल. परीक्षेतील घोटाळ्यांबाबत तक्रारी करण्यासाठी एक कक्ष निर्माण केला जाईल. त्यातील ज्या तक्रारींमध्ये प्राथमिकदृष्ट्या काही अडचण किंवा गैरप्रकार आढळले, त्या एसआयटीकडे पाठवून त्याची सखोल चौकशी करण्याची व्यवस्था करण्यात येईल. येत्या आठ दिवसात एसआयटी स्थापन करुन चौकशी केली जाईल. तसेच सन २०२५च्या मुख्य परिक्षेतील उत्तरपत्रिकांच्या फेरतपासणीची (रीचेकिंग) मागणीही मान्य करताना फेरतपासणी होईपर्यंत मुलाखतींचा कार्यक्रम स्थगित करण्याची सूचना आयोगाला दिली जाईल. तसेच विद्यार्थ्यांना माहिती अधिकार कायद्याच्या माध्यमातून (पान २ वर)

# ‘एफडीए’ पेपरफुटीत 40 कोटींची उलाढाल

## मुख्यमंत्री फडणवीस आणि एमपीएससी अध्यक्ष भीमनवार यांची मैत्री


**पुणे/प्रतिनिधी :** भ्रष्टाचाराचे आरोप असतानाही विवेक भीमनवार यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे भीमनवारांबाबतची सर्व कागदपत्रे आहेत, हवी असल्यास पुन्हा देउ शकतो. मात्र, या बाबत कारवाई न केल्यास मुख्यमंत्री भीमनवारांना पाठीशी घालत आहेत असेच म्हणावे लागेल. अन्न आणि औषध प्रशासन पेपरफुटी प्रकरणात ४० कोटींची उलाढाल झाल्याची शक्यता आहे, असा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला. नैतिकता दाखवून भीमनवारांनी राजीनामा देण्याची मागणी त्यांनी केली. पुण्यातील पत्रकार भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत यांनी एमपीएससीच्या पेपरफुटी प्रकरणापासून, अध्यक्ष भीमनवार




परिवहन आयुक्त असतानाच्या कार्यकाळातील एचएसआरपी नंबरप्लेट घोटाळा, बदल्या आणि प्रमोशन, आयटीएमएस, इंटरसेप्टर, जीपीआरएस किट अशा विविध प्रकरणात भ्रष्टाचाराचे आरोप सादरीकरणाद्वारे केले. पवार म्हणाले, अन्न आणि औषध प्रशासन पेपरफुटीप्रकरणी पाठपुरावा केला. २७ जुलै रोजी सचिवांनी पेपरफुटीचे आरोप फेटाळले होते. एका व्यक्तीपर्यंत नाही, तर शेकडो लोकांपर्यंत पेपर पोहोचला. या प्रकरणी ४० कोटींची उलाढाल झाल्याची शक्यता आहे. भीमनवार परिवहन विभागाचे आयुक्त असताना भ्रष्टाचाराची प्रकरणे झाली. आरटीओमध्ये रॅकेट असल्याची कबुली मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधीमंडळात दिली होती. एमपीएससीच्या अध्यक्षपदी त्यांच्या नेमणुकीलाही विरोध (पान २ वर)

## परीक्षेच्या ताणापायी राज्यात 7 महिन्यांत 601 आत्महत्या

**पुणे :** गुण किती मिळाले? या एका प्रश्नाभोवती विद्यार्थ्यांचे भविष्य, पालकांच्या अपेक्षा आणि करिअरची चिंता गुरफटत चालली आहे. पुण्यासारख्या शिक्षणनगरीत तरु ण आणि विद्यार्थ्यांशी संबंधित आत्महत्यांच्या घटनांनी ही गंभीर बाब पुन्हा ऐरणीवर आणली आहे. परीक्षा, प्रवेश, करिअरची स्पर्धा, कौटुंबिक प्रश्न, मानसिक अस्वस्थता आणि सामाजिक दबाव अशा अनेक घटकांचा ताण तरु णांच्या मानसिक आरोग्यावर पडत आहे. पुणे पोलिसांच्या



आकडेवारीनुसार शहरात २०२३ मध्ये गुन्हे दाखल असलेल्या व अकस्मात मृत्यू म्हणून नोंद असलेल्या १,००४ आत्महतेच्या घटनांची नोंद आहे. २०२४ मध्ये ९७८, २०२५ मध्ये १०६७ घटनांची नोंदविल्या गेल्या आहेत. जानेवारी ते जूलै २०२६ या सात महिन्यांत शहरात ६०१ आत्महत्यांची नोंद झाली. त्यात ४२३ पुरु ष आणि ११८ महिलांचा समावेश आहे. बुधवारी (दि. ९) एकाच दिवशी दोन विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या वेगवेगळ्या घटना समोर आल्याने तरु ण आणि विद्यार्थ्यांशी संबंधित घटनांनी चिंता वाढवली आहे. शहरात स्पर्धा परीक्षेची तयारी करणा-या धाराशिवच्या २९ वर्षीय तरु णाने आत्महत्या केल्याची धक्कदायक घटना बुधवारी (दि. ९) समोर आली.प्रथमेश देशमुख असे त्याचे नाव आहे. स्पर्धा परीक्षेतील वारंवार अपयश, आर्थिक अडचणी, शेतीचे नुकसान आणि कर्जाचा वाढता ताणामुळे मानसिक तणावात त्याने टोकाचे पाउल उचल्याचे प्रथमदर्शनी निर्दशनास आले आहे.

## सुस्साट ट्रक आणि व्हॅनचा भीषण अपघात, 5 जण जागीच ठार

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेडमध्ये एक ट्रक आणि टाटा मॅजिक व्हॅनचा भीषण अपघात झाला. या अपघातात पाच प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला आहे. आठ जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर शासकीय रु ग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघातातील मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्तकेली जात आहे. माहितीनुसार, नांदेड-भोकर रोडवर ट्रक आणि प्रवासी व्हॅनचा समोरासमोर धडक होउन अपघात झाला. ट्रकने व्हॅनला जोरात धडक दिली. यात व्हॅनचा चक्काचूर झाला आणि व्हॅन रस्त्यावरू न बाजूला फेकली गेली. सायंकाळी वाकद गावाजवळील सीताखंडी इथे ही घटना घडली. हा अपघात इतका भीषण होता की ट्रकचा समोरील भागाचा चुराडा झाला होता. ट्रक चालक त्यात अडकला होता. त्याला बाहेर काढण्याचे प्रयत्न उशिरापर्यंत सुरू होते. या अपघातात व्हॅनमधील पाच जणांचा जागेवरच मृत्यू झाला. ८ प्रवासी जखमी झाले असून, त्यांना तातडीने भोकर आणि नांदेड येथील रु ग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. व्हॅनमधील मयत स्थानिक असल्याने घटनास्थळी त्यांचा आक्रोश सुरू होता.



## ‘80s ट्रेंड’च्या नादात गोपनीयता धोक्यात?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**सोशल मीडियावर सध्या जुन्या आठवणींना उजाळा देणारा आणि युझर्सना १९८०च्या दशकातील विंटेज लूकमध्ये दाखवणारा ‘80s ट्रेंड लोकप्रिय ठरत आहे. सर्वसामान्य नागरिकांपासून ते नामांकित व्यक्तींपर्यंत सर्वच जण आपले फोटो वेगवेगळ्या ॲप्सच्या माध्यमातून एडिट करू न सोशल मीडियावरु न पोस्ट करत आहेत. पण, या ट्रेंडच्या मोहात पडून आपले आणि कुटुंबीयांचे वैयक्तिक फोटो अनोळखी थर्ड-पार्टी ॲप्सवर अपलोड करणे धोकादायक ठरू शकते, असा इशारा सायबर तज्ज्ञ अड. चैतन्य भंडारी यांनी दिला आहे.

**कौटुंबिक फोटो अपलोड करण्यापूर्वी सावध राहण्याचा सायबर तज्ज्ञांचा इशारा**

## आयआयटी, आयआयएमचे पेपर फुटत नाहीत, मग एमपीएससीचेच का?-खा.सुळे

**पुणे/प्रतिनिधी :** देशात आणि राज्यात एमपीएससी आणि यूपीएससीच्या विद्यार्थ्यांचे प्रश्न अतिशय गंभीर बनले आहेत. मराठा, ओबीसी आणि आदिवासी समाजाची मुले आंदोलने करत आहेत. राज्यात वाढती महागाई, बेरोजगारी, प्रचंड भ्रष्टाचार आणि दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या की, देशात आयआयटी आणि आयआयएमच्या परीक्षा होतात, तिथले पेपर का फुटत नाहीत? मग आपल्या एमपीएससी परीक्षांमध्येच हे घोटाळे का होतात? पेपर फुटण्यामागचे कारण काय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रातील शेतकरी जर एआय तंत्रज्ञानाचा वापर करू शकत असेल, तर परीक्षा यंत्रणेत या तंत्रज्ञानाचा वापर का केला जात नाही? असा प्रश्नही त्यांनी विचारला.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, संजय राउत हे देशाचे मोठे नेते आहेत. अजित पवारांच्या मृत्यूबद्दल त्यांचे जे काही म्हणणे असेल ते



त्यांचे वैयक्तिक मत आहे; परंतु मी आता या विषयावर काहीही बोलणार नाही. तुम्हाला याबद्दल काही विचारायचे असेल, तर थेट सरकारला विचारा, कारण सर्व यंत्रणा सरकार चालवत आहे. मी या विषयावर बोललेले लोकांना आवडत नाही. कोणाच्याही भावनांचा अनादर करण्याचा माझा हेतू नव्हता, मी अत्यंत पोटतिडकीने आणि अंतकरणापासून बोलले होते. पण ते लोकांना आवडले नसेल, तर मी पुन्हा त्यावर बोलणार नाही; त्यामुळे तुम्ही सत्ताधा-यांनाच हे प्रश्न विचारले पाहिजेत. तसेच पार्थ पवार प्रकरणाबाबत थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारला पाहिजे. ते गृहमंत्रीसुद्धा असल्याने या दोन्ही प्रश्नांची योग्य उत्तरे तेच देउ शकतील.

**शेतक-यांच्या आत्महत्या समर्थनीय नाहीत**

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, महाराष्ट्रात आमच्या सत्ताकाळातही शेतक-यांनी आत्महत्या केल्या होत्या; परंतु त्यानंतर शरद पवार यांनी ऐतिहासिक शेतकरी कर्जमाफी केली होती. सध्या राज्यातील परिस्थिती अत्यंत गंभीर असून शेतक-यांच्या आत्महत्या कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाहीत.

## भारताकडे पाकपेक्षा अधिक अण्वस्त्रे

### लवकरच ब्रिटनलाही मागे टाकण्याची शक्यता

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताच्या अण्वस्त्र साठ्यात सातत्याने वाढ होत असून सध्या भारताकडे सुमारे १९० अण्वस्त्रे असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हा साठा पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानपेक्षा २० ने अधिक असून, भारत लवकरच ब्रिटनलाही मागे टाकण्याची शक्यता आहे. अमेरिकेतील नामांकित संशोधन संस्था फेडरेशन ऑफ अमेरिकन सायंटिस्ट्सने (एफएएस) आपल्या ताज्या अहवालात ही माहिती दिली आहे. पीटीआय वृत्तसंस्थेने याबाबतचे वृत्त दिले आहे.

एफएएस न्यूक्लियर इन्फार्मेशन प्रोजेक्टचे संचालक हॅन्स क्रिस्टेनसेन यांनी भारताची अण्वस्त्रे २०२६ या शीर्षकाखाली हा अभ्यास अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार, भारताकडे सध्या अण्वस्त्र डागण्याची क्षमता असणा-या नउ वेगवेगळ्या यंत्रणा कार्यरत आहेत. यामध्ये दोन प्रकारची लढाउ विमाने, जमिनीवरू न मारा करणारी सहा बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि समुद्रातून मारा करणा-या एका बॅलिस्टिक क्षेपणास्त्राचा समावेश आहे. याशिवाय, आणखी किमान दोन प्रगत यंत्रणांचे काम अंतिम टप्प्यात असून येत्या काही वर्षांत (पान २ वर)



## चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग ब्रिक्स शिखर परिषदेसाठी भारतात येणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी नवी दिल्लीला येणार आहेत. चीनने देखील या वृत्ताला अधिकृत दुजोरा दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणानंतर राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग १२ ते १३ सप्टेंबर दरम्यान नवी दिल्ली येथे होणा-या १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेला उपस्थित राहतील, असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

**गलवान खो-यातील चकमकीनंतर पहिलाच दौरा**-२०२० मधील गलवान खो-यात झालेल्या चकमकींनंतर दोन्ही देशांमधील संबंध ताणले होते. या चकमकीत २० भारतीय सैनिक आणि काही चिनी सैनिक मारले गेले होते. त्यानंतर क्षी जिनपिंग यांचा गेल्या सात वर्षांतील पहिलाच भारत दौरा ठरणार आहे. २०१९ मध्ये जिनपिंग यांनी चेन्नईजवळील महाबलीपुरम येथे पंतप्रधान मोदींबरोबर एका परिषदेसाठी भारताचा दौरा केला होता. त्याआधी सप्टेंबर २०१४ मध्ये शी जिनपिंग पहिल्यांदा भारतात आले होते. यानंतर २०१६ मध्ये ब्रिक्स शिखर परिषदेसाठी त्यांनी गोव्यात हजेरी लावली होती. दरम्यान, गेल्या काही वर्षात भारत आणि चीनमधील संबंधांमध्ये सुधारणा झाली आहे. गेल्या वर्षी पंतप्रधान मोदींनी चीनला भेट दिली होती. २०२० च्या चकमकींनंतर भारताने चिनी गुंतवणुकीवर लादलेले काही निर्बंध शिथिल केले आहेत ,विशेषतः इलेक्ट्रॉनक्स, कॅपिटल गुड्स आणि सोलर सेल क्षेत्रांवर भर दिला गेला आहे. चिनी कंपन्यांच्या भारतातील प्रस्तावित गुंतवणुकीची आता खुद्द बीजिंगकडूनच अधिक कडक तपासणी केली जात आहे, असे वृत्त रायटर्स या वृत्तसंस्थेने सूत्रांच्या हवाल्याने प्रसिद्ध केले. चीनचा अत्याधुनिक उत्पादन आणि उच्च-तंत्रज्ञानाचा समावेश असलेल्या क्षेत्रांच्या तपासणीवर भर आहे. एडक्क्स्ट नेत्यांच्या बैठकीसाठी जिनपिंग भारतात येणार आहेत का? याबाबत चिनी परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते गुओ जियाकुन यांनी उत्तर दिले नव्हते. त्यांना याबाबत माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले होते.



## नगरविकास विभागाचा शासन निर्णय जारी

# नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी 1800 कोटीचा निधी



**मुंबई/प्रतिनिधी :**सन २०२७ मध्ये होणा-या नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी राज्य सरकारने कुंभमेळा प्राधिकरणाला १,८०० कोटी रु पयांचा निधी वितरित करण्यास मान्यता दिली आहे. नगरविकास विभागाने गुरु वारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला. हा निधी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आवश्यक कामासाठी वापरला जाणार आहे.

राज्य सरकारने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी पावसाळी अधिवेशनात ३ हजार कोटी रु पये पुरवणी मागणीद्वारे मंजूर केले आहेत. प्राधिकरणाच्या विनंतीनुसार १ हजार ८०० कोटी रु पयांचा निधी वितरीत करण्यास वित्त विभागाने आज मान्यता दिली. यापूर्वी सरकारने २०२५-२६ या आर्थिक वर्षात प्राधिकरणाला ३ हजार ९७ कोटी रु पयांचा निधी दिला आहे. यापूर्वी, कुंभमेळ्याशी संबंधित कामांसाठी विविध टप्प्यांवर २८३ कोटी, ७१७ कोटी, ५०१.४० कोटी, ३९६.६० कोटी आणि १,२०० कोटी रुपये वितरित करण्यात आले होते. मंजूर निधीच्या वापरासाठी यात अटी घालण्यात आल्या आहेत त्यानुसार, ही रक्कम केवळ नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या मंजूर उद्दिष्टांमध्ये समाविष्ट असलेल्या कामांवरच खर्च केली जावी. वित्त विभागाने वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना आणि निकष, आर्थिक अधिकार प्रदान करण्याबाबतचे नियम तसेच इतर सूचना व अटींनुसारच या निधीचा वापर केला जावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. गेल्या महिन्यात पोलिसांनी कुंभमेळ्यासाठीच्या बनावट कामांच्या आदेशांशी संबंधित ३०५ कोटी रुपयांचा घोटाळा उघडकीस आणला होता आणि अनेक जणांना अटक केली होती, त्यामुळे निधीसंदर्भात आवश्यक खबरदारी घेण्यात आली आहे.




# कविठ्यात जुगार अड्ड्यावर छापा १९ जुगाऱ्यांना ताब्यात घेत मुद्देमाल जप्त

## परतवाडा पोलिसांची कारवाई



**परतवाडा/प्रतिनिधीः-** अमरावती ग्रामीण पोलिसांनी सुरू केलेल्या 'ऑपरेशन कवच'अंतर्गत अवैध धंद्यांविरोधात कारवाईचा धडाका सुरूच असून, परतवाडा पोलिसांनी कविठा येथे सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा टाकून १९ जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रक्कम, ११ मोबाईल आणि जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख ३९ हजार १२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ सप्टेंबर रोजी परतवाडा पोलिसांना ग्राम कविठा येथे काही इसम 'एक्का बादशहा' नावाचा जुगार खेळत असून, पैशांची बाजी लावत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीची खातरजमा केल्यानंतर ठाणेदारांच्या आदेशाने पोलिसांचे पथक कविठा येथे रवाना झाले.

पोलिसांनी संबंधित ठिकाणी सापळा रचून जुगार अड्ड्यावर छापा टाकला. यावेळी जुगार खेळणाऱ्या एकूण १९ इसमांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून १९ हजार १२० रुपये रोख, ११ मोबाईल फोन आणि जुगार खेळण्याचे साहित्य असा एकूण १ लाख ३९ हजार १२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ताब्यात घेण्यात आलेल्या सर्वांविरुद्ध जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास परतवाडा पोलीस करीत आहेत.

ही कारवाई अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि अचलपूर उपविभागाच्या सहायक पोलीस अधीक्षक ईशानी आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. ठाणेदार अजय आकरे, सहायक पोलीस निरीक्षक सलीम शेख, पोलीस हवालदार रविंद्र बोहरीया, सुधीर राऊत तसेच पोलीस कॉन्स्टेबल शुभम शर्मा, जितेश बाबील, सचिन कोकणे आणि चंद्रशेखर वानखडे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# काटपुर - ममदापूर येथे बैलपोळा साजरा

**काटपुर/प्रतिनिधीः-** मोर्शी तालुक्यातील काटपुर - ममदापूर येथे उत्साहात बैलपोळा साजरा करण्यात आला. यावेळी गावातील शेतकऱ्यांनी आपल्या बैल जोड्या मोठ्या उत्साहात नटून सजवून पोळ्याच्या तोरणाखाली आणल्या. या ठिकाणी काटपुर आणि ममदापूर या दोन्ही गावांमधून सामूहिक बैलपोळा साजरा करण्यात येतो. गावातील भजन मंडळींनी शंकरांच्या गाण्यांनी व जय जयघोष तसेच म्हणींनी वातावरण दुमदुमून गेले.



एका पेक्षा एक अनेक सजवलेल्या जोड्या मन मोहून घेत होत्या.

बैलांच्या पाठीवर आकर्षक व मनमोहक झुली, सिंगाला रंगीबिरंगी बेगड व तोरणे तसेच मोरपिसे उठून दिसत होते. सर्व जोड्या तोरणाखाली आल्यानंतर गावातील मानाच्या जोडीचे आगमन होताच व पूजन करताच तोरणाखालील सर्व जोड्यांना घाट- धूप देऊन पोळा साजरा करण्यात आला. यावेळी गावातील लहान मुले व गावकरी मोठ्या संख्येने पोळा पाण्यासाठी जमले होते.

# श्री गोरक्षण संस्थेत लायन्स क्लबतर्फे बैल पोळा उत्साहात साजरा

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री गोरक्षण संस्था, गोसदन, दस्तूरनगर, अमरावती येथे बैल पोळा सण मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने दिनांक १० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता साजरा करण्यात आला. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ॲड.अटलजी व त्यांच्या पत्नी, संस्थेचे ट्रस्टी व पशुचिकित्सा अधिकारी तसेच लायन्स क्लब ऑफ अमरावती रियलचे अध्यक्ष डॉ. दीपक कऱ्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैलांचे पूजन करून त्यांना नैवेद्य अर्पण करण्यात आला.यावेळी लायन्स क्लब तर्फे बैलांची सेवा व संगोपन करणाऱ्या सर्व बैलधारकांचे टोपी



व दुपट्टा देऊन सन्मानपूर्वक स्वागत करण्यात आले. तसेच व्यवस्थापक नंदू दिवे यांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला. आणि गोसदनातील कामगार महिलांना साडीचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून पशुसेवा, श्रमाचा सन्मान आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संदेश देण्यात आला.या कार्यक्रमाला लायन्स क्लबच्या फर्स्ट लेडी ज्योती कऱ्हे, लायन आकाश तायवाडे, अमरावती महानगरपालिकेचे नगरसेवक प्रशांत वानखडे, व्यवस्थापक पनपालिया, डॉ. प्रमोद वाघमारे, डॉ. सुमित संगवई, डॉ. मंथन कडू, कांचन चोरडिया यांच्यासह संस्थेचे कर्मचारी, लायन्स क्लबचे सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.'बैल पोळा हा केवळ सण नसून, शेतकरी आणि पशुधन यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते जपणारा सण आहे. पशुसेवा हीच खरी मानवसेवा असून, लायन्स क्लबच्या माध्यमातून अशा सेवाकार्यांना सातत्याने प्रोत्साहन दिले जाईल,' असे अध्यक्ष डॉ. दीपक कऱ्हे यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# बोडना येथे पोळा सण उत्साहात



अमरावती : ग्रामीण संस्कृती आणि शेती परंपरेचा वारसा जपत बोडना येथे पारंपारिक सण पोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त बोडना येथील माजी सरपंच दिलीप ठाकरे यांनी आपल्या सजवलेल्या बैलजोडीसह शेतकरी मित्रांसोबत आनंदाचे क्षण साजरे केले. शेती आणि शेतकऱ्याशी असलेली नाळ आजही घट्ट असल्याचे या क्षणचित्रातून दिसून येते. यावेळी गावातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १ व १० वरिल उर्वरित

## सन २०२५ च्या मुख्य परिक्षेतील

उत्तरपत्रिका मिळण्याबाबत एमपीएससीला आवश्यक सूचना करण्यात येतील, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

औषध निरीक्षक परीक्षा पेपरफुटीचा सखोल तपास सुरु असून हा तपास संपलेला नाही, तो शेवटच्या टप्प्यापर्यंत नेण्यात येईल. तसेच या प्रकरणाचा चौकशी अहवाल सार्वजनिक केला जाईल असेही फडणवीस यांनी जाहीर केले. तसेच पुणे महानगरपालिका आणि एमएमआरडीएशी संबंधित भरती प्रक्रियेचीही पोलिस तसेच संबंधित यंत्रणांच्या माध्यमातून चौकशी करण्याची घोषणा करतानाच यातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची ग्वाही फडणवीस यांनी दिली.

एमपीएससीच्या कामकाजात विद्यार्थ्यांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र ग्रीव्हन्स सेल स्थापन करण्याचाही सरकारचा विचार आहे. हा सेल एमपीएससीचाच भाग असेल; मात्र स्वतंत्रपणे कार्य करेल. शक्य झाल्यास या सेलच्या प्रमुखपदी निवृत्त न्यायाधीशाची नियुक्ती करण्याचा विचार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी तक्रार केल्यानंतर त्यावर योग्य प्रतिसाद मिळत नाही, ही समस्या दूर करण्यासाठी हा स्वतंत्र सेल उपयुक्तठरेल, असे त्यांनी स्पष्ट केले.परीक्षा व्यवस्थेतील सुधारणा प्रत्यक्षात आणण्याबरोबरच पुढील एमपीएससी परीक्षा पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने घेणे हे सरकारचे प्रमुख लक्ष्य असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. मोठ्या प्रमाणावर जागा उपलब्ध झाल्यामुळे या परीक्षेसाठी सुमारे १२ ते साडेबारा लाख अर्ज आले आहेत. त्यातील दुबार अर्ज वगळता प्रत्यक्ष परीक्षार्थींची संख्या सुमारे १० ते ११ लाखांपर्यंत असू शकते. एवढ्या मोठ्या संख्येने उमेदवारांची परीक्षा शंभर टक्के पारदर्शकपणे घेणे हे मोठे आव्हान असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच परीक्षा प्रक्रियेसंदर्भातील पूर्वीच्या राजूरकर समितीच्या शिफारशींचीही पूर्ण पडताळणी केली जाईल. त्यातील योग्य शिफारशींची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पोलिस भरतीत दोन्ही पायाला चीप किंवा आणखी काही पर्याय दिला जाईल तसेच प्रत्येक जिल्ह्यात पोलिस भरतीसाठी गुणांचा एकच पॅटर्न करणार करणार असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

**भिमनवार काय म्हणाले?-** आयोगाच्या अध्यक्षांवर विविध आरोप करीत त्यांच्या राजीनाम्याची विद्यार्थ्यांनी मागणी केली होती. त्याबाबत बोलताना एमपीएससी अध्यक्ष, सचिव यांच्याविरोधात कोणताही पुरावा दिला, तर स्वतंत्र चौकशी करायला तयार असून जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई होईलच, कुणालाही वाचवण्याचा प्रश्नच येत नाही असे फडणवीस यांनी सांगितले. मात्र एमपीएससीचे अध्यक्ष भिमनवार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत नकार दिला. अध्यक्षपद हे घटनात्मक स्वरूपाचे पद असल्याने केवळ आरोपांच्या आधारे राजीनामा घेणे योग्य ठरणार नाही. मात्र कोणत्याही व्यक्तीविरोधात ठोस पुरावे उपलब्ध झाल्यास त्याची स्वतंत्रपणे तपासणी करून जबाबदारी निश्चित केली जाईल असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## 'एफडीए' पेपरफुटीत ४० कोटींची

करणारे पत्र मुख्यमंत्र्यांकडे, सचिवांकडे गेले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भीमनवार यांची मैत्री आहे खासगी क्षेत्रात नोकरीच्या संधी निर्माण होत नाहीत. त्यामुळे उच्च शिक्षित तरु ण शासकीय नोकरीकडे वळतात. मात्र, कोणतेही सरकार स्पर्धा परीक्षार्थ्यांना स्पष्टता देत नाही. अडीच लाख रिक्त जागांपैकी पुढच्या दोन वर्षांत ८० टक्के रिक्तजागा भरल्या जातील, त्यानंतर जागा राहणार नसल्याने पुढील सात वर्षांत भरती होणार नाही, असे स्पष्टता मिळणे गरजेचे आहे. अधिकारी-कर्मचा-यांच्या बदल्या ऑनलाइन पद्धतीने करण्यास विरोध करणारे भीमनवार एमपीएससीच्या परीक्षा ऑनलाइन घेण्यासाठी आग्रही आहेत. ४० लाख देउन कोणी तलाठी होत असेल तर सामान्य विद्यार्थ्यांचे काय होईल? हे प्रकार थांबवण्यासाठी तुकाराम मुंढे किंवा त्यांच्यासारखा सक्षम अधिकारी एमपीएससीच्या अध्यक्षपदी नेमल्यास ही व्यवस्था सुधारेल, असे पवार यांनी नमूद केले.

**फडणवीसांचे तीन विशेष कार्य अधिकारी आयएएस**

भीमनवार १९९३मध्ये शासकीय सेवेत आले. २०१४मध्ये मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी झाले. २०१८मध्ये आयएएस झाले. देवेंद्र फडणवीस यांचे तीन विशेष कार्यकारी आयएएस झाले. २०१८नंतर विविध विभागांतून आयएएस होण्यासाठी परीक्षा लागू झाली. ती चांगली गोष्ट झाली, असे पवार यांनी सांगितले.

**गट क पूर्व परीक्षा ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये व्हावी-** एमपीएससीने २५ ऑक्टोबर रोजी होणारी नियोजित महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्तपूर्व परीक्षा अचानक तीने महिने पुढे ढकलली आहे. याला सण-उत्सवाचे कारण देण्यात आले असले, तरी यातही पेपरफुटी किंवा काहीतरी काळेबेरे झालेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा आरोप पवार यांनी केला. ही परीक्षा ही ऑफलाइन पद्धतीनेच ऑक्टोबर ते नोव्हेंबर दरम्यान झाली पाहिजे. जेणेकरून डिसेंबरमध्ये मुख्य परीक्षा होउन जानेवारीमध्ये निकाल जाहीर होउन प्रक्रिया पूर्ण होउ शकेल, असे त्यांनी नमूद केले.

## भारताकडे पाकपेक्षा अधिक

त्या तीनही सैन्यदलांत दाखल होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**७३० किलो प्लुटोनियम उपलब्ध-** भारताकडे सध्या प्रत्यक्ष तैनातीसाठी १६० हून अधिक अण्वस्त्रे सज्ज आहेत, तर नव्याने तयार होणा-या क्षेपणास्त्रांसाठी अतिरिक्त अस्त्रे जोडली गेल्यास हा एकूण साठा १९० पर्यंत पोहोचतो, असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. इंटरनॅशनल पॅनेल ऑन फिसाइल मटेरियल्स २०२६ च्या आकडेवारीचा हवाला देत, भारताने सुमारे ७३० किलोग्रॅम वेपन-ग्रेड प्लुटोनियम तयार केल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. एका अण्वस्त्रासाठी साधारणपणे ४ किलोग्रॅम प्लुटोनियम लागते, हे गृहीत धरल्यास भारताकडे उपलब्ध साठ्यातून १४० ते २२५ अण्वस्त्रे बनवण्याची क्षमता असल्याचे स्पष्ट होते.

**भारताचे नो फर्स्ट युझ धोरण कायम-** भारताने सुरु वातीपासूनच प्रथम अण्वस्त्र वापर न करण्याचे (नो फर्स्ट युझ- NFU) धोरण अवलंबले आहे. त्यामुळे शत्रूवर आधी हल्ला करण्याऐवजी, प्रत्युत्तरादाखल कठोर मारा करण्यावर भारताचा भर राहिला आहे. भारताची सागरी अण्वस्त्र क्षमता अधिक भक्कम आणि सुरक्षित होत असल्याने जमिनीवरील यंत्रणांवरील ताण कमी होण्यास मदत होत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

## जिल्हा बँकेतील सत्ताधारी गटाला

अभिजित ढेपे यांच्यासह संचालक नरेशचंद्र ठाकरे, सुधाकर भारसाकळे, आनंद काळे, जयप्रकाश पटेल, दयाराम काळे, सुरेखाताई ठाकरे, चित्राताई डहाणे, सुनील वऱ्हाडे आणि अजय मेहकरे यांनी बँकेच्या हिताची भूमिका ठामपणे पुढे नेली.

सत्ताधारी संचालक मंडळाची एकजूट, कायदेशीर लढ्याला दिलेले पाठबळ आणि बँकेच्या स्वायत्ततेबाबतची ठाम भूमिका यामुळे हा विषय सर्वोच्च न्यायालयापर्यंत प्रभावीपणे मांडता आला. त्यामुळे आजचा दिलासा हा केवळ एका व्यक्तीचा नव्हे, तर बँकेच्या हितासाठी एकत्र उभ्या राहिलेल्या संपूर्ण सत्ताधारी संचालक मंडळाच्या प्रयत्नांना मिळालेले बळ असल्याची भावना व्यक्त होत आहे. अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला केवळ पारंपरिक सहकारी बँक न ठेवता शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा मजबूत आधारस्तंभ बनविण्याचे व्हिजन बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली पुढे नेले जात आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे, शेतकऱ्यांना सक्षम आर्थिक सुविधा उपलब्ध करून देणे, बँकेची आर्थिक क्षमता वाढविणे आणि सहकार क्षेत्रात अमरावती जिल्हा बँकेचा आदर्श निर्माण करणे, हा सत्ताधारी संचालक मंडळाचा निर्धार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या आदेशामुळे बँकेचे सभासद, अधिकारी-कर्मचारी आणि सत्ताधारी संचालक मंडळात समाधान व उत्साहाचे वातावरण आहे.

## अमरावती महानगरपालिकेला

उच्च न्यायालयात सादर केले. त्या अनुषंगाने न्यायालयाने आदेश पारीत केला.

याचिका कर्त्यांच्या वतीने वकील म्हणून श्रेयस मिलींद वैष्णव यांनी प्रकरणाचा सखोल अभ्यास करुन सातत्याने अणि संयमाने न्यायालयीन बाजु मांडली. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या दिर्घकाळ प्रलंबित असलेल्या हक्कांचा मुद्दा प्रभावीपणे मांडतांना त्यांनी प्रकरणातील कायदे तसेच वस्तुस्थितीजन्य बाबी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या. दिर्घकाळ चाललेल्या या न्यायालयीन प्रक्रियेत याचिकाकर्त्यांनी दाखविलेला संयम तसेच न्यायालय आणि वकील श्रेयस वैष्णव यांच्यावरील विश्वास अखेर महत्वपूर्ण ठरला.

कायदेशीर लढाईतील संयम, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि आपल्या वकीलावर याचिका कर्त्यांनी ठेवलेला विश्वास या तिन्ही गोष्टींमुळे ३४८ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना अनेक वर्षांपासुन प्रलंबित असलेले सेवानिवृत्तीचे लाभ व्याजासहीत मिळण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे.

## बारमधील चोरी दोन तासांत उघड

मोबाईल तसेच काऊंटरमधील रोख रक्कम चोरीस गेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले. चोरी गेलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे ६२ हजार रुपये असल्याचे फिर्यादीने सांगितले. गुन्हा दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांनी डी.बी. पथकाला आरोपीचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पथकाने बार परिसरातील तसेच आजूबाजूच्या ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्याचबरोबर संशयितांबाबत माहिती घेत गोपनीय माहितीदारांच्या माध्यमातून तपास सुरू केला. या तपासादरम्यान एका विधी संघर्षीत बालकाचा गुन्ह्यात सहभाग असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर त्याच्याकडून चोरीचा Lenovo टॅब, Realme मोबाईल आणि सात हजार रुपये रोख, असा एकूण ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके आणि सहायक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या निर्देशानुसार करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, क्राईम पोलीस निरीक्षक पाचकवडे, प्रशासन पोलीस निरीक्षक पंधरे यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथक प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक संदीप हिवाळे, पोलीस हवालदार भारत वानखडे, पोलीस नाईक राजेश गुरेले, पोलीस शिपाई मतिन शेख, सुशांत प्रधान, धनराज कुमरे, महेश शर्मा आणि पोलीस कॉन्स्टेबल प्रताप लोखंडे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## पोळयाच्या दिवशी पोहण्यासाठी

पाण्यात बुडाल्याचे लक्षात येताच त्याच्या मित्रांनी तसेच परिसरातील नागरिकांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. घटनेची माहिती तातडीने स्थानिक पोलिस प्रशासनाला देण्यात आली. त्यानंतर प्रशासनाकडून DDRF बचाव पथकाला घटनास्थळी पाचारण करण्यात आले.

DDRF टीम घटनास्थळी दाखल झाल्यानंतर कुकसा नदीपात्रातील डोह परिसरात अमितचा शोध घेण्यासाठी युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू करण्यात आली. बचाव पथकाकडून नदीपात्रात विविध ठिकाणी सलग चार ते पाच तास शोध घेण्यात आला. अथक प्रयत्नांनंतर सायंकाळी अखेर अमित तायडे याचा मृतदेह नदीपात्रातून बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले.

घटनास्थळी पोलिस पाटील, तलाठी, पोलिस कर्मचारी तसेच गावातील नागरिक उपस्थित होते. मृतदेह बाहेर काढल्यानंतर पोलिसांकडून पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यात आली.

दरम्यान, अमित तायडे हा मित्रांसोबत आंघोळीसाठी नदीपात्रात गेला असताना घडलेल्या या दुर्दैवी घटनेने कळाशी गावावर शोककळा पसरली आहे. तरुणांच्या मृत्यूमुळे तायडे कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, ऐन पोळ्याच्या दिवशीच दुर्दैवी घटना घडल्याने गावातील नागरिकांनीही हळहळ व्यक्त केली.

## मोक्का व एनडीपीएस प्रकरणातील

(वय २६ वर्षे, रा. बगड खिडकी, चंद्रपूर) असे अटक आरोपींचे नाव आहे. माहितीनुसार आरोपी जुबेर खान करीम खान (२६, रा. बगड खिडकी, चंद्रपूर) हा चंद्रपूर जिल्ह्यातून फरार होता.गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, हा फरार आरोपी नागपुरी गेट पोलीस ठाणे हद्दीत राहत आहे. माहितीची खातरजमा करून पथकाने तातडीने नागपुरी गेट परिसरात धाड टाकली आणि आरोपीला ताब्यात घेतले.पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त यशवंत सोळंके, प्रांजली सोनवणे, सहाय्यक आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, मनिष वाकोडे, दशरथ आडे यांच्या सह गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

## दुष्काळाच्या सावटात बळीराजाला

डगमगून न जाता त्याचा धैर्याने सामना करण्याचे आवाहन त्यांनी केले. केवळ सांत्वन न करता त्यांनी शेतकऱ्यांसोबत वेळ घालवला आणि त्यांचा उत्साह वाढवण्यासाठी सर्जा-राजाचा कृतज्ञता सोहळा म्हणजेच 'पोळा' मोठ्या उत्साहात साजरा केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला हरित क्रांतीचे प्रणेते व राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि विधिवत पूजन करून या उत्सवाचा प्रारंभ करण्यात आला. एरवी दुष्काळाच्या चिंतेत असलेला शेतकरी या उपक्रमामुळे काही काळ सुखावला. संकटकाळात नेत्यांनी थेट गावात येऊन सण साजरा केल्याने ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला. याप्रसंगी किन्हीवळगी गावातील नागरिक आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोटारसायकल चोरीचा गुन्हा

२७ डीबी ४७६ असा असल्याचे स्पष्ट झाले. वाहनाच्या वर्णनावरून तसेच आरोपीने दिलेल्या माहितीनुसार पोलिसांनी खल्लार पोलिस ठाण्यातील गुन्हे अभिलेख तपासले असता कलम ३०३(२) बीएनएस अन्वये मोटारसायकल चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे समोर आले. त्यानुसार पोलिसांनी ८५ हजार रुपये किमतीची मोटारसायकल जप्त करून आरोपीसह वाहन पुढील कारवाईसाठी खल्लार पोलिसांच्या ताब्यात दिले. या कारवाईमुळे वर्षभरापूर्वीचा मोटारसायकल चोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक सतीश झाल्टे, पोलीस हवालदार मंगेश लकडे, सचिन मसांगे, पोलीस कॉन्स्टेबल हर्षल काळे तसेच चालक पोलीस हवालदार हर्षद घुसे यांच्या पथकाचा कारवाईत सहभाग होता.

## ४ दिवसापासून बेपत्ता युवकाचा

एका विहिरीत मृतदेह तरंगताना दिसत असल्याची माहिती गावकऱ्यांना मिळाली. ही बातमी वाऱ्यासारखी गावात पसरली आणि घटनास्थळी मोठी गर्दी जमली.घटनेची माहिती मिळताच कुऱ्हा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून गोताखोरांच्या मदतीने मृतदेह विहिरीबाहेर काढण्यात आला. मृतदेहाची ओळख आकाश सहारे म्हणून पटली आहे.पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी धामणगाव रेल्वे येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवला आहे.आकाशचा मृत्यू नेमका कसा झाला? हा अपघात आहे, आत्महत्या आहे की घातपात? या सर्व प्रश्नांची उत्तरे शवविच्छेदन अहवाल आणि पोलिसांच्या सखोल तपासानंतरच समोर येणार आहेत. कुऱ्हा पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.दरम्यान, तरुण मुलाच्या अशा दुर्दैवी मृत्यूमुळे सहारे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण अंजनसिंगी गावात हळहळ व्यक्त होत आहे.

## माजी मंत्री ॲड. यशोमती

बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा बैल हा केवळ एक प्राणी नसून शेतकऱ्याचा खरा सखा आणि कुटुंबातील सदस्य आहे. त्याच्या कष्टांमुळेच आपल्या घरात धान्याची समृद्धी येते. आजचा दिवस हा त्यांच्याप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा सण आहे.'

या पूजनाच्या वेळी ठाकूर कुटुंबीयांसह कार्यकर्ते, शेतकरी बांधव आणि नागरिक उपस्थित होते. सर्वांनी मिळून हा पारंपरिक सण अत्यंत भक्तीभावाने आणि उत्साहात साजरा केला.

## कुख्यात गुंड शेख सलमानवर

हा सन २०२१ पासून सातत्याने गंभीर गुन्हेगारीत सक्रिय आहे. त्याच्या विरोधात शहरातील नागपुरी गेट, सिटी कोतवाली आणि गाडगेनगर पोलीस ठाण्यांमध्ये मारहाण, दरोडा, जबरी चोरी, जीव घेण्याचा प्रयत्न, हत्याराने दंगा करणे, अपहरण, महिलांवर हल्ला, अंमली पदार्थांची अवैध विक्री, अवैध शस्त्र बाळगणे आणि तडीपारीच्या आदेशाचे उल्लंघन असे एकूण ८ गंभीर गुन्हे दाखल आहेत. यापूर्वी त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करून त्याला शहरातून तडीपार ही करण्यात आले होते, मात्र त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमध्ये कोणताही सुधार झाला नव्हता. सण-उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी आणि गुन्हेगारांवर वचक बसवण्या साठी नागपुरी गेटचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके यांनी सहायक पोलीस आयुक्त नीलेश ब्राह्मणे आणि पोलीस उपायुक्त यशवंत सोलंके यांच्या माध्यमातून एक विस्तृत आणि गोपनीय एमपीडीए प्रस्ताव तयार केला होता. हा प्रस्ताव तयार करण्यासाठी उपायुक्त प्रांजली सोनवणे,क्राईम ब्रँचचे पोलीस निरीक्षक अतुल वर, एमपीडीए सेलचे सहायक पोलीस निरीक्षक इमरान नायकवाडे,अजय मिश्रा आणि पोलीस अंमलदार चेतन कराडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. प्रस्तावाची कायदेशीर आणि तथ्यात्मक पडताळणी केल्यानंतर पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी १० सप्टेंबर रोजी आरोपी शेख सलमानच्या स्थानबद्धतेचा आदेश पारित केला. आदेश मिळताच नागपुरी गेट पोलीस आणि डीबी स्क्वॉडच्या पथकाने त्वरित कारवाई करत आरोपीचा शोध घेऊन आदेशाची अंमलबजावणी केली आणि त्याच दिवशी त्याला अमरावती सेंट्रल जेलमध्ये दाखल केले.

## खल्लार येथे बैलपोळा उत्साहात

मोहोड यांच्या बैलजोडीने पटकाविले, दुसरे १००१ रुपयाचे बक्षीस अच्युत पारोदे यांच्या बैलजोडीला मिळाले,तिसरे ७५१ रुपयाचे बक्षीस विजय खराडे यांच्या जोडीला तर चौथे ५०१ रुपयाचे बक्षीस दिपक पांडे यांच्या बैलजोडीला देण्यात आले. तर स्व. पंजाबराव माहोरे यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिले जाणारे वैयक्तिक १२५१ रुपयाचे प्रथम बक्षीस स्वप्नील माहोरे यांच्या तर्फे निकेश कुरळकर यांच्या बैलजोडीला मिळाले.

तर साई ॲग्रो एजन्सी व तायडे कृषी केंद्र, खल्लार यांच्या वतीनेही उत्कृष्ट बैलजोडीला प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. ही सर्व बक्षीस खल्लारचे ठाणेदार अमोल मुडे, माजी सरपंच आरिफ शहा युनूस शहा व योगेश मोपारी व इतरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

## जुळया शहरात बैलपोळा

सकाळपासूनच बैलपोळा साजरा करण्याकरिता शेतकरी बांधवांची लगबग होती.जयस्तंभ चौक परिसरात बैलांची वाजत - गाजत मिरवणुक काढण्यात आली .बैलांना स्नान घालून , बांशिंग बांधून , फुगे, मनी - माळ,रंगरंगोटी आदी पारंपरिक साज घालून बैलजोड्या सहभागी झाल्या होत्या .यावेळी नागरिक ,शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.जयस्तंभ चौक परिसरात जत्रा सुद्धा या दिवशी भरते .यावेळी परतवाडा पोलीस स्टेशनचे अधिकारी,कर्मचारी यांचा तगडा बंदोबस्त होता.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ शुक्रवार, ११ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# पावसाने दडी मारल्याने शेतकरी संकटात ; वाशिम जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करा

## आ. सईताई डहाके यांची मुख्यमंत्री फडणवीसांकडे मागणी ; शेतांच्या बांधावर जाऊन घेतला परिस्थितीचा आढावा

■ प्रतिनिधी | कारंजा ■

**मागील ४५ ते ५० दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील पिके धोक्यात आली असून शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सई प्रकाश डहाके यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करण्यासाठी विशेष दौरा केला.**



८ सप्टेंबर रोजी मानोरा तालुक्यात, तर ९ सप्टेंबर रोजी कारंजा तालुक्यातील विविध गावांमध्ये आमदार सईताई डहाके यांनी थेट शेतशिवारात जाऊन पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्यासह तहसीलदार, कृषी विभागाचे अधिकारी तसेच संबंधित प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते. पावसाअभावी पिकांची झालेली अवस्था, शेतकऱ्यांचे नुकसान आणि आगामी रब्बी हंगामासमोरील अडचणी याबाबत त्यांनी शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून माहिती घेतली.

शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती लक्षात घेता आमदार सईताई डहाके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांना पत्र देऊन वाशिम जिल्हा 'कोरडा दुष्काळग्रस्त' घोषित करण्याची मागणी केली आहे. या पत्रामध्ये शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्यासाठी विविध उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

वाशिम जिल्हा कोरडा दुष्काळग्रस्त घोषित करावा. एन.डी.आर.एफ.च्या निकषांपेक्षा अधिक मदत देऊन शेतकऱ्यांना झालेल्या उत्पादन खर्चाच्या प्रमाणात आर्थिक मदत द्यावी. पिक विमा काढलेल्या शेतकऱ्यांना २५ टक्के आगाऊ पीक विमा (Mid-Season Adversity) देऊन उर्वरित विम्याची रक्कम तत्काळ जमा करण्याचे आदेश विमा कंपन्यांना द्यावेत.

शेतकऱ्यांचे चालू वर्षाचे वीज बिल माफ करून कृषी कर्जाच्या वसुलीस स्थगिती द्यावी. पशुधनासाठी चारा छावण्या अथवा चारा डेपो तातडीने सुरू करावेत. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या मुलांची शाळा व महाविद्यालयीन फी पूर्णपणे माफ करावी. आगामी रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांना विनापरतावा अग्रिम आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी. पावसाअभावी शेतातील उभी पिके करपण्याच्या मार्गावर असून अनेक शेतकऱ्यांसमोर रब्बी हंगामाची पेरणी कशी करायची, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे केवळ कागदोपत्री पाहणी न करता प्रशासनाने प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचून तातडीने मदत उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. आमदार सईताई डहाके यांनी स्वतः शेतशिवारात जाऊन परिस्थितीची पाहणी केल्याने शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्रशासनाच्या पातळीवर अधिक वेग मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. आता शासनाने या मागण्यांची तातडीने दखल घेऊन संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना ठोस आर्थिक मदत द्यावी, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# रिसोड पोलिसांची विशेष कामगिरी

## 'कॉम्बिंग ऑपरेशन'मध्ये शेती साहित्य चोरणाऱ्या टोळीला अटक

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील काही दिवसांपासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर मालमत्तेविषयक गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी तसेच यापूर्वी उघडकीस न आलेल्या गुन्ह्यांचा शोध घेऊन चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यासाठी रिसोड पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली. या मोहिमेअंतर्गत दि. ७ सप्टेंबर रोजी पहाटे ३.३० ते सकाळी ६ वाजेपर्यंत नाकाबंदी व 'कॉम्बिंग ऑपरेशन' राबविण्यात आले. या कारवाईत शेती साहित्य चोरी करणाऱ्या टोळीतील चार आरोपींना ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले असून त्यांच्याकडून तब्बल ४ लाख ४५ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.रिसोड पोलीस ठाण्याचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात आली. कॉम्बिंग ऑपरेशनदरम्यान पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच विविध ठिकाणच्या पारधी बेड्यांची तपासणी करण्यात आली. त्याचवेळी मौजे बिबखेडा व मोठेगाव परिसरात सर्च ऑपरेशन सुरू असताना पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे संशयितांची धरपकड करण्यात आली.गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी खालील चार आरोपींना ताब्यात घेतले आहे. गोविंदा मनोहर भोसले (वय ३२), रा. बिबखेडा, ता. रिसोड, जि. वाशीम, राजू मनोहर भोसले (वय २८), रा. बिबखेडा, ता. रिसोड, जि. वाशीम, विजय मनोहर भोसले (वय २७), रा. बिबखेडा, ता. रिसोड, जि. वाशीम, विशाल भारत भोसले (वय २९), ह.मु. बिबखेडा, ता. रिसोड, जि. वाशीम



▶ चार आरोपी ताब्यात; ४ लाख ४५ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त
▶ दोन गुन्हे उघडकीस, आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता

### ४ लाख ४५ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

ताब्यात घेतलेल्या आरोपींकडून पोलिसांनी चोरीच्या गुन्ह्यात वापरलेली वाहने, शेती साहित्य तसेच चोरी करण्यासाठी वापरण्यात येणारी विविध औजारे असा एकूण ४,४५,८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये ५ मोटारसायकली, ३ पाण्याचे मोटारपंप, पाईप व विविध इलेक्ट्रिकल साहित्य, कटर, लोखंडी हातोडी, लोखंडी टॉमी, वायर कापण्याचे कटर, लोखंडी कत्ता तसेच ३ मोबाईल फोन यांचा समावेश आहे.शेतकऱ्यांच्या शेतातील मोटारपंप, पाइप व विद्युत साहित्य चोरीला जाण्याच्या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे चोरीच्या घटनांना आळा बसण्यास मदत होणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### चौकशीत दोन गुन्हे उघडकीस

पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता त्यांच्या सहभागातून रिसोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दोन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपींकडून आणखी काही गुन्ह्यांची माहिती मिळण्याची शक्यता असून पोलीस त्या दिशेने तपास करीत आहेत.दरम्यान, चोरीच्या घटनांमध्ये आरोपींसोबत आणखी काही जण सहभागी असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे.चोरीच्या गुन्ह्यांमध्ये संजय किशोर पवार (वय २८, रा. बिबखेडा), संजय बबन भोसले (वय ३०, रा. मोठेगाव) आणि प्रदीप उर्फ खापर्या सावजी पवार (वय ४०, रा. मोठेगाव) यांचाही सहभाग असल्याचे तपासात समोर आले आहे. हे आरोपी सध्या फरार असून रिसोड पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.तसेच चोरीचा मोटारपंप विकत घेणारा नागेश भगवान वाघ, रा. मोठेगाव याच्याविरुद्धही कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, अपर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण पवार आणि पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.कारवाईमध्ये सहायक पोलीस निरीक्षक विनायक जाधव, पोलीस उपनिरीक्षक सागर भारस्कर, गणेश सूर्यवंशी, सहायक फौजदार घुले, पोलीस कॉन्स्टेबल विनोद घनवट, रवी अडागळे, परमेश्वर भोणे, सतीश दिंडे, रुपेश मस्के, प्रविण गोपनारायण, देविदास काळबांडे, संतोष धोत्रे, आदिनाथ इडोळे आणि ज्ञानेश्वर पारवे यांनी सहभाग घेतला.रिसोड पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांची गस्त व तपास यंत्रणा अधिक सक्रिय झाल्याचे दिसून येत असून, उर्वरित फरार आरोपींच्या अटकेनंतर आणखी चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

# काटा येथील जि. प. शाळेत ५६ वर्षीय शिक्षकाकडून विद्यार्थिनींचा लैंगिक छळ

## विनयभंगाच्या तक्रारीवरून नराधम शिक्षकाला अटक !



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशीम तालुक्यातील काटा येथील जिल्हा परिषद शाळेतील ५६ वर्षीय नराधम शिक्षकाने शाळेतील अल्पवयीन विद्यार्थिनीची छेड काढत विनयभंग केल्याची निंदणीय घटना उघडकीस आली आहे.या प्रकरणी नराधम शिक्षका विरुद्ध वाशीम ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून 'त्या' नराधम शिक्षकाला अटक करण्यात आली आहे .त्या नराधम शिक्षकाचे नाव दिलीप बोरकर असून या घटनेमुळे काटा गावासह जिल्ह्यातील पालकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

येथून जवळच असलेल्या काटा येथील जिल्हा परिषद शाळेत अल्पवयीन विद्यार्थिनींची छेडछाड करून विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार मंगळवार ९ सप्टेंबर रोजी उघडकीस आला आहे. या अभद्र प्रकरणात विद्यार्थिनींच्या पालकांकडून तक्रारी मिळाल्यानंतर वाशीम ग्रामिण पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत संबंधित शिक्षकाला ताब्यात घेतले. पोलिसांनी शाळेत जावून विद्यार्थिनींची इन-कॅमेरा विचारपूस केली असता, त्या नराधम शिक्षकाकडून लैंगिक छळ स्वरूपाचा त्रास आणि अयोग्य स्पर्श केला जात असल्याची माहिती विद्यार्थिनींनी सांगितली असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारा हा प्रकार तिसऱ्या व चौथ्या वर्गातील मुलींसोबत सुरू असल्याचे काही विद्यार्थिनींनी सांगितल्याची माहितीही पोलिसांनी दिली . या प्रकरणी शिक्षक दिलीप बोरकर याच्याविरोधात पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून त्याला मंगळवारी रात्री अटक करण्यात आली आहे. सध्या पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, आणखी किती विद्यार्थिनी या प्रकाराला बळी पडल्या आहेत, याचा तपास केला जात असल्याचे ठाणेदार श्रीदेवी पाटील यांनी सांगितले आहे.

# परवाना नसताना सावकारी; ज्वेलर्सविरुद्ध गुन्हा दाखल

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कोणताही वैध सावकारी परवाना नसताना अवैध सावकारी व्यवहार केल्याप्रकरणी वाशिम शहरातील एका ज्वेलर्सविरुद्ध महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या कलम ३९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहकार विभागाच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली.

अवैध सावकारी व्यवहारासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्यावरून सहकार व पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने १६ एप्रिल रोजी बालाजी कॉम्प्लेक्स रुख्मिनी ज्वेलर्स येथे झडतीची कारवाई केली. त्यात संबंधित ज्वेलर्स हे वैध सावकारी परवाना धारण न करता अवैध सावकारी करीत असल्याचे आढळले. त्यानुसार त्यांच्याविरुद्ध वाशिम शहर पोलिस ठाण्यात ४ सप्टेंबरला गुन्हा दाखल झाला.



अवैध सावकारी व्यवहार करणाऱ्या व्यक्तींची माहिती नागरिकांनी सहकार विभागाकडे द्यावी. तक्रारदारांची नावे गोपनीय ठेवली जातील, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम एम. एस. लटपटे यांनी केले आहे.

# सर्जा- राजा प्रती दुष्काळाच्या छायेतही शेतकऱ्यांनी व्यक्त केली कृतज्ञता; बैलपोळा उत्साहात साजरा

■ प्रतिनिधी | मानोरा ■

यावर्षी तालुक्यातील शेतकरी भीषण आवर्षणाचा सामना करीत असून खरीप हंगाम दुष्काळाच्या गडद छायेखाली आलेला आहे. ४५ दिवसांपेक्षा अधिक काळ पावसाने ओढ दिल्याने सोयाबीन, कापूस, तूर यासह सर्व पिके माना टाकू लागली आहेत. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावला असतानाही, शेतात ऊन-पावसात, थंडी-हिवाळ्यात वर्षभर साथ देणाऱ्या सर्जा-राजा प्रती असलेली कृतज्ञता मात्र शेतकऱ्यांनी कमी होऊ दिली नाही.

पोळा सणानिमित्त आज तालुक्यातील बहुतांश गावे, वाडी, वस्ती, पाडे व तांड्यांमध्ये शेतकऱ्यांनी आपल्या बैलांची मनोभावे व विधिवत पूजा आराधना करून उत्साहात पोळा साजरा केला.

सकाळपासूनच शेतकऱ्यांनी बैलांना नदी-नाल्यावर आंघोळ घालून, शिंगांना हिंगळ, बेगड, रंग लावून, अंगावर रंगीबेरंगी झूल, गळ्यात फुलांच्या माळा, पायात घुंगरू बांधून सजविले.



घरातील महिलांनी बैलांसाठी पुरणपोळीचा नैवेद्य तयार केला. तालुक्यातील अमरगड (वाई गौळ) येथील वडाच्या झाडाखालील मंदिर परिसरात शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आपल्या सजविलेल्या बैलांची सामूहिक पूजा केली. ढोल-ताशांच्या गजरात बैलांची मिरवणूक काढण्यात आली. लहान मुले, तरुण आणि वृद्ध शेतकरी मोठ्या संख्येने या उत्सवात सहभागी झाले होते. तालुक्यातील बहुतांश गावातील शेतकऱ्यांनी आपल्या बैलांचे औक्षण करून, त्यांच्या पायावर पाणी टाकून, डोक्याला डोके लावून कृतज्ञता व्यक्त केली. 'पिके जळाली असली तरी जोपर्यंत सर्जा-राजा आहे, तोपर्यंत आमची शेती आहे.

# बैलपोळ्यात आ. अमित झनक यांच्या हस्ते बैलजोड्यांची पूजा



**सजविलेल्या बैलजोड्यांची गावातून उत्साहात मिरवणूक; पारंपरिक उत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शेतकरी बांधवांच्या जिव्हाळ्याचा आणि पारंपरिक बैलपोळा उत्सव मांगुळ झनक येथे यंदाही मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. रिसोड-मालेगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमित झनक यांनी बैलजोड्यांची विधिवत पूजा-अर्चना करून शेतकऱ्यांच्या या पारंपरिक उत्सवात सहभाग नोंदविला. यावेळी शेतकरी व नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

बैलपोळ्याच्या निमित्ताने शेतकऱ्यांनी आपल्या बैलांना स्नान घालून विविध रंगांच्या आकर्षक झुली, गोंडे, फुले तसेच पारंपरिक साहित्याने सजविले होते. सजविलेल्या बैलजोड्या सती आई संस्थान येथे आणण्यात आल्या. आमदार अमित झनक यांच्या हस्ते बैलजोड्यांची पूजा करून त्यांना नैवेद्य दाखविण्यात आला. यावेळी त्यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधत बैलपोळ्याच्या शुभेच्छाही दिल्या.

पूजा-अर्चनेनंतर सजविलेल्या बैलजोड्यांची गावातून उत्साहात मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशे व पारंपरिक वाद्यांच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता. मिरवणुकीत शेतकरी, महिला, युवक तसेच बालकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

वर्षभर शेतीच्या कामात शेतकऱ्यांना साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची परंपरा बैलपोळ्याच्या माध्यमातून जपली जाते. यंदाही पारंपरिक पद्धतीने साजरा झालेल्या या उत्सवामुळे परिसरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

# जिल्हास्तरीय बुद्धबळ स्पर्धेसाठी मोक्षदा व रिधीका पात्र

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हास्तरीय बुद्धबळ स्पर्धेसाठी एस एम सी इंग्लिश स्कूल वाशीमची मोक्षदा व रिधीका पात्र क्रीडा व युवा सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वाशिम यांच्याद्वारे आयोजित तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेमध्ये स्थानिक एस एम सी इंग्लिश स्कूल



वाशिम शाळेने १४ वर्षा खालील मुली वयोगटांमध्ये सहभागी होऊन कु. मोक्षदा चांदजकर प्रथम व द्वितीय क्रमांक रिधिका मोरे हिने मिळवीला असून याची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांच्या या यशासाठीसप्राचार्य मीना उबगडे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे क्रीडा शिक्षक युवराज कुसळकर यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी खेळाडूंचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# न.प.च्या जन्म -मृत्यू विभागात सफाई कामगार पहातात कारभार

## दोन ते तीन महिने उलटूनही दाखल्यांसाठी माराव्या लागतात चकरा : मुख्याधिकाऱ्यांकडे नगरसवेकाची तक्रार !

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**नगर परिषदे मध्ये मागील काही महिन्यांपासून जन्म मृत्यू दाखले घेण्यासाठी नागरिकांना चकरा माराव्या लागत आहेत. अर्ज देऊनही दोन ते तीन महिने उलटूनही दाखले दिले जात नसल्याचा आरोप नागरिक करीत आहे.विशेष म्हणजे या विभागात सफाई कामगार संगणक चालवित असून जबाबदार लिपिक यांना संगणक येत नसल्याने ते केवळ खुर्चीवर बसून राहत आहे. न.प.च्या या कारभाराला सर्व सामान्य नागरिक त्रस्त झाले असून सफाई कामगारांना आणि संबंधित लिपिक यांना हटवून सक्षम अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्याची मागणी नगरसेवक शेख रशीद( नूर )यांनी केली आहे.**






नगरसेवक शेख नूर शेख शहानुर यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, वाशिम नगर परिषदेमधील जन्म-मृत्यू नोंदणी विभागात काही गंभीर अनियमितता होत असल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आली आहे. सफाई कामगार पदावर नियुक्त असलेले कर्मचारी प्रत्यक्षात जन्म-मृत्यू नोंदणीसंबंधीचे कार्यालयीन व संगणकीय कामकाज करत असल्याचे दिसून येत असून, त्यांच्याकडून अशा प्रकारची कामे कोणत्या आदेशानुसार करून घेतली जात आहेत, याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

तसेच, या विभागात कामासाठी येणाऱ्या नागरिकांकडून संबंधित कर्मचाऱ्यांच्या उद्धट वागणुकीबाबत, अरेरावीबाबत आणि समाधानकारक सेवा मिळत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त होत असून यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. असेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, या विभागात कार्यरत संबंधित लिपिकांकडे आवश्यक संगणकीय ज्ञान नसल्याचे दिसून येत असून, त्यांच्याकडे शासनाने विहित केलेली एमएस-सीआयटी अथवा समकक्ष संगणक पात्रता आहे की नाही, याची सखोल चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.असेल तर संबंधित लिपिक संगणकाची कामे का करत नाही असा सवाल नगरसेवकाने केला आहे.

जन्म-मृत्यू विभाग हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा विभाग असल्याने तेथील कामकाज पात्र कर्मचाऱ्यांकडून होणे आवश्यक आहे. त्यामुळे विभागात कार्यरत सफाई कामगारांच्या नियुक्ती व कामकाजाची चौकशी करून त्यांना त्यांच्या मूळ पदाच्या जबाबदाऱ्यांनुसार काम देण्यात यावे. तसेच, लिपिकांची शैक्षणिक व संगणकीय पात्रता तपासून अनधिकृतपणे इतर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी. जन्म-मृत्यू विभागात सक्षम पात्र अधिकारी-कर्मचारी नियुक्त करून नागरिकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नगरसेवक शेख रशीद(नूर) शेख शहानुर यांनी वाशिम न.प. मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २८५ ■ शुक्रवार ११ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# रायपुरात प्रशासनाची नामुष्की, वाघाने जीव घेतला आणि मृतदेहही स्वीकारता आला नाही

## कुटुंबाच्या परिवारातील एका सदस्याला नोकरी आणि पंचवीस लाखाची मदतः अमर काळे यांची मागणी

### प्रशासनाचा ठोस निर्णय नसल्याने मृतदेह पुन्हा सेलूला आणण्याची नामुष्की

**सेलू जनमाध्यम :** शेतातून घरी परतणाऱ्या रायपूर जंगली येथील ६५ वर्षीय शेतकरी भगवान धुर्वे यांचा पट्टेदार वाघाच्या हल्ल्यात ९ सप्टेंबर रोजी मृत्यू झाला. या घटनेने आधीच हादरलेल्या रायपूर जंगलीत प्रशासनाच्या भूमिकेविरोधात गुरुवारी संतापाचा उद्रेक झाला. धुर्वे कुटुंबाला तातडीने एक कोटी रुपयांची मदत द्यावी. गावाचे पुनर्वसन करावे. कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी द्यावी अशा मागण्या ग्रामस्थांनी रेटून धरल्या. मागण्यांवर ठोस निर्णय होईपर्यंत भगवान धुर्वे यांचे पार्थिव स्वीकारणार नाही अशी भूमिका घेत ग्रामस्थांनी प्रशासनाची कोंडी केली. अखेर पार्थिव स्वीकारले न गेल्याने प्रशासनाला मृतदेह पुन्हा सेलू येथील ग्रामीण रुग्णालयात आणावा लागला. त्यामुळे गंभीर परिस्थिती हाताळण्यात प्रशासनाची असमर्थता उघड झाली.

भगवान धुर्वे यांच्या मृत्यूनंतर बुधवारी रात्री उशिरा पार्थिव उत्तरिय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात नेण्यात आले. गुरुवारी शवविच्छेदनानंतर मृतदेह रायपूर येथे आणण्यात आला. मात्र गावात पार्थिव पोहोचताच ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली. धुर्वे कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक आहे. घरातील कर्ता



पुरुषच वाघाच्या हल्ल्यात गेला आहे. त्यामुळे केवळ औपचारिक मदत नको तर कुटुंबाच्या भवितव्याची कायमस्वरूपी हमी शासनाने द्यावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

**एक कोटींच्या मदतीवर ग्रामस्थ ठाम**

भगवान धुर्वे यांचा मुलगा दिव्यांग आहे. कुटुंबाचे घर कुडाचे आहे. त्यामुळे कुटुंबाची परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. धुर्वे कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी द्यावी. २५ लाख रुपयांची शासकीय मदत द्यावी. ती शक्य नसल्यास एक कोटी रुपयांची मदत द्यावी. तसेच रायपूर जंगली गावाचे पुनर्वसन करावे आणि वर्ग दोनच्या जमिनी वर्ग एक कराव्यात या मागण्यांवर ग्रामस्थ ठाम राहिले.

**अधिकारी आले चर्चा झाली निर्णय मात्र नाही**

ग्रामस्थांचा आक्रोश वाढत असल्याची माहिती मिळताच तहसीलदार डॉ. शकुंतला पाराजे. वनपरिक्षेत्र अधिकारी रुपेश खेडकर यांच्यासह अधिकारी घटनास्थळी पोहोचले. बोर व्याघ्र प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी धुर्वे कुटुंबीय आणि ग्रामस्थांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र ठोस आश्वासन अथवा निर्णय न झाल्याने आंदोलनकर्ते माघार घेण्यास तयार झाले नाहीत. अखेर मृतदेह स्वीकारण्यास ग्रामस्थांनी नकार दिला आणि प्रशासनाला पार्थिव पुन्हा सेलूला आणावे लागले.

**खासदार काळेंचा आंदोलनाला पाठिंबा**

घटनेची माहिती मिळताच खासदार अमर काळे यांनी रायपूर जंगली गाठले. त्यांनी धुर्वे कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. संतप्त ग्रामस्थांच्या मागण्या जाणून घेत त्यांना समर्थन दर्शविले. शासनाने ग्रामस्थांच्या मागण्या मान्य कराव्यात अशी भूमिका त्यांनी मांडली. तसेच वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी मोबाईलवर संपर्क साधून आंदोलनकर्त्यांची बाजू रेटली.

**वाघांचा धोका आणि प्रशासनाची परीक्षा**

जंगलव्याप्त परिसरात वाघांचा वाढता वावर आणि नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शेतात गेलेल्या शेतकऱ्याचा जीव गेला. त्यानंतर कुटुंबाला न्याय मिळवण्यासाठी ग्रामस्थांना पार्थिव रोखून आंदोलन करावे लागले. प्रशासनाकडे संकटाचा सामना करण्यासाठी ठोस कृती आराखडा आहे की नाही असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. मृतदेह स्वीकारला न गेल्याने तो पुन्हा सेलूला आणण्याची वेळ येणे ही प्रशासनासाठी मोठी नामुष्की मानली जात आहे.

**रायपूरात बैलपोळाही रद्द**

वाघाच्या हल्ल्याने गाव हादरले. शेतकरी भगवान धुर्वे यांच्या मृत्यूने शोककळा पसरल्याने ग्रामस्थांनी यंदाचा बैलपोळा रद्द केला. बैलजोड्या घरातच बांधून ठेवण्यात आल्या. सर्जा राजाच्या स्वागताऐवजी गावात शोकाचे वातावरण आहे. प्रशासनाविरोधातील संतापामुळे रात्री उशिरापर्यंत तणाव कायम होता.

आंदोलनस्थळी कॉंग्रेसचे नेते अभ्युदय मेघे. सेलू पंचायत समितीचे माजी सभापती अशोक मुडे. जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सौरभ शेळके. सतीश भावरकर यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. शासन आता रायपूरच्या आक्रोशाची दखल घेऊन ठोस निर्णय घेणार की पुन्हा केवळ आश्वासनांवर बोळवण करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बळीराजाच्या कृतज्ञतेचा सोहळा थाटात

## वर्धेच्या रामनगर आणि आर्वी नाका चौकातील पोळ्याला जत्रेचे स्वरूप



**वर्धा जनमाध्यम :** शेतकऱ्याच्या जीवनात बैल म्हणजे केवळ पशू नव्हे तर सुखदुःखाचा साथीदार. याच भावनेतून गुरुवार १० सप्टेंबर रोजी जिल्ह्यात बैलपोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

वर्धा शहरातील रामनगर येथील सर्कस मैदान आणि आर्वी नाका चौकातील पोळ्याला नागरिकांची मोठी गर्दी झाली. सजविलेल्या बैलजोड्या आणि ढोल ताशांच्या गजराने परिसर दुमदुमून गेला.

रामनगरच्या पोळ्यात कृषी प्रदर्शनासह विविध वस्तूंची दुकाने थाटण्यात आली होती. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले पालकमंत्री डॉ. पंकज भोयर राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल नगराध्यक्ष सुधीर पांगूळ आणि उपाध्यक्ष प्रदीपासिंग ठाकूर यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला.

पूजा अर्चेनंतर बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून शेतकऱ्यांनी आपल्या कष्टकरी सोबत्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. बोरगाव मेघे सिंदी मेघे पालोती शांतिनगर सेवाग्राम नालवाडी आणि पिपरी मेघे परिसरातही पोळ्याचा उत्साह पाहायला मिळाला.

# कंत्राटदाराची मनमानी की यंत्रणेचे दुर्लक्ष ? दोरखंडावर वीज खांब उभारणी

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील थार ते चामला आणि पुढे बांबरडा मार्गावर विद्युत खांब उभारणीचे काम सुरू आहे. मात्र या कामात सुरक्षेचे नियम अक्षरशः धाब्यावर बसविल्याचे धक्कादायक चित्र उपस्थित झाला आहे.

**वाहतूक सुरू आणि मृत्यूशी खेळ-** खांब उभारणीच्या ठिकाणाहून दुचाकी चारचाकी आणि अन्य वाहने सुरू असतानाच ये जा करत होती. दोरखंड निसटला किंवा खांब



समोर आले आहे. रस्त्यावरून वाहतूक सुरू असतानाच मजूर केवळ दोरखंडाच्या भरोशावर मोठे लोखंडी विद्युत खांब उभारताना दिसून आले. हा प्रकार कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

खांब उभारताना चार ते पाच मजूर दोरखंडाच्या साहाय्याने खांब उभा करत होते. मात्र हेल्मेट सुरक्षा बेल्ट हातमोजे अथवा अन्य आवश्यक सुरक्षा साधने दिसून आली नाहीत. संबंधित मजुरांना या धोकादायक कामाचे प्रशिक्षण आहे का याबाबतही प्रश्न कोसळला तर मजुरांसह वाहनचालकांच्याही जीवावर बेतू शकते. खांबाच्या पायाभरणीचे काम नियमानुसार झाले आहे का याचीही तांत्रिक तपासणी गरजेची आहे. काम पूर्ण करण्याची घाई की सुरक्षेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असा संतप्त प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे. संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून सुरक्षा उपायांची अंमलबजावणी करावी अन्यथा दुर्घटनेनंतर जागे होण्याची वेळ येऊ नये अशी मागणी होत आहे.

# हिंगणघाटमध्ये आज तान्हा पोळा

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरातील कारंजा चौकात प्रसिद्ध असलेल्या तान्हा पोळ्याचे आयोजन आज करण्यात आले आहे. सराफा व्यावसायिक तथा शिवसेनेचे माजी पदाधिकारी स्वर्गीय अजितबाबू मुनोत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ यंदाही नंदीपोळा अर्थात छोटा पोळा निमित्त नंदी सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या बालकांसाठी आकर्षक बक्षिसांची व्यवस्था करण्यात आली असून चार रेंजर सायकली पुरस्कार म्हणून देण्यात येणार आहेत. त्यामुळे बालकांनी आपापले नंदी आकर्षक पद्धतीने सजवून स्पर्धेत सहभागी व्हावे आणि आपले कलागुण सादर करावेत असे आवाहन करण्यात आले आहे.

तान्हा पोळ्याच्या माध्यमातून बालकांमध्ये आपल्या संस्कृती आणि परंपरेविषयी आवड निर्माण व्हावी तसेच स्वर्गीय अजितबाबू मुनोत यांच्या स्मृती जपल्या जाव्यात या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

बालकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन स्पर्धेची शोभा वाढवावी आणि पुरस्काराचा मान मिळवावा असे आवाहन अभिनंदन अजितकुमार मुनोत यांनी पोळा कमिटीच्या वतीने केले आहे.

# विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी आंदोलनाचा एल्गार; सुजात आंबेडकर मैदानात

## सहा विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल करून निष्कासन केल्याचा आरोप

**वर्धा जनमाध्यम :**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मूलभूत सुविधांसाठी सुरू केलेल्या आंदोलनाला गुरुवारी वंचित बहुजन आघाडीचे राज्य कार्यकारिणी सदस्य सुजात आंबेडकर यांनी प्रत्यक्ष सहभागी होत पाठिंबा दिला. विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातील सुविधा आणि जेवणाच्या गुणवत्तेसह विविध प्रश्नांवरून आंदोलन पेटले असून प्रशासनाच्या भूमिकेविरोधात विद्यार्थ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे.



विद्यार्थ्यांच्या आरोपानुसार विद्यापीठ प्रशासनाने दलित आणि बहुजन समाजातील सहा विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल करून त्यांना विद्यापीठ आणि वसतिगृहातून निष्कासित केले आहे. चांगले वसतिगृह आणि दर्जेदार जेवणाची मागणी करणे हा विद्यार्थ्यांचा अधिकार असताना त्यांच्यावर कारवाई का करण्यात आली असा प्रश्न आंदोलनकर्त्यांकडून उपस्थित करण्यात आला.

गुरुवारी सुजात आंबेडकर यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांशी विविध प्रश्नांवर चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या मागण्या जाणून घेत त्यांनी आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी शेवटपर्यंत लढा देणार असल्याचे आंबेडकर यांनी यावेळी सांगितले. प्रशासनाने मागण्या मान्य करून विद्यार्थ्यांवरील कारवाई मागे घ्यावी अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

# सेवाग्राममध्ये जुगार अड्ड्यावर धाड

## सहा जणांना अटक ११ लाखांचा मुद्देमाल जप्त

**सेवाग्राम जनमाध्यम:** एमआयडीसी परिसरातील सिमेंट विटा बनविणाऱ्या कंपनीच्या मोकळ्या टिनाच्या शेडमध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर सेवाग्राम पोलिसांनी बुधवारी धाड टाकली. या कारवाईत सहा जणांना अटक करून रोख रकमेसह ११ लाख ५ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



गोपनीय माहितीच्या आधारे ठाणेदार देवेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सापळा रचला. पंचांसमक्ष छापा टाकला असता सहा जण पैशांच्या हारजितीवर पत्त्यांचा जुगार खेळताना आढळले.

गजानन मनोहर गिरडकर हेमंत देवचंद सावरकर भुषण अर्जुनराव वैद्य तिघेही रा बोरगाव मेघे तसेच अब्दुल रजा अब्दुल रउफ रा आनंदनगर अयान रहीम शेख रा आर्वी नाका आणि समीर रूस्तम सय्यद रा बोरगाव मेघे यांना ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांनी १३ हजार रुपये रोख ५२ पत्ते दोन टेबल फॅन प्लास्टिक खुर्च्या टेबल मोटारसायकल कार आणि मोबाईल असा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू आहे.

# महावितरणच्या कर्मचाऱ्यास मारहाण भोवली: आरोपीविरुद्ध सावंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**वर्धा जनमाध्यम :** दहेगाव मिस्कीन येथे कर्तव्य बजावत असताना महावितरणच्या वरिष्ठ तंत्रज्ञास मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी पीडित कर्मचाऱ्याच्या तक्रारीवरून सावंगी (मेघे) पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरुवार ९ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी वर्धा ग्रामीण-२ शाखेचे वरिष्ठ तंत्रज्ञ संजय दशरथ घोगरे (वय ४२) हे दहेगाव मिस्कीन परिसरात वसुली, देखभाल दुरुस्ती आणि स्मार्ट मीटर बदलण्याचे काम करत होते. यापूर्वी संबंधित परिसरात महावितरणतर्फे वीज चोरी तपासणी मोहीम राबवण्यात आली होती, ज्यामध्ये वीज चोरी निदर्शनास आली होती.

दरम्यान, दुपारी ४:३० वाजेच्या सुमारास आरोपी नितीन पोहणकर (रा. दहेगाव मिस्कीन) याने घोगरे यांना फोनवरून शिवीगाळ करत धमकी दिली. त्यानंतर सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास ११ केव्ही तिगाव कृषीवाहिनीच्या देखभालीचे काम करत असताना आरोपीने तिथे येऊन 'माझ्या घरी स्मार्ट मीटर का लावले असा प्रश्न विचारत कोणतीही चर्चा न करता अचानक हल्ला केला. गाडीला अडकवलेल्या डि.ओ. रॉडने कर्मचाऱ्याच्या डाव्या हातावर मारहाण केली तसेच तोंडावर व डोक्यावर थापडा मारून जीवे मारण्याची धमकी दिली.

या घटनेची माहिती मिळताच महावितरणच्या वर्धा ग्रामीण-२ उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता बहादूरे, सहाय्यक अभियंता लोहे, अंजी शाखेचे कनिष्ठ अभियंता कायरकर, येळाकेळी शाखेचे कनिष्ठ अभियंता बागेश्वर आणि वर्धा ग्रामीण-२ शाखेचे सर्व जनमित्र मोठ्या संख्येने सावंगी पोलीस ठाण्यात उपस्थित झाले.

घडलेल्या घटनेबाबत संजय घोगरे यांनी वैद्यकीय प्रमाणपत्रासह सावंगी (मेघे) पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध लेखी तक्रार नोंदवली. पोलिसांनी या प्रकरणी त्वरित गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. शासकीय कर्मचाऱ्यांवर होणारे असे हल्ले अत्यंत गंभीर असून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# अखेर...पावडे चौकावर राजकीय वरवंटा फिरला

## कागदोपत्री दत्ताजी मेघे चौक मात्र नागरिकांच्या ओठांवर 'पावडे चौक'च

**वर्धा जनमाध्यम :** अखेर पावडे चौकाचे नामकरण दत्ताजी मेघे चौक असे करण्यात आले. गुरुवारच्या जनमाध्यममध्ये 'पावडे चौकाच्या नावावर राजकीय वरवंटा' या शीर्षकाखाली वृत्त प्रकाशित झाले होते. या वृत्ताचे नागरिकांनी स्वागत केले. मात्र राजकीय अट्टहासापुढे पावडे चौकाचे नाव बदलण्याचा निर्णय अखेर मार्गी लागला. नामकरण झाले असले तरी नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारातून पावडे चौकाचे नाव पुसले जाणार का हा खरा प्रश्न आहे.



नामकरण सोहळ्यात सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांनी दत्ताजी मेघे यांच्या आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रातील योगदानाचा गौरव केला. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्यासह आमदार आणि नगर परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते. दत्ताजी मेघे यांनी वर्ध्यात आरोग्यसेवेच्या क्षेत्रात मोठे योगदान दिले असून त्यांचे कार्य अविस्मरणीय असल्याचे यावेळी सांगण्यात आले. दत्ताजी मेघे यांचा सन्मान करण्यास नागरिकांचा विरोध नाही. त्यांच्या कार्याचा गौरव व्हायलाच हवा.

**फलक बदलला म्हणून** मात्र एखाद्या परिचित चौकाचे नाव बदलताना नागरिकांची भावना आणि शहराची ओळख यांचाही विचार व्हायला हवा अशी चर्चा आता शहरात रंगली आहे.

**इतिहास बदलत नाही**

चौकाचा नामफलक बदलला असला तरी वर्षानुवर्षे नागरिकांच्या तोंडात रूजलेले पावडे चौक हे नाव सहजासहजी बदलणार नाही. रिक्षाचालक असो किंवा दुकानदार नागरिक असोत किंवा बाहेरून येणारा प्रवासी सर्वांच्या मुखातून पावडे चौक हेच नाव ऐकू येण्याची शक्यता आहे. कागदोपत्री मात्र आता हा परिसर दत्ताजी मेघे चौक म्हणून ओळखला जाणार आहे. त्यामुळे हा नामबदल प्रत्यक्षात किती रुजतो आणि केवळ सरकारी कागदांपुरताच मर्यादित राहतो हे येणारा काळच ठरवणार आहे.

# महिलांच्या सुरक्षेसाठी एसपींची नवी धावती ताकद | दामिनी पथकाला २५ दुचाकींचे बळ

**वर्धा जनमाध्यम :** महिलांनी भीतीच्या सावटाखाली जगावे ही समाजासाठी लाजिरवाणी बाब आहे. महिलांच्या सुरक्षेला अधिक प्रभावी बळ देण्यासाठी वर्धा जिल्हा पोलिसांनी दामिनी पथकाच्या हातात नवी धावती ताकद दिली आहे. जिल्हा नियोजन समितीच्या सहकार्याने दामिनी पथकासाठी २५ टीव्हीएस ज्युपिटर दुचाकी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या वाहनांचा हस्तांतरण सोहळा गुरुवारी जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या हस्ते पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर झाला.



महिलांना अडचणीच्या वेळी पोलिसांपर्यंत पोहोचण्यासाठी वाट पाहावी लागू नये यासाठी ही वाहने महत्त्वाची ठरणार आहेत. शाळा महाविद्यालये बाजारपेठा बसस्थानके आणि महिलांची वर्दळ असलेल्या परिसरात दामिनी पथकाची गस्त वाढणार आहे. छेडछाड किंवा महिलांच्या सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या घटनांवर तात्काळ प्रतिबंधात्मक कारवाई केली जाणार आहे.

वर्धा शहर हिंगणघाट आर्वी आणि पुलगाव पोलिस ठाण्यांना प्रत्येकी दोन दुचाकी तर इतर पोलिस ठाण्यांना प्रत्येकी एक दुचाकी देण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयातील दामिनी पथकालाही दोन वाहने देण्यात आली आहेत.

महिला व मुलींमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासोबतच कायदेशीर हक्क सायबर गुन्हे आणि सोशल मीडियाच्या सुरक्षित वापराबाबत जनजागृती केली जाणार आहे. महिलांनी त्रास सहन न करता दामिनी हेल्पलाईन ७६२०५२००२५ किंवा पोलीस हेल्पलाईन ११२ वर संपर्क साधावा असे आवाहन पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनी केले.

paper www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# ‘हाउस ऑफ लॉर्ड्स’मध्ये शिवरायांचा जयघोष





**लंडन/वृत्तसंस्था :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना ल?र्ड्स ऑफ हाउसमध्ये विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. जगभरातील नेत्यांच्या आवाजाने दुमदुमलेल्या ब्रिटनच्या संसदेतील वरिष्ठ सभागृह हाउस ऑफ लार्डसमध्ये आज जय महाराष्ट्रचा निनाद घुमला. एकनाथ शिंदेंना कामनवेल्थ पब्लिक लीडरशिप रिकग्निशन या प्रतिष्ठेच्या सन्मानाचे गौरविण्यात आले. या ऐतिहासिक सभागृहात मराठी भाषेचा एकच गजर झाला. विशेष म्हणजे यावेळी आपल्या भाषणाची सुरु वात नमस्कार- जय महाराष्ट्र अशी मराठीतून करून एकनाथ शिंदे यांनी भाषेचा अभिमान तर व्यक्त केलाच, पण महाराष्ट्राच्या विकासाची कहाणीही मांडली. आई-पत्नीच्या काबाडकष्टांतून सर्वसामान्यांसाठी काम करण्याची माझी विचारसरणी घडली असे एकनाथ शिंदेंनी म्हणताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.

मुंबई आणि लंडन ही दोन्ही महत्त्वाची वित्तीय केंद्रे असून फिनटेक, ग्रीन एनर्जी, ग्रीन हायड्रोजन, डीप-टेक आणि कौशल्य विकास क्षेत्रात महाराष्ट्र-ब्रिटन सहकार्याला मोठी संधी असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. एकनाथ शिंदेंनी नमस्कार.. जय हिंद- जय महाराष्ट्र म्हणत आपल्या भाषणाची सुरु वात केली. तसेच, जय भवानी जय शिवाजी आणि भारत माता की जय.. अशी घोषणाबाजी करत भाषणाला सुरु वात केली.

रिस्पेक्टेड बेरोनेस म्हणत एकनाथ शिंदेंनी भाषणाच्या सुरु वातीलाच ब्रिटनच्या संसदेत मला भाषण करण्याची संधी मिळतेय हा माझ्यासाठी बहुमान असल्याचे म्हटले. तसेच, आपल्या भाषणात त्यांनी, महाराष्ट्र सरकाने जनहितासाठी केलेल्या कामाची माहिती देत, महिला सक्षमीकरणावर भर दिला. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही महाराष्ट्रातील गेमचेंजर योजना ठरल्याची माहिती त्यांनी दिली. एकनाथ शिंदेंना देण्यात आलेल्या पुरस्काराबात त्यांनी आभार मानले, तसेच, महाराष्टाच्या १२ कोटी लोकांचा हा सन्मान असल्याचे त्यांनी म्हटले. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विकसित भारत २०४७ च्या ध्येयाचा उल्लेख करत महाराष्ट्राने विकासाची गती पडकली आहे. मुंबई आणि लंडन हे जगातील दोन मोठे आर्थिक केंद्र असल्याचेही त्यांनी म्हटले.

**सुरेश भटांच्या कवितेचा उल्लेख**

एकनाथ शिंदेंनी आपल्या भाषणात सुरेश भटांच्या कवितेचा उल्लेख केला, लाभले आम्हास भाग्य जाणतो मराठी ही कविता म्हणून दाखवत मातृभाषण मराठी आणि महाराष्ट्राची ओळख ब्रिटनच्या संसदेला करु न दिली. तसेच, मुख्यमंत्रीपदाच्या त्यांच्या कार्यकाळात करण्यात आलेल्या विविध योजनांचा उल्लेख आणि जनहितासाठी या योजनांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या अंमलबजावणीची माहिती दिली.

**इंग्रजीने लक्ष वेधले-** इट इज अ पिपल सेंट्रीक अप्रोच ऑफ टू द पब्लिक सर्व्हीस म्हणत एकनाथ शिंदेंनी फाडफाड इंग्रजीतून केलेल्या आपल्या भाषणाने सर्वांचे लक्ष वेधले. महाराष्ट्रातील गेमचेंजर लाडकी बहीण योजना ही काही चॅरिटी नाही तर महिलांच्या सबलीकरणाची योजना बनली. जागतिक स्तरावरील संस्थांकडून लाडकी बहीण योजनेची दखल झाल्याचे उपमुख्यमंत्र्-यांनी म्हटले. त्यासह, शासन आपल्या दारी योजनेमुळेही लाखो लोकांचा फायदा झाला,केवळ रस्ते बांधणे म्हणजे विकास नाही, तर विकास लोकांपर्यंत पोहोचणे महत्वाचे असते, असेही एकनाथ शिंदेंनी म्हटले.

# सर्व प्रशासकीय अधिका-यांना दुपारी कार्यालयात हजर राहणे बंधनकारक

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने प्रशासकीय अधिका-यांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून आता जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार यांना गुरूवार दि. १० सप्टेंबरपासून स्वतः च्या कार्यालयात दुपारी ३ वा ते ५ वा पर्यंत नागरिकांच्या प्रशासकीय अडी अडचणीसाठी थांबावेच लागणार असून या संदर्भातील शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाने जारी केला आहे.



प्रशासनाला अधिक लोकाभिमुख करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व कार्यालयप्रमुखांना सोमवार ते शुक्रवार दररोज दुपारी ३ ते ५ या वेळेत आपल्या कार्यालयात हजर राहून नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. नागरिकांच्या तक्रारींचे स्थानिक व क्षेत्रीय पातळीवरच जलद, प्रभावी आणि कायदेशीर पद्धतीने निराकरण व्हावे असे कडक निर्देश लेखी पत्राद्वारे दिले आहेत. या भेटीच्या वेळेत प्राप्त होणा-या प्रत्येक तक्रारीची त्वरित नोंद घेउन नियमानुसार तात्काळ कार्यवाही करावी, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. नागरिकांना ही वेळ सहज समजावी यासाठी प्रत्येक कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर आणि दालनाबाहेर अभ्यागतांची भेट घेण्याची वेळः सोमवार ते शुक्रवार, दुपारी ३ ते ५ असा स्पष्ट फलक लावणे

**अनिवार्य करण्यात आले आहे.**

नागरिकांना आपल्या छोट्या-मोठ्या कामांसाठी जिल्हा मुख्यालय किंवा मंत्रालयाचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी तालुका व क्षेत्रीय स्तरावरच कार्यक्षम तक्रारनिवारण यंत्रणा राबविण्याच्या सूचना सर्व उपविभागीय, तहसील व शाखा कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.

**महसूल मंत्री केव्हाही देणार भेट**

महसूल मंत्री स्वतः कोणत्याही कार्यालयाला अचानक भेट देउन या नियमांच्या अंमलबजावणीची तपासणी करणार आहेत. त्यामुळे या आदेशात हलगर्जी आढळल्यास संबंधित अधिकारी व कर्मचा-यांना वैयक्तिक्ररित्या जबाबदार धरू न कठोर कारवाई केली जाईल, असा सज्जड इशाराही जिल्हाधिका-यांना दिला आहे.

**कसे आहे नियोजन?**

वेळ : दररोज दुपारी ३.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.

उद्देश : शासकीय कामांसाठी येणा-या सामान्य जनतेला किंवा शेतक-यांना अधिकारी जागेवर न मिळाल्यामुळे मनस्ताप सहन करावा लागू नये आणि त्यांच्या तक्रारींचे निवारण जलद गतीने व्हावे.

**अंमलबजावणी :** या राखीव वेळेत अधिका-यांनी कार्यालयात थांबून नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकणे व त्यावर कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

# तहसील कार्यालयातच ‘बैलपोळा’

## कोरडा दुष्काळ जाहीर करण्यासाठी शेतकरी आक्रमक



**वाशिम/प्रतिनिधी :** पावसाचा मोठा खंड पडल्याने पिके धोक्यात आली असून बळीराजापुढे मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर सरसकट दुष्काळ जाहीर करावा, नुकसानग्रस्त पिकांचे सर्व्हे करू न शेतक-यांना आर्थिक मदत द्यावी यासह विविध मागण्यांसाठी शेतकरी आक्रमक झाले आहेत. वाशीम जिल्ह्यातील मानोरा येथे पोळा या सणाच्या दिवशी शेतक-यांनी आपल्या मागण्यासाठी चक्क तहसील कार्यालयात बैल पोळा भरवला आणि शासनाचे लक्ष वेधले.

**दुष्काळामुळे बळीराजा चिंतेत; पोळा सणाचा उत्साह मावळला-** कृषिप्रधान संस्कृतीतील महत्वाचा सण म्हणजे पोळा. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात ट्रॅक्टरमुळे बैलांचे कृषी क्षेत्रातील कार्य कमी झाले तरी शेतक-यांकडून आजही परंपरेनुसार बैलपोळा सण उत्साहात साजरा केला जातो. पोळ्यानिमित्त बैलांच्या खांद्याला हळद व तुपाने शेकतात, पाठीवर नक्षीकाम केलेली झूल, गेरूचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या व घुंगरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा पायात तोडे घालतात. गोड पुरणपोळी व सुग्रास अन्नाचा नैवेद्य दाखवला जातो. पोळ्यानिमित्त बैलांचा थाट असतो. यंदा मात्र पोळा सणावर दुष्काळाचे सावट दिसून आले. दुष्काळ सदृश्य परिस्थितीमुळे बळीराजा चिंतेत असून पोळा सणाचा उत्साह मावळल्याचे चित्र होते.

**पावसाच्या खंडामुळे पिकांचे मोठे नुकसान**

अल-निनोच्या वातावरणीय बदलामुळे पर्जन्यमान कमी व असंतुलित आहे. पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. पावसाअभावी जलस्रोतांमधील जलसंचय कमी होत असल्याने सिंचन व पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला. जलसाठ्यामध्ये सातत्याने घट होत आहे. गत महिन्याभरापासून पावसाचा खंड पडला. त्यामुळे खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस, तूर, उडीद तसेच इतर खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतक-यांना गंभीर आर्थिक फटका बसला आहे. ही सर्व परिस्थितीत शेतक-यांसमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे.

**बैलांचे तहसील कार्यालयात विधिवत पूजन**

पावसाच्या खंडामुळे विपरित परिस्थिती लक्षात घेता सरसकट दुष्काळग्रस्त जाहीर करावा, शेतक-यांच्या शेतीपिकांचे तात्काळ पंचनामे व सर्वेक्षण करावे आणि नुकसानग्रस्त शेतक-यांना प्रति हेक्टरी एक लाख रु पये अनुदान मंजूर करावे, अशी मागणी शेतक-यांनी केली आहे. आंदोलनात परिवर्तन शेतकरी संघटनेचे मनोहर राठोड, संजय महाराज यांचेसह अनेक शेतकरी उपस्थित होते. तहसील कार्यालयावर पोळा भरविण्यात आल्याने या वेळी आलेल्या बैलांचे तहसीलदार राजेंद्र पाटील यांनी विधिवत पूजन केले.

## IRCTC मनी लॉड्रिंग प्रकरण

# लालू-तेजस्वी यांच्यासह 9 जणांवर आरोप निश्चित

**पाटणा/वृत्तसंस्था :**IRCTC मनी लान्ड्रिंग प्रकरणात लालू कुटुंबाच्या अडचणी वाढल्या आहेत. दिल्लीतील राउस एव्हेन्यू कोर्टाने गुरु वारी लालू, तेजस्वी, राबडी यांच्यासह ९ जणांविरुद्ध आरोप निश्चित केले. कोर्टाने ७ आरोपींना निर्दोष मुक्त केले आहे. या प्रकरणात ईडीने १६ जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले होते. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३ ऑक्टोबर रोजी होईल.

कोर्टाने म्हटले-राबडी देवी आणि तेजस्वी यादव यांच्याकडे गुन्हेगारीतून मिळवलेले उत्पन्न आणि पदाचा गैरवापर केल्याचा प्रबळ संशय आहे. दोघेही पाटण्यातील त्या जमिनीचा लाभ घेत आहेत, जी कथितरित्या २००५ ते २०१४ दरम्यान लालू यादव यांच्या सांगण्यावरून त्यांच्या नावे हस्तांतरित करण्यात आली होती. तेव्हा लालू रेल्वे मंत्री होते. कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशाला दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.लालू कुटुंबाने कनिष्ठ न्यायालयाच्या ऑक्टोबर २०२५ च्या त्या आदेशाला दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान दिले होते, ज्यात त्यांच्याविरु द्ध भ्रष्टाचाराचे आरोप निश्चित करण्यात आले होते.

केंद्रीय तपास ब्युरो (CBI) ने या याचिकेला विरोध करत न्यायालयात सांगितले की, त्यांच्याकडे प्रकरणाशी संबंधित पुरेसे आणि ठोस पुरावे आहेत. क्एक्ष ने सांगितले की, तपासात अनेक महत्त्वाचे दस्तऐवज आणि पुरावे समोर आले आहेत, जे आरोपांना बळकटी देतात.

> दिल्ली न्यायालयाने 7 आरोपींना निर्दोष मुक्त केले
> हाटेल निविदांशी संबंधित प्रकरण

**ED ने आरोपपत्र दाखल केले आहे-**अंमलबजावणी संचालनालय ने लालू प्रसाद यादव यांच्या कुटुंबासह इतर आरोपींविरु द्ध आरोपपत्र दाखल केले आहे. यात माजी रेल्वे मंत्री लालू प्रसाद यादव, राबडी देवी आणि तेजस्वी यादव यांच्यासह अनेक लोकांना आरोपी बनवण्यात आले आहे. हे प्रकरण त्यावेळेचे आहे, जेव्हा लालू प्रसाद यादव केंद्र सरकारमध्ये रेल्वे मंत्री होते. आरोप आहे की, त्यांच्या कार्यकाळात क्ष्डक्त्क्र अंतर्गत येणा-या रांची आणि पुरी येथील दोन हाटेल्सच्या निविदांमध्ये अनियमितता करण्यात आली. तपास यंत्रणांनुसार, या हाटेल्स आणि त्यांच्याशी संबंधित जमिनी खाजगी कंपन्यांना नियमांकडे दुर्लक्ष करून भाडेपट्ट्यावर देण्यात आल्या. या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव होता आणि यामुळे काही खाजगी कंपन्यांना अयोग्य लाभ मिळाला.



**१६ आरोपी आणि कंपन्या प्रकरणात सामील-** या प्रकरणात M/s Lara Projects LLP, राबडी देवी, तेजस्वी यादव, लालू प्रसाद यादव, सरला गुप्ता, प्रेम चंद गुप्ता, गौरव गुप्ता, नाथ मल ककरानिया, राहुल यादव, विजय त्रिपाठी, देवकी नंदन तुलस्यान, M/s Sujata Hotels, विनय कोचर, विजय कोचर, राजीव कुमार रेलन आणि M/s Abhishek Finance Private Limited आरोपी आहेत. यापैकी न्यायालयाने ७ लोकांना आरोपांमधून मुक्त केले आहे.

**न्यायालयाने म्हटले होते- लालू यादव यांच्या माहितीने रचलेला कट**

राउज एव्हेन्यू कोर्टने १३ ऑक्टोबर रोजी आपल्या आदेशात म्हटले होते की, या संपूर्ण टेंडर घोटाळ्याचा कट लालू यादव यांच्या माहितीनुसार रचण्यात आला होता. न्यायालयानुसार, टेंडर प्रक्रियेत त्यांचा हस्तक्षेप होता आणि यामुळे त्यांच्या कुटुंबाला आर्थिक फायदा झाला. कोर्टाने याच आधारावर लालू यादव, राबडी देवी आणि तेजस्वी यादव यांना आरोपी मानून त्यांच्याविरु द्ध खटला चालवण्याचा निर्णय घेतला होता.

**लालू कुटुंबाने आरोप निराधार असल्याचे म्हटले-** दुसरीकडे, लालू प्रसाद यादव यांनी हे सर्व आरोप पूर्णपणे फेटाळून लावले आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, हे प्रकरण राजकीय कटाचा भाग म्हणून त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला अडकवण्यासाठी तयार करण्यात आले आहे. त्यांनी न्यायालयातही आपली निर्दोषता सिद्ध करण्याचा दावा केला आहे.

# आम आदमी पार्टीची अवस्था बायफ्रेंडने सोडलेल्या गर्लफ्रेंडसारखी-चड्ढांची टीका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**दिल्लीच्या मतदार यादीत नावाचा समावेश झाल्यावरु न उपस्थित होणा-या प्रश्नांवरु न आम आदमी पार्टीमधून भारतीय जनता पार्टीत पक्षांतर केलेल्या खासदार राघव चड्ढा यांनी आपला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. आम आदमी पार्टीची अवस्था बायफ्रेंडनं सोडलेल्या गर्लफ्रेंडसारखी झालीय, अशी बोचरी टीका चड्ढांनी केली. राघव चड्ढा यांनी चंदिगढ येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. आम आदमी पार्टी एक्स-गर्लफ्रेंडसारखी वागतेय, बायफ्रेंड मात्र पुढे निघून गेलाय, असे चड्ढा यावेळी आपवर टीका करताना म्हणाले. आप माझीच स्वप्नं पाहतंय, माझचं नाव वारंवार घेतंय. मी आयुष्यात पुढे निघून गेलो तरी ते अजूनही माझच नाव घेत आहेत. माझ्यामुळे त्यांना वेड लागेल अशी स्थिती झाली आहे. मला काळजी वाटते की एके दिवशी, एखाद्या प्रेमभंग झालेल्या प्रियकराप्रमाणे, ते माझ्या आठवणीत स्वतःच्या नसा कापून घेतील, असे चड्ढा पुढे म्हणाले. निवडणूक आयोगाने राघव चड्ढा यांचे नाव पंजाबमधून कमी करु न दिल्लीच्या मतदार यादीत समाविष्ट केले. यावर चड्ढा यांनी स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी आपने केल्यानंतर चड्ढा यांची ही प्रतिक्रिया समोर आली आहे. चड्ढा यांनी यासाठी निवडणूक आयोगाकडे सादर केलेला अर्ज ६ सार्वजनिक करावा आणि त्यावर हरकती घेण्याची संधी द्यावी, अशी मागणी आपने केली आहे. आपचे राष्ट्रीय माध्यम प्रभारी अनुराग धंडा यांनी पत्रकार परिषदेत बोलताना, चड्ढा यांनी अर्ज ६ कधी आणि कुठे दाखल केला? याची निवडणूक आयोगाने माहिती द्यावी, अशी मागणी केली. १ ते ७ सप्टेंबर या कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जांमध्ये चड्ढा यांच्या नावाचा समावेश नव्हता, असा दावाही धंडा यांनी केली आहे. ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत केवळ ७४६ क्रमांकापर्यंतच नोंदी असताना, चड्ढा यांचे नाव ७४६ च्या पुढे म्हणजेच ७४७ व्या क्रमांकावर कसे आले, असा सवालही धंडा यांनी उपस्थित केला.




# भारताकडे 190 अणुबॉम्ब

## 35 तयार करण्यायोग्य प्लुटोनियम देखील; समुद्रात बनवत आहेत ‘न्यूक्लियर कवच’

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**भारताकडे १९० अणुबॉम्ब आहेत. यापैकी १६० हून अधिक शस्त्रे अशा क्षेपणास्त्रे आणि इतर प्रणालींसाठी तयार आहेत, जी अणुबॉम्ब हल्ला करण्यास सक्षम आहेत. ही माहिती अमेरिकन थिंक टँक फेडरेशन ऑफ अमेरिकन सायंटिस्ट्स च्या नवीन अहवालात समोर आली आहे. अहवालानुसार, भारताकडे आणखी ३५ अणुबाम्ब बनवण्यासाठी पुरेसे प्लुटोनियम देखील आहे. याव्यतिरिक्त, समुद्रात ‘अणु कवच’ देखील तयार करत आहे. भारत आपली अणुशक्ती सातत्याने आधुनिक करत आहे. गेल्या काही वर्षांत अनेक नवीन अणु-सक्षम शस्त्रे सैन्यात समाविष्ट करण्यात आली आहेत. तर, काही नवीन शस्त्र प्रणाली अजूनही तयार केल्या जात आहेत. क्नक्ष चा अंदाज आहे की, येत्या काळात भारताच्या अणुबाम्बची संख्या वाढू शकते.

**भारताकडे ७३० किलो प्लुटोनियम**

अहवालानुसार, २०२६ च्या सुरुवातीपर्यंत भारताकडे सुमारे ७३० किलो शस्त्रे बनवण्यासाठी वापरले जाणारे प्लुटोनियम असण्याचा अंदाज आहे. अशा प्रकारे यामुळे २२५ वारहेडपर्यंत बनवता येउ शकतात. तथापि, अहवाल स्वता स्पष्ट करतो की, हा केवळ अंदाज आहे, वास्तविक संख्या वारहेडच्या डिझाइनवर आणि राखीव ठेवलेल्या सामग्रीवर अवलंबून असते. भारताने अग्नि-ज मध्ये ग्क्ष्डज तंत्रज्ञानाची चाचणी केली आहे. याचा अर्थ एका क्षेपणास्त्रामध्ये अनेक वारहेड वाहून नेण्याची क्षमता विकसित करणे आहे, ज्यांना वेगवेगळ्या लक्ष्यांकडे पाठवता येउ शकते. २०२४ नंतर मे २०२६ मध्येही अनेक पेलोडसह चाचणी झाली. FAS चा अंदाज आहे की, अग्नि-V कदाचित तीन वारहेड वाहून नेउ शकते, तथापि असे केल्यास तिची कमाल श्रेणी प्रभावित होउ शकते. एप्रिल २०२६ मध्ये भारताच्या ५०० मेगावाट प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिअक्टर ने पहिल्यांदा क्रिटिकॅलिटी प्राप्त केली. FAS च्या अंदाजानुसार, ८०% क्षमतेने चालल्यास हे सैद्धांतिकदृष्ट्या वर्षाला सुमारे १४० किलो प्लुटोनियम-२३९ तयार करू शकते. यातून सुमारे ३५ वारहेड बनू शकतात. पुढे असे आणखी फास्ट ब्रीडर रिक्टर्सची योजना आहे. मार्च २०२४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिक्टरच्या नियंत्रण कक्षाला भेट दिली होती.



**जमिनीसोबत समुद्रातही वाढतेय ताकद**

भारताचे अणु कवच आता समुद्रातही मजबूत होत आहे. अणु पाणबुडी INS अरिधमान एप्रिल २०२६ मध्ये नौदलात सामील झाली. FAS नुसार, यात ८ क्षेपणास्त्र ट्यूब आहेत, तर INS अरिहंत आणि INS अरिघातमध्ये प्रत्येकी ४ ट्यूब आहेत. अशीच आणखी एक पाणबुडी २०२७ मध्ये सामील होण्याची योजना आहे.



# Women's Asia Cup 2026
# बांगलादेशला लोळवत टीम इंडियाची फायनलमध्ये धडक

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने पहिल्या सेमीफायलमध्ये बांगलादेशचा धुव्वा उडवत दिमाखात फायनल गाठली. फलंदाजीत शफाली वर्माच्या धमाकेदार खेळीनंतर गोलंदाजीत दीप्ती शर्मानं कमालीच्या गोलंदाजीचा नजराणा पेश केला. या विजयासह भारतीय संघाने प्रत्येक हंगामात फायनल खेळण्याचा आपला सिलसिला कायम ठेवला. दुबईच्या मैदानात रंगलेल्या पहिल्या सेमीफायनलमध्ये नाणेफेक जिंकून बांगलादेशच्या संघाने पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. स्फोटक सलामीवीर शफाली वर्माच्या ६४ धावांच्या दमदार खेळीच्या जोरावर भारतीय संघाने निर्धारित २० षटकात ६ विकेट्सच्या मोबदल्यात १४९ धावा करत बांगलादेशसमोर १५० धावांचे लक्ष्य ठेवले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना बांगलादेशचा संघ ७ विकेट्सच्या मोबदल्यात १०९ धावांपर्यंतच मजल मारता आली.

# बिहारमधील 14 जिल्ह्यांमध्ये पूर, 40 लाख लोक प्रभावितः शरयूमध्ये अनेक घरे वाहून गेली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बिहारमध्ये सलग पाच दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे १४ जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. ४० लाखांहून अधिक लोक प्रभावित झाले आहेत. यामध्ये सर्वाधिक लोक पाटणा, भोजपूर, सारण, वैशाली, भागलपूर आणि बेगुसराय येथील आहेत. हवामान विभागाच्या मते, सप्टेंबरमध्ये आतापर्यंत बिहारमध्ये ८३.६ मिमी पाउस झाला आहे. हा सामान्यपेक्षा २४ऽ जास्त आहे.

भागलपूरच्या सुलतानगंजमध्ये गंगेचे पाणी ३६.७८ मीटरपर्यंत पोहोचले आहे. हे २०२१ मध्ये नोंदवलेल्या ३६.७५ मीटरच्या सर्वोच्च पातळीपेक्षाही जास्त आहे. येथे तिलकामांझी विद्यापीठात गंगेचे पाणी शिरले आहे. शिक्षक आणि विद्यार्थी ये-जा करण्यासाठी बोटीचा वापर करत आहेत. दुसरीकडे, उत्तर प्रदेशातील २६ जिल्ह्यांना पुराचा फटका बसला असून सुमारे ४ लाख लोक प्रभावित झाले आहेत. सततच्या पावसामुळे नद्या दुथडी भरू न वाहत आहेत. बरेलीमध्ये एक प्राचीन मंदिर रामगंगेत बुडाले, तर बाराबंकीमध्ये शरयू नदीच्या पाण्यात सुमारे १२ घरे बुडाली. फरु खाबादमध्ये १० दिवसांत १५ घरे गंगेत वाहून गेली आहेत. तर, मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये सध्या पावसाचा जोर थांबला आहे. मध्य प्रदेशात पुढील ३ दिवस जोरदार पावसाची शक्यता नाही. राजस्थानमध्ये ११ सप्टेंबरपासून पाउस सुरू होण्याचा अंदाज आहे. बुधवारी येथे १० शहरांमध्ये तापमान ३५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त होते. यूपीच्या गोंडा जिल्ह्यात घागरा नदीला पूर आल्याने ३० गावांची २५ हजार लोकसंख्या पुराच्या विळख्यात सापडली आहे.उत्तराखंडमधील बागेश्वर कपकोट रोडवरील आरे गावाजवळ डोंगरावरू न सतत दगड कोसळल्याने महामार्ग बंद झाला आहे. बिहारमधील खगडिया जिल्ह्यातील गावांमध्ये कंबरेपर्यंत पाणी भरले आहे. ये-जा करण्यासाठी बोटीचा वापर करत आहेत.

मध्य प्रदेशातील इटारसीमध्ये मुसळधार पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचले आहे. उत्तराखंडमध्ये आज डेहराडून, टिहरी, नैनिताल, बागेश्वर आणि पिथोरगड येथे तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हरिद्वार, पौरी आणि उत्तरकाशी येथे हलका ते मध्यम पाउस आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. राज्याच्या इतर अनेक भागांमध्येही हलका ते मध्यम पाउस अपेक्षित आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह मुसळधार पावसाची शक्यता आहे.

**मध्य प्रदेशः मान्सून कमजोर, मुसळधार पाउस थांबला-** मध्य प्रदेशात सध्या कोणतीही सक्रिय पर्जन्यप्रणाली नसल्यामुळे मुसळधार पाउस थांबला आहे. बुधवारी राज्याच्या बहुतांश भागांमध्ये स्वच्छ सूर्यप्रकाश होता. गुरु वारीही असेच हवामान अपेक्षित आहे. काही ठिकाणी हलका पाउस पडू शकतो, परंतु मुसळधार पावसाचा इशारा नाही. बिहारमधील पूरग्रस्त भागांमध्ये पाणी ओसरू लागले असले तरी, १४ जिल्ह्यांमधील ५१७ पंचायतींमध्ये पूरस्थिती गंभीर आहे. अंदाजे ४१.४५ लाख लोकांना याचा फटका बसला आहे. पाटणा ते मुंगेरपर्यंत गंगेची पाणी पातळी कमी झाली आहे, तर भागलपूरच्या काहलगावमध्ये पाणी पातळी ४ सेंटिमीटरने वाढली आहे. गंगेचे पाणी तिलका मांझी विद्यापीठात शिरल्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थी बोटीने प्रवास करत आहेत.


मुंगेर




खगड़िया, बिहार


भागलपुर

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## 'फिनटेक' धोरण

भारतातील आर्थिक व्यवहारांचे रूप गेल्या दशकात जितक्या वेगाने बदलले, तितक्या वेगाने त्या व्यवहारांची व्याप्ती बदलली नाही. भाजी विक्रेत्यांपासून पंचतारांकित हॉटेलपर्यंत 'क्यूआर कोड' पोहोचला. काही सेकंदांत एका खात्यातून दुसऱ्या खात्यात पैसे पाठवले जाऊ लागले; परंतु मोबाईलवरून महिन्याकाठी काही हजारांचे व्यवहार करणाऱ्या छोट्या व्यावसायिकांना सहज कर्ज मिळते का, पुरेसे विमा संरक्षण घेता येते का, निवृत्तीसाठी नियमित बचत करता येते का किंवा छोट्या रकमेत गुंतवणूक करता येते का, या प्रश्नांची उत्तरे समाधानकारक नाहीत. या पार्श्वभूमीवर मुंबईतील 'ग्लोबल फिनटेक फेस्ट'मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय फिनटेक कंपन्यांना पेमेंटच्या पलीकडे जाण्याचे केलेले आवाहन महत्त्वाचे आहे. भारताने यूपीआयच्या माध्यमातून डिजिटल पेमेंट क्रांती घडवली. आता त्या पायावर सर्वसमावेशक डिजिटल वित्तव्यवस्था उभारण्याची वेळ आली आहे. या व्यवस्थेने व्यवहारातील अनेक अडथळे दूर केले.छोट्या व्यावसायिकालाही या प्रणालीने डिजिटल अर्थव्यवस्थेत आणले. फेरीवाला,रिक्षाचालक, भाजी विक्रेता, घरकाम करणारी व्यक्ती अशा मोठ्या वर्गाचे आर्थिक व्यवहार प्रथमच नियमित डिजिटल नोंदीत येऊ लागले. ही सुधारणा कोट्यवधी लोकांना औपचारिक अर्थव्यवस्थेच्या दारापर्यंत आणणारी आहे; पण दारापर्यंत पोहोचणे आणि घरात प्रवेश मिळणे यात फरक असतो. एखाद्या छोट्या दुकानदाराच्या खात्यात रोज डिजिटल व्यवहार होत असतील,त्याची विक्री, रोखीचा प्रवाह याची माहिती उपलब्ध असेल, तरीही त्याला व्यवसायासाठी कर्ज घेताना पारंपरिक पद्धतीनुसार विविध कागदपत्रे,तारण, उत्पन्नाचा पुरावा, पत इतिहास यांच्या अडथळ्यांना सामोरे जावे लागते. याच ठिकाणी फिनटेकचा उपयोग प्रभावी ठरू शकतो. व्यवहारातून निर्माण होणाऱ्या माहितीच्या आधारे व्यवसायाची आर्थिक क्षमता अचूकपणे मोजता आली, तर पारंपरिक पतमूल्यांकनाच्या चौकटीबाहेर राहिलेल्या लहान उद्योजकांपर्यंत संस्थात्मक कर्ज पोहोचू शकते.देशातील 'स्ट्रक्चरल क्रेडिट डेफिसिट' भरून काढण्यासाठी छोट्या व्यवसायांच्या गरजेनुसार वित्तीय उत्पादने तयार करण्याचा पंतप्रधानांनी केलेला आग्रह याच वास्तवाशी जोडलेला आहे. हा प्रश्न फक्त दुकानदार किंवा सूक्ष्म उद्योगांचा नाही. वितरण कर्मचारी, कॅबचालक, स्वतंत्र व्यावसायिक, घरगुती सेवा देणारे कामगार, अल्पकालीन करारांवर काम करणारे तरुण अशांना नियमित मासिक वेतन, भविष्यनिर्वाह निधी किंवा आस्थापनांकडून विम्याचे कवच नसते. डिजिटल पेमेंटमध्ये मिळालेली सहजता या सेवांमध्ये आली, तर वित्तीय समावेशनाचा अर्थच बदलून जाईल.'खाते उघडणे म्हणजे वित्तीय समावेशन आणि व्यवहार करणे म्हणजे डिजिटल समावेशन' एवढ्यापुरती व्याख्या आता अपुरी ठरणार आहे. संकटाच्या वेळी कर्ज, आजारपणात विमा आणि वृद्धापकाळात उत्पन्नाची हमी यांच्यापर्यंत पोहोचणे हा त्याचा पुढचा टप्पा असला पाहिजे; मात्र पेमेंटच्या तुलनेत कर्ज, विमा आणि गुंतवणूक या सेवा अधिक गुंतागुंतीच्या, जोखमीच्या आहेत.कर्जात जोखीम असते, विम्यामध्ये दीर्घकालीन दायित्व असते, गुंतवणुकीत बाजार जोखीम असते, तर पेन्शनमध्ये अनेक दशकांची देयक जबाबदारी असते. म्हणून 'यूपीआय इतके सुलभ' हे आकर्षक ध्येय असले, तरी त्या सोपेपणामागील आर्थिक शिस्त तितकीच मजबूत असावी लागेल. काही क्लिकमध्ये कर्जाच्या सोयीचे रूपांतर अतिकर्जबाजारीपणात झाले, तर नवा आर्थिक सापळा तयार होऊ शकतो. विमा एका क्लिकवर विकता येतो; पण ग्राहकाला अटी-शर्ती न समजल्याने दावा नाकारला गेला, तर या प्रयत्नांना अर्थच उरणार नाही. या दृष्टीने स्वतंत्र 'फिनटेक कन्झ्युमर प्रोटेक्शन इंडेक्स' विकसित करण्याची पंतप्रधानांची सूचना विचार करण्याजोगी आहे. वित्तीय उत्पादनाचे मूल्यमापन ते किती वेगाने उपलब्ध होते, किती लोक वापरतात किंवा किती व्यवहार होतात एवढ्यावरच न होता, ग्राहकाला त्याची किंमत किती स्पष्टपणे सांगितली जाते, तक्रारी किती वेगाने सोडवल्या जातात, वैयक्तिक माहिती किती सुरक्षित राहते आणि चुकीच्या विक्रीपासून ग्राहकाला किती संरक्षण मिळते यावरही झाले पाहिजे. कारण डिजिटल अर्थव्यवस्थेत ग्राहकाचा विश्वास हेच सर्वांत मोठे भांडवल असते.बनावट कर्ज देणारे ॲप्स, बनावट गुंतवणूक योजना, ओटीपी फसवणूक, स्क्रीन शेअरिंग, खोटी ग्राहक सेवा यातून सामान्य ग्राहकाला लक्ष्य केले जाते. त्यामुळे सायबर सुरक्षा ही फिनटेक कंपन्यांच्या वित्तीय स्थैर्याचा भाग बनणे आवश्यक आहे. ग्राहकाच्या व्यवहारांचा इतिहास, खरेदीच्या सवयी, उत्पन्न, कर्जफेड, स्थान, विमा आणि गुंतवणूक या डेटाचा अनियंत्रित वापर झाल्यास व्यक्तीच्या आर्थिक आयुष्याचे अतिसूक्ष्म निरीक्षण शक्य होते. म्हणून फिनटेक उद्योगाने स्वतःची नैतिकतेवर आधारित डेटा मानके तयार करण्याची गरज आहे. डेटा उपलब्ध आहे म्हणून तो वापरावा, हे तत्त्व वित्तव्यवस्थेत चालणार नाही. यात 'एजंटिक एआय', टोकनायझेशन आणि क्वांटम कम्प्युटिंगसारख्या तंत्रज्ञानांची भर पडत आहे. एआय ग्राहकाच्या आर्थिक स्थितीवरून बचत, विमा किंवा कर्जाबाबत निर्णय घेण्यात मदत करू शकते. मालमत्तेचे टोकनायझेशन गुंतवणुकीची नवी दारे उघडू शकते. क्वांटम कम्प्युटिंगमुळे जोखीम विश्लेषणापासून सुरक्षेपर्यंत अनेक क्षेत्रांत मोठे बदल होऊ शकतात.शेवटी तंत्रज्ञान हे साधन आहे. त्याचे प्रयोजन आर्थिक कल्याण हेच असले पाहिजे. 'यूपीआय'च्या आंतरराष्ट्रीय विस्ताराकडेही याच व्यापक चौकटीत पाहावे लागेल. आजवर भारत नियम स्वीकारणारा देश राहिला. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांमुळे काही क्षेत्रांत मानके घडविण्याची संधी प्रथमच निर्माण झाली आहे. ती संधी 'यूपीआय' विस्तारापलीकडे जात परस्पर कार्यशीलता, सुरक्षा, गोपनीयता आणि ग्राहक संरक्षण यांची विश्वासार्ह चौकट जगासमोर ठेवण्यात आहे. पंतप्रधानांनी ७.८ टक्के विकास दराच्या वादाला पूर्णविराम देताना भारताची 'रिफॉर्म एक्स्प्रेस' सुसाट राहणार असल्याचे स्पष्ट केले. एसबीआयच्या 'इकोरॅप' अहवालाने जीडीपी आकड्यांमध्ये फेरफार झाल्याचे आरोप फेटाळत या वादामागे वेगवेगळ्या सांख्यिकी मालिकांची चुकीची तुलना असल्याचे म्हटले. जपानच्या रेटिंग एजन्सीनेही ३० वर्षांनंतर भारताचे सार्वभौम रेटिंग अपग्रेड केले;पण मोठ्या अर्थव्यवस्थेची खरी कसोटी तिच्या वाढीचा लाभ किती विस्तृत समाजघटकांपर्यंत पोहोचतो यावर असते. फिनटेक कंपन्या यात महत्त्वाचा दुवा ठरू शकतात. देशात यूपीआय उलाढालीचे मासिक मूल्य २५ लाख कोटींच्या पुढे गेले. जगभरात एकूण रिअल टाईम डिजिटल व्यवहारांपैकी ५० टक्के एकट्या भारतात होतात. आता कर्ज, विमा, बचत, गुंतवणूक आणि निवृत्ती सुरक्षेचे लोकशाहीकरण करता आले, तरच भारताची फिनटेक क्रांती खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण होईल.

**महाराष्ट्रातील शेती पुन्हा एकदा आभाळाकडे डोळे लावून बसली आहे. पावसाळ्याचा महत्त्वाचा कालावधी उलटत असताना राज्यातील अनेक भागांत पावसाचे वितरण असमान झाले आहे. काही ठिकाणी मुसळधार पाऊस होतो, तर काही भागांत पावसाचा दीर्घ खंड पडतो. एकीकडे अतिवृष्टीमुळे पिके वाहून जातात आणि दुसरीकडे पावसाअभावी उभी पिके करपण्याच्या स्थितीत पोहोचतात. महाराष्ट्राच्या शेतीसमोरील हे विरोधाभासी चित्र आता अपवाद राहिलेले नाही. हवामानातील ही अनिश्चितता दिवसेंदिवस शेतीच्या अर्थकारणाला अधिक अस्थिर करत आहे.**

# हवामान बदलतेय; शेतीचे धोरण कधी बदलेल?



२०२६ च्या पावसाचे वास्तव: आकडे आणि परिणाम १ जून ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत महाराष्ट्रात सरासरीच्या तुलनेत पावसाची तूट राहिली आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचे प्रमाण कमी राहिले असून, काही भागांत सलग अनेक दिवसांचा पावसाचा खंड पडला आहे.

एकूण तूट: १ जून ते ३१ ऑगस्ट दरम्यान राज्यात १२% पावसाची तूट नोंदवली गेली आहे. ऑगस्टमधील कोरडा टप्पा: जुलैमध्ये ४०% सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला असला, तरी ऑगस्टमध्ये तब्बल ४६% पावसाची कमतरता नोंदवली गेली, ज्यामुळे खरीप पिकांवर ताण आला. मराठवाडा आणि विदर्भाची स्थिती: या दोन विभागांमध्ये अनुक्रमे २१% आणि २२% पावसाची तूट आहे. मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये केवळ ७७% (३८१ मिमी) पाऊस झाल्याचे आणि सोयाबीन पिके करपल्याचे सांगितले आहे.

जिल्हावार तूट: ३१ ऑगस्टपर्यंत १७ जिल्ह्यांमध्ये २०% ते ५९% पर्यंत पावसाची तूट ('अग्निगहू' श्रेणी) आहे. विशेषतः मराठवाड्यातील अनेक भागांमध्ये या खंडाचा परिणाम खरीप पिकांवर स्पष्टपणे दिसत आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, बाजरी यांसारख्या पिकांची वाढ पावसाच्या वेळेवर आणि पुरेशा उपलब्धतेवर अवलंबून असते. पाऊस उशिरा आला किंवा महत्त्वाच्या वाढीच्या अवस्थेत खंड पडला, तर वर्षभराची मेहनत काही आठवड्यांत धोक्यात येते. सोलापूरसारख्या भागात ऊस पिकासुद्धा तणावाखाली आला असून, काही ठिकाणी चारा म्हणून ऊस तोडावा लागत आहे.

### मूलभूत प्रश्न: केवळ 'एकूण पाऊस' पुरेसा आहे का?

इथे एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो.शेतीसाठी आपण अजूनही केवळ 'एकूण पाऊस किती झाला?' या एका आकड्यावर अवलंबून राहणार आहोत का? पावसाची सरासरी शेतकऱ्याच्या शेतात पीक वाचवू शकत नाही. पिकाला पाणी योग्य वेळी लागते. त्यामुळे पावसाचे एकूण प्रमाण जितके महत्त्वाचे आहे, तितकाच पावसातील खंड, जमिनीतील ओलावा, पिकाची वाढीची अवस्था, भूजलपातळी आणि जलसाठ्यांची स्थिती हे घटकही महत्त्वाचे आहेत. हवामान बदलाच्या काळात शेतीचे नियोजन करण्यासाठी या सर्व घटकांचा एकत्रित विचार करण्याची वेळ आली आहे.

### शेतकऱ्याचे अर्थकारण: कर्ज, खर्च आणि अनिश्चितता

शेतकरी मात्र या बदलत्या हवामानाशी रोज झगडत आहे. खरीप हंगाम सुरू करण्यापूर्वी त्याने बियाणे, खते, मशागत, मजुरी, कीडनाशके आणि इतर निविष्ठांवर पैसा खर्च केलेला असतो. त्यातील मोठा हिस्सा कर्जातून आलेला असतो. पिकाला पाऊस मिळाला नाही तर केवळ उत्पादन घटत नाही; त्या शेतकऱ्याच्या संपूर्ण आर्थिक वर्षाचे गणित बिघडते. उत्पादन घटते, उत्पन्न कमी होते, कर्जफेडीचा प्रश्न निर्माण होतो आणि पुढील हंगामासाठी लागणारे भांडवल कुठून आणायचे, हा प्रश्न समोर उभा राहतो. त्यात घरखर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्य, जनावरांचा चारा आणि इतर जबाबदाऱ्या असतात. त्यामुळे पावसाचा खंड काही दिवसांचा असला तरी त्याची आर्थिक सावली संपूर्ण वर्षभर शेतकऱ्याच्या कुटुंबावर राहते.

### धोरणात्मक अपयश: 'प्रतिक्रिया' नव्हे, 'प्रतिबंध' धोरण हवे

यामुळे सध्याच्या परिस्थितीकडे केवळ 'पाऊस कमी पडला' म्हणून पाहणे पुरेसे नाही. हा आता हवामान जोखमीचा प्रश्न आहे. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कधी दीर्घ कोरड्या कालावधीचा, कधी अतिवृष्टीचा, कधी गारपीटीचा, तर कधी अवकाळी पावसाचा सामना करावा लागत आहे. एका वर्षात पिकाला पाणी मिळत नाही आणि दुसऱ्या वर्षी तेच पीक पाण्याखाली जाते. या बदलत्या परिस्थितीत पारंपरिक शेती नियोजनाचे गणितच बदलले आहे.मात्र आपली प्रशासकीय आणि धोरणात्मक यंत्रणा अजूनही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्यानंतर मदत करण्याच्या पद्धतीत अडकलेली आहे. पीक नुकसान झाले की पंचनामा, त्यानंतर अहवाल, त्यानंतर मदतीची घोषणा आणि मग प्रत्यक्ष निधी—ही प्रक्रिया संकटाच्या वेगापेक्षा संथ आहे. हवामान बदलाच्या काळात 'नुकसान झाल्यानंतर मदत' या दृष्टिकोनापेक्षा 'नुकसान होण्यापूर्वी जोखीम ओळखून संरक्षण' हा दृष्टिकोन स्वीकारावा लागेल.

### तंत्रज्ञानाचा वापर: उपग्रह, ड्रोन आणि डिजिटल निरीक्षण

यासाठी हवामान आणि शेतीविषयक माहितीचा अधिक प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. प्रत्येक तालुक्यात पावसाचा खंड किती आहे, जमिनीतील ओलावा किती आहे, पिकांची अवस्था काय आहे, भूजलपातळी कशी आहे आणि जलसाठ्यांमध्ये किती पाणी शिल्लक आहे, याचे नियमित मूल्यांकन झाले पाहिजे. उपग्रह प्रतिमा, ड्रोन, स्वयंचलित हवामान केंद्रे, डिजिटल पीक निरीक्षण आणि भौगोलिक माहिती प्रणाली यांचा वापर करून नुकसानाचे जलद मूल्यांकन करणे आज शक्य आहे. मग शेतकऱ्याला नुकसान सिद्ध करण्यासाठी कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याची वेळ का यावी?

### पीक विमा: कागदावर संरक्षण, प्रत्यक्षात अडथळे

पीक विमा हा अशा परिस्थितीत शेतकऱ्याचा महत्त्वाचा आर्थिक आधार ठरू शकतो. प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये दुष्काळ, कोरडा कालावधी आणि प्रतिकूल हवामानाशी संबंधित विविध जोखमींचा समावेश आहे. २७ ऑगस्ट २०२६ पर्यंत २.४१ कोटी शेतकरी आणि २.७८ कोटी हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित आहे. मात्र विम्याचे संरक्षण कागदावर उपलब्ध असणे आणि संकटाच्या वेळी त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळणे यात मोठा फरक आहे.

नुकसान झाल्यानंतर विमा दावा किती लवकर निकाली निघतो, नुकसानाचे मूल्यांकन किती अचूक होते आणि भरपाई शेतकऱ्याच्या खात्यावर किती वेगाने जमा होते, यावर विमा योजनेची खरी परिणामकारकता ठरते. क्षेत्राधारित मूल्यांकन (Area-based assessment) पद्धतीमुळे प्रत्यक्ष नुकसान आणि मिळणारी भरपाई यात तफावत राहते. पीक कापणी प्रायोगिक (Crop Cutting Experiment) निकाल उशिरा मिळणे, सबसिडी वितरणातील विलंब आणि बँक/आधार डेटातील चुकांमुळे शेतकऱ्यांना पैसे उशिरा मिळतात. त्यामुळे पीक विम्याच्या अंमलबजावणीत तंत्रज्ञानाचा अधिक मोठ्या प्रमाणावर वापर झाला पाहिजे. हवामान केंद्रे, उपग्रह माहिती आणि डिजिटल पीक निरीक्षण यांची सांगड घालून जोखीम क्षेत्रांची पूर्वकल्पना घेता आली, तर शेतकऱ्याला संकट येण्यापूर्वीच सल्ला देता येईल. कोणते पीक वाचवता येईल, कुठे संरक्षक सिंचन करावे, कुठे अतिरिक्त खर्च टाळावा आणि कुठे पीक बदलाचा निर्णय घ्यावा, यासाठी शेतकऱ्याला स्थानिक पातळीवर वेळेवर मार्गदर्शन मिळाले पाहिजे.

### नुकसानभरपाई आणि कर्ज: वेळ आणि पारदर्शकता

नुकसानभरपाईचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. नैसर्गिक आपत्तींमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शासनाकडून मदतीची तरतूद आहे. परंतु वाढता उत्पादन खर्च, मजुरी, बियाणे, खते, कीडनाशके आणि सिंचनाचा खर्च लक्षात घेतला तर उपलब्ध मदत अनेकदा प्रत्यक्ष नुकसानीच्या तुलनेत अपुरी ठरते. त्याहून महत्त्वाचे म्हणजे मदतीची रक्कम वेळेवर मिळणे. संकटाच्या काळात महिन्यांनी किंवा वर्षांनी मिळणारी मदत शेतकऱ्याच्या तातडीच्या गरजा भागवू शकत नाही. नुकसानभरपाईची प्रक्रिया अधिक पारदर्शक, तंत्रज्ञानाधारित आणि वेळबद्ध असणे गरजेचे आहे.

कर्जाचा प्रश्नही याच संदर्भात पाहावा लागेल. पिकाचे उत्पादन धोक्यात असताना कर्जफेडीचा तगादा वाढला, तर शेतकऱ्यावरील आर्थिक दबाव आणखी वाढतो. पावसाचा दीर्घ खंड असलेल्या भागांत पीककर्जाच्या परतफेडीस मुदतवाढ, कर्जाचे पुनर्गठन, व्याजातील सवलत आणि पुढील हंगामासाठी नव्याने कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत तातडीने निर्णय होणे आवश्यक आहे. प्रत्येक कृषी संकटानंतर कर्जमाफी हा एकमेव उपाय शोधण्याऐवजी संकटग्रस्त शेतकऱ्याला सावरण्यासाठी आर्थिक श्वास घेण्याची संधी देणारी व्यवस्था निर्माण केली पाहिजे.

### पाणी आणि पशुधन: दुहेरी संकट

पाण्याचा प्रश्न तर महाराष्ट्राच्या शेतीसमोरील कायमचा प्रश्न बनत चालला आहे. मराठवाड्यातील अनेक भागांत पावसातील खंडामुळे विहिरी आणि विंधन विहिरींच्या पाणीपातळीवर परिणाम होत आहे. दुसरीकडे राज्यातील काही भागांत अतिवृष्टीमुळे उपलब्ध पाण्याचे व्यवस्थापनही आव्हान बनते. म्हणून जलसंधारण, पाणलोट विकास, शेततळी, ठिबक व तुषार सिंचन, मृदओलावा संवर्धन आणि भूजल पुनर्भरण या उपायांना केवळ योजनांच्या यादीत न ठेवता गावपातळीवरील वृत्ती आराखड्याशी जोडावे लागेल.

पावसाचा खंड वाढला की शेतीसोबत पशुधनही संकटात येते. चारा आणि पाण्याची उपलब्धता कमी झाली तर शेतकऱ्याला जनावरे सांभाळणे कठीण जाते. त्यामुळे चारा बँक, गावनिहाय पाणी नियोजन आणि पशुधनासाठी आपत्कालीन चारा-पाणी व्यवस्था यांचा पूर्वनियोजित आराखडा असणे आवश्यक आहे. दुष्काळ जाहीर झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा दुष्काळसदृश परिस्थितीची पूर्वकल्पना घेऊन प्रशासनाने काम सुरू करणे अधिक परिणामकारक ठरेल.

### दीर्घकालीन धोरण: पीक विविधीकरण आणि संशोधन

परंतु तात्पुरत्या मदतीपेक्षा मोठा प्रश्न दीर्घकालीन शेती धोरणाचा आहे. हवामान बदलाच्या काळात 'ज्या पिकाची लागवड परंपरेने केली जाते तेच पीक घ्यायचे' हा दृष्टिकोन बदलावा लागेल. कमी कालावधीची, कमी पाण्यात येणारी आणि हवामानातील चढ-उतार सहन करणारी पिके आणि वाण यांना प्रोत्साहन द्यावे लागेल. कडधान्ये, तेलबिया, भरडधान्ये आणि स्थानिक परिस्थितीशी सुसंगत पिकांचे विविधीकरण करावे लागेल. शेतकऱ्याला केवळ पीक बदलण्याचा सल्ला देऊन उपयोग नाही. त्यासाठी बाजारपेठ, प्रक्रिया उद्योग, मूल्यवर्धन, विमा, तंत्रज्ञान आणि आर्थिक प्रोत्साहनाची साखळी उभी करावी लागेल.

कृषी विद्यापीठे, संशोधन संस्था आणि कृषी विभागाची भूमिका येथे अत्यंत महत्त्वाची आहे. हवामान बदलाच्या नव्या परिस्थितीत कोणते वाण कुठे चांगले काम करतात, कोणती पीकपद्धती कमी जोखमीची आहे, जमिनीतील ओलावा कसा टिकवता येईल आणि कमी पाण्यात उत्पादन कसे स्थिर ठेवता येईल, यावर स्थानिक पातळीवर संशोधन आणि प्रात्यक्षिके वाढवावी लागतील. हवामानाचा अंदाज शेतकऱ्याच्या मोबाईलपर्यंत पोहोचविणे पुरेसे नाही; त्या अंदाजाचा शेतीतील निर्णयात कसा वापर करायचा, हेही शेतकऱ्याला समजावून सांगावे लागेल.

### शेतकऱ्याचे मानसिक आरोग्य: दुर्लक्षित पैलू

या संकटाचा आणखी एक गंभीर पैलू आहे.शेतकऱ्याचे मानसिक आरोग्य. पिकासाठी केलेला खर्च, डोक्यावरचे कर्ज, घटते उत्पन्न, घरखर्चाची चिंता आणि पुढील हंगामाबाबतची अनिश्चितता यामुळे शेतकरी मोठ्या मानसिक तणावाखाली येतो. परिस्थिती दीर्घकाळ अशीच राहिली तर काही शेतकरी अत्यंत टोकाच्या मानसिक अवस्थेपर्यंत पोहोचू शकतात. त्यामुळे शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न केवळ घटना घडल्यानंतर चर्चेला आणण्यापेक्षा प्रतिबंधात्मक पातळीवर हाताळण्याची गरज आहे.संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांची गावनिहाय ओळख, आर्थिक अडचणींचे मूल्यांकन आणि आवश्यकतेनुसार मानसिक आरोग्याची मदत यासाठी कृषी, महसूल, बँकिंग, आरोग्य विभाग आणि ग्रामपंचायत यांच्यात समन्वय असायला हवा. 'धीर धरा' हा सल्ला महत्त्वाचा आहे; पण त्या धीराला शासनाच्या मदतीचा आधार नसेल तर तो अपुरा ठरतो.

### शेतकऱ्यांनो, एकटे राहू नका!

शेतकऱ्यांनाही या कठीण काळात एक गोष्ट लक्षात ठेवावी लागेल.पिकाचे नुकसान म्हणजे आयुष्याचे नुकसान नाही. एक हंगाम खराब होणे म्हणजे भविष्य संपणे नव्हे. आर्थिक संकटावर विमा, कर्ज पुनर्रचना, सरकारी मदत, पीक बदल आणि पुढील हंगामाच्या नियोजनातून मार्ग काढता येतो. संकटाच्या काळात शेतकऱ्याने एकटे राहू नये. कुटुंबीयांशी, मित्रांशी, गावातील विश्वासू व्यक्तींशी संवाद साधावा आणि मानसिक ताण असह्य होत असल्यास तातडीने आरोग्यसेवेची मदत घ्यावी. शेतकऱ्याचे जीवन कोणत्याही पिकापेक्षा आणि कोणत्याही कर्जापेक्षा अधिक मौल्यवान आहे.

### धोरण बदलणे ही काळाची गरज

महाराष्ट्रासमोरील सध्याचे कृषी संकट आपल्याला एक मोठा धडा देत आहे. हवामान बदल ही भविष्यातील समस्या नसून ती आजच्या शेतात उतरलेली वस्तुस्थिती आहे. त्यामुळे शेतीचे धोरणही बदलत्या हवामानाच्या वास्तवावर आधारित असले पाहिजे. पर्जन्यमानाची सरासरी, उत्पादनाचे अंदाज आणि नुकसानाचे पंचनामे यापलीकडे जाऊन हवामान जोखीम, पाणी, माती, बाजारपेठ, कर्ज, विमा आणि शेतकऱ्याचे मानसिक आरोग्य या सर्वांचा एकत्रित विचार करणारे धोरण आता आवश्यक आहे.

पाऊस पडणे आपल्या हातात नाही. पण पाऊस कमी पडला म्हणून शेतकरी उद्ध्वस्त होऊ नये, हे निश्चितपणे आपल्या हातात आहे. आभाळाने साथ सोडली तर शासनाने साथ सोडता कामा नये. शेतकऱ्याला मदत मागण्यासाठी कार्यालयांच्या दारात उभे करण्यापेक्षा मदत त्याच्या शेतापर्यंत पोहोचविणारी व्यवस्था उभी करावी लागेल. हवामान बदलत आहे. पावसाचे स्वरूप बदलत आहे. शेतीसमोरील जोखीम बदलत आहे. आता प्रश्न एवढाच आहे.या बदलत्या वास्तवाबरोबर आपले शेती धोरण कधी बदलेल? पाऊस दडीला गेला आहे; सरकारची धोरणे मात्र दडीला जाता कामा नयेत.

**डॉ. भागवत चव्हाण**

## संवाद

### अकोला रेल्वे स्थानकावर गाड्या थांबवा

अकोला हे एक महत्त्वाचे रेल्वे जंक्शन आहे, तरीही अनेक लांब पल्ल्याच्या सुपरफास्ट गाड्या येथे थांबत नाहीत. अकोला रेल्वे स्थानकावर खालील गाड्यांना दोन मिनिटांचा थांबा देण्याची प्रवाशांची दीर्घकाळापासूनची मागणी आहे.१२९९३/१२९९४ गांधीधाम-पुरी सुपरफास्ट एक्सप्रेस,२२८६५/२२८६६ एलटीटी-पुरी सुपरफास्ट एक्सप्रेस, २२८२७/२२८२८ सुरत-पुरी सुपरफास्ट एक्सप्रेस या गाड्यांच्या थांब्यामुळे विदर्भातून ओडिशा, गुजरात आणि मुंबईला जाणाऱ्या हजारो प्रवाशांना थेट कनेक्टिव्हिटी मिळेल, ज्यामुळे वेळ आणि पैसा या दोन्हींची बचत होईल.कोविड-१९ महामारीमुळे बंद असलेली नागपूर-भुसावळ-नागपूर प्रवासी गाडी पुन्हा सुरू करावी. ही गाडी रोज प्रवास करणारे प्रवासी, विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी अत्यंत उपयुक्त होती. जर नागपूरहून रेल्वेसेवा शक्य नसेल, तर अजनी-भुसावळ-अजनी मेमू ट्रेन सुरू करावी, ज्याला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळेल.अशी आशा आहे की रेल्वे विभाग जनहितासाठी या मागणीवर लवकरच सकारात्मक निर्णय घेईल.

**राजेश पी. कारिया**
राधे नगर,अकोला (महा)

### आर्ततेने करतो ती आरती.

गणेशोत्सवाच्या काळात दहा दिवस गणेश मंडळांमधून आणि घराघरातून सकाळ-संध्याकाळ श्री गणेशाची आरती केली जाते.उपासकाला त्याच्या हृदयातील भक्तीदिप तेजोमय करण्याची आणि देवतेकडून कृपाशीर्वाद मिळण्याची सुलभ पर्वणी म्हणजे आरती. बहुतांश आरत्यांची रचना ही संतांनी किंवा उन्नत भक्तांनी केलेली आहे. ज्याप्रमाणे श्री गणेशाची आरती संत रामदास स्वामींनी रचली आहे. आरतीच्या शेवट रचनाकारांच्या नावाचा उल्लेख असतो.जेव्हा आरती हृदयातून,आर्ततेने, तळमळीने आणि अध्यात्मशास्त्रदृष्ट्या योग्य रीतीने म्हटली जाते तेव्हा त्याचा लाभ होतो. त्यामुळे आरती कशी केली पाहिजे? हे समजून घेणे आवश्यक आहे.

आरतीच्या सुरुवातीला शक्य असल्यास तीन वेळा शंख वाजवावा. भगवंत माझ्यासमोर प्रत्यक्ष उभा आहे व मी त्याची आळवणी करत आहे या भावाने आरती म्हणावी. आरती म्हणताना टाळ, झांज, तबला, पेटी अशा वाद्यांची लयबद्ध साथ द्यावी. आरतीचे तबक देवाभोवती घड्याळाच्या काट्याच्या दिशेने पूर्ण वर्तुळाकृती फिरवावे. आरती म्हणून पूर्ण झाल्यावर दिव्याच्या ज्योतीवर दोन्ही हातांचे तळवे पालथे धरून उजवा हात डोक्यावरून पुढून पाठीमागे मानेपर्यंत फिरवावा. देवाला शरणागत भावाने नमस्कार करावा. त्यानंतर प्रदक्षिणा घालावी. जागा कमी असल्यास स्वतःभोवती तीन प्रदक्षिणा घालाव्यात. त्यानंतर देवतेच्या नावाचा जयघोष करावा. शेवटी तीर्थ प्राशन करून विभूती भ्रूमध्यावर लावावी.

अशा प्रकारे भावपूर्ण आरती केल्यास त्याचा निश्चितच लाभ होतो.

**डी. पी. गिते.**

# शांतता सभेतून यवतमाळला सलोख्याचा कानमंत्र..!

## अफवा पसरविणाऱ्यांवर पोलिसांची नजर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**यवतमाळ, दि. १० :** पोळा, गणेशोत्सव, गौरी पूजन, नवरात्रोत्सव, दसरा तसेच धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने जिल्हास्तरीय शांतता सभेचे आयोजन करण्यात आले. सणांच्या उत्साहाला गालबोट लागू नये आणि जातीय सलोखा व सामाजिक ऐक्य अबाधित राहावे, यासाठी प्रशासनाने नागरिकांना शांतता व संयमाचे आवाहन केले.


सभेला नगराध्यक्ष प्रियदर्शिनी अशोक उईके यांच्यासह विविध समाजघटकांचे प्रतिनिधी, धार्मिक व सामाजिक पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच नागरिक उपस्थित होते. यावेळी आगामी सण-उत्सवांच्या नियोजनावर चर्चा करण्यात आली. मिरवणुकांचे मार्ग, वाहतूक व्यवस्था, ध्वनिक्षेपकांचा वापर, गर्दीचे नियोजन आणि कायदा-सुव्यवस्था याबाबत प्रशासनाने मार्गदर्शन केले. विशेषतः सोशल मीडियावरून अफवा, चुकीची माहिती किंवा समाजात तेढ निर्माण करणाऱ्या आक्षेपार्ह पोस्टचा प्रसार होऊ नये, यासाठी नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले. एखाद्या पोस्टमुळे गैरसमज निर्माण झाल्यास ती पुढे प्रसारित करण्याऐवजी प्रशासनाच्या निदर्शनास आणून द्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले. यवतमाळची शांतता, बंधुभाव आणि सामाजिक एकोप्याची परंपरा कायम ठेवण्यासाठी सर्व समाजघटकांनी एकमेकांच्या श्रद्धा व भावनांचा आदर करीत सण साजरे करावेत, असा सूर सभेत उमटला. उत्सव आनंदाचा असावा, संघर्षाचा नव्हे; सोशल मीडियावरील अफवांना थारा देऊ नका, असा स्पष्ट संदेशही यावेळी देण्यात आला. या प्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्यासह पोलीस अधिकारी उपस्थित होते.

# शिबला चौफुलीवर पोलिसांची धडक कारवाई

## १० गायींची अवैध वाहतूक करणारा पिकअप जप्त; ८.४० लाखांचा मुद्देमाल ताब्यात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**झरी, दि. १० :** १० सप्टेंबर रोजी पाटण पोलीस स्टेशनच्या पथकाने ग्राम शिबला परिसरात रात्रीच्या गस्तीदरम्यान गोवंशाची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करत १० गायींसह पिकअप वाहन असा एकूण ८ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे गोवंशाची अवैध वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

पोलिस पथक ग्राम शिबला परिसरात डिव्हिजन गस्त घालत असताना रात्री सुमारे २.१५ वाजता शिबला चौफुली येथे मारेगावच्या दिशेने एक वाहन संशयास्पदरीत्या येताना दिसले. पोलिसांनी हाताने इशारा करून वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र, चालकाने वाहन न थांबवता पांढरकवड्याच्या दिशेने वेगाने पळ काढला. पोलिसांनी शासकीय जीपने वाहनाचा पाठलाग केला. सुमारे एक किलोमीटर अंतरावर चालकाने वाहन थांबवून अंधाराचा फायदा घेत तेथून पळ काढला. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता पिकअपच्या डाल्यामध्ये ताडपत्रीने झाकून गोवंश जातीच्या १० गायी अत्यंत दाटीवाटीने आणि हालचालीस पुरेशी जागा नसलेल्या स्थितीत बांधलेल्या आढळून आल्या. जनावरांना आखूड दोरीने एकमेकांना घट्ट बांधून ठेवण्यात आले होते. पोलिसांनी सर्व १० गायींना ताब्यात घेत चारा, पाणी व सुरक्षिततेच्या दृष्टीने गोरक्षण केंद्रात दाखल केले. तसेच MH-०२-CE-७५६१ क्रमांकाचे पिकअप वाहन पोलीस ठाण्यात आणून दोन पंचांसमक्ष जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या १० गायींची अंदाजे किंमत २ लाख ४० हजार रुपये, तर पिकअप वाहनाची किंमत ६ लाख रुपये, असा एकूण ८ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. या प्रकरणी वाहनाचा चालक व मालक यांच्याविरुद्ध प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० कलम ११(१)(G), ११(१)(H), ११(१)(C), ११(१)(D), महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ कलम ५A, ५B, ९ तसेच म.पो.का. १५१ अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, यवतमाळ, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेश दळवे, वणी यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार मिलींद सरकटे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार सदाशिव माथनकर, पोलीस हवालदार सुगत दिवेकर, पोलीस कॉन्स्टेबल प्रशांत तलांडे तसेच होमगार्ड निलेश मांदाडे व सुरज पारखी यांनी केली.







सजले सर्जा-राजा, रंगली पोळ्याची शान...
यवतमाळच्या समता मैदानात परंपरेचा जल्लोष!

# पती-पत्नी एकत्रीकरणाच्या बदलीला महावितरणचा ‘खो’..!

## कर्मचारी संघटनांचे साखळी उपोषण सुरू

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १० :** पती-पत्नी एकत्रीकरणाच्या धोरणानुसार बदली झाल्यानंतरही वरिष्ठ तंत्रज्ञाला यवतमाळ शहर उपविभागात रुजू करून न घेतल्याच्या निषेधार्थ विविध विद्युत कर्मचारी संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मागणी मान्य होईपर्यंत साखळी उपोषण करण्याचा निर्णय घेत ८ सप्टेंबरपासून मंडळ कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर आंदोलनाला सुरुवात करण्यात आली आहे. मागणीची तातडीने पूर्तता न झाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशाराही संघटनांनी दिला आहे.

वरिष्ठ तंत्रज्ञ उमेश बाबाराव इरखडे यांची पती-पत्नी एकत्रीकरणाच्या माध्यमातून बदली झाली आहे. त्यांच्या पत्नी विद्या गोडे या यवतमाळ शहर उपविभागातील FCC-४ वितरण केंद्रात तंत्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे इरखडे यांना यवतमाळ शहर उपविभागांतर्गत उपलब्ध असलेल्या वितरण केंद्रात रुजू करून घेण्यात यावे, अशी मागणी संघटनांनी केली आहे. मात्र, त्यांना बाभुळगाव उपविभागातील पहूर वितरण केंद्रात रुजू होण्याचे आदेश देण्यात आल्याने वाद निर्माण झाला आहे. याप्रकरणी वारंवार विनंती करूनही प्रशासनाकडून अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. यवतमाळ शहर उपविभागातील FCC-२ वितरण केंद्रात जागा उपलब्ध असून, तेथे अथवा शहर उपविभागांतर्गत अन्य कोणत्याही उपलब्ध वितरण केंद्रात इरखडे यांना रुजू करून घ्यावे, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. या आंदोलनाला विविध कर्मचारी संघटनांनी सक्रिय पाठिंबा दिला आहे. महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेचे अध्यक्ष विलास कन्नाके, क्रांतिकारी लाईनस्टाफ संघटनेचे पंकज बारूंदे, महेंद्र वेटुकार, शिवचरण भोसले, स्नेहदीप देशमुख यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले आहेत. प्रशासनाने मागणीची दखल घेऊन तातडीने न्याय न दिल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. साखळी उपोषणानंतर आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारण्यात येईल, असा स्पष्ट इशारा यावेळी संघटनांच्या वतीने देण्यात आला. त्यामुळे आता महावितरण प्रशासन या प्रश्नावर कोणती भूमिका घेते, याकडे कर्मचारी वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# कला वाणिज्य महाविद्यालयाची खरेदी विक्री संघ राळेगाव ला भेट

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ अरविंद तेलंगे.



**राळेगाव , दि. १० :** स्थानिक कला वाणिज्य महाविद्यालय राळेगाव जिल्हा यवतमाळ येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर सावरकर यांच्या मार्गदर्शनात व वाणिज्य विभागाच्या वतीने सहकार क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले. सहकार क्षेत्र भेटी अंतर्गत खरेदी विक्री संघ शाखा राळेगाव येथे भेट देण्यात आली.

भेटीला गेले असता खरेदी विक्री संघ राळेगाव यांच्या वतीने विद्यार्थ्यांना खरेदी-विक्री केंद्रात होणाऱ्या कामाबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. त्यांच्या माहितीनुसार राळेगाव खरेदी विक्री संघाची स्थापना ११ जून १९६३ रोजी झाली. प्रत्येक तालुका पातळीवर खरेदी विक्री संघाची स्थापना झालेली आहे. राळेगाव खरेदी विक्री संघामध्ये एकूण पाच पूर्ण वेळ कर्मचारी कार्यरत आहेत. कर्मचाऱ्यांचा पगार स्वयं अर्थनिर्मितीतून केल्या जातो. खरेदी विक्री संघाची निवडणूक दर पाच वर्षांनी होते. मुख्यतः राळेगाव खरेदी विक्री संघामध्ये दोन मुख्य गोदामे व स्वतः मालकीची गाळे आहेत. गाळे भाडे तत्वावर दिली जातात. गोदामा मध्ये रासायनिक खते आणि शेतीमधील धान्य ठेवल्या जातो. गोदामाची प्रत्येकी २५० मॅट्रिक टन अशी क्षमता आहे. दरवर्षी नाफेड च्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी ऑक्टोबर महिन्यापासून नोंदणीला सुरुवात होत असते. केंद्र सरकार मार्फत नाफेड च्या माध्यमातून घेण्यात येणारा संपूर्ण शेतमाल खरेदी विक्री संघामध्ये ठेवण्यात येतो. अशा पद्धतीने संचालक, श्री श्रावण सिंग वढते व शाखा व्यवस्थापक, श्री संजय जुमडे यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. सहकार क्षेत्र भेटीदरम्यान सभापती, श्री मिलिंद इंगोले उपसभापती, श्री मारोतराव पाल तथा संपूर्ण संचालक मंडळाचे सहकार्य लाभले. या सहकार क्षेत्र भेटी अंतर्गत विद्यार्थ्यांना उपयुक्त मार्गदर्शन प्राप्त झाले. सहकार क्षेत्र भेटीला आयोजक वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रुपेश पवार डॉ. धीरज गोबरे डॉ. शालिनी हटवार प्रा. विशाल कातडे प्रा. विशाल वाघमारे प्रा. निलेश पडल यांनी प्रामुख्याने उपस्थित दर्शविली. सहकार क्षेत्र भेटीला महाविद्यालयातील बहुतांश विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.


## थोडक्यात

### मातोश्री विद्यालय श्रीरामपूरच्या बुद्धिबळपटूची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेकरिता निवड

**पुसद :** क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत



रुद्राणी पुंडलिक आढाव



खुशी संतोष बोंबले

आयोजित तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा नुकत्याच दि.०९/०९/२०२६ रोजी तालुका क्रीडा संकुल, पुसद येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत मातोश्री विद्यालय श्रीरामपूरच्या विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवत घवघवीत यश संपादन केले. वयोगट १७ मध्ये खुशी संतोष बोंबले व रुद्राणी पुंडलिक आढाव या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केल्याने त्याची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धे करता निवड झाली आहे. त्याबद्दल संस्थाध्यक्ष दिगांबर जगताप यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शन शिक्षकांचे कौतुक केले आहे.



### आत्महत्येआधीची हाक ओळखा संवादाने जीव वाचवा! - डॉ.मेश्राम

**नैराश्य कमजोरी नाही, उपचाराची गरज वैद्यकीय महाविद्यालयात पथनाट्यातून जनजागृती**

**यवतमाळ :** नैराश्याच्या गर्तेत गेलेल्या व्यक्तीला उपदेशापेक्षा संवादाची, दोषारोपापेक्षा आधाराची आणि दुर्लक्षापेक्षा वेळेवर उपचाराची गरज असते. आत्महत्येचा विचार हा अंतिम निर्णय नसून अनेकदा मदतीची हाक असते. हा संवेदनशील संदेश श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाच्या कार्यक्रमातून देण्यात आला. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत उईके यांच्या मार्गदर्शनाखाली मानसोपचारशास्त्र विभागाने विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन केले. विभागप्रमुख डॉ. श्रीकांत मेश्राम आणि क्षयरोग व छातीविकार विभागप्रमुख डॉ. रवी राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. ‘शेतकरी आत्महत्या’ आणि ‘वैद्यकीय विद्यार्थ्यांमधील नैराश्य’ या विषयांवरील पथनाट्यातून मानसिक ताण, कौटुंबिक-सामाजिक समस्या आणि आत्महत्येची पूर्वसूचना देणारी लक्षणे प्रभावीपणे मांडण्यात आली. नैराश्याची लक्षणे ओळखणे, आत्महत्येचा धोका जाणवणाऱ्या व्यक्तीचे शांतपणे ऐकणे, तिला एकटे न सोडणे आणि तातडीने तज्ज्ञांची मदत घेणे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. नैराश्य ही कमजोरी नसून उपचाराची गरज असलेली मानसिक आरोग्य समस्या आहे. योग्य वेळी केलेला संवाद एका व्यक्तीचा जीव वाचवू शकतो, असे डॉ. मेश्राम यांनी सांगितले. मानसिक आरोग्यावरील कलंक दूर करून ‘बोला, ऐका आणि मदतीचा हात द्या’ असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# दुष्काळाच्या झळा... तरी सर्जा-राजाच्या ऋणाची परंपरा कायम!

## कृतज्ञतेच्या भावनेने महागावात बैलपोळा भक्तिभावात; शेतकऱ्यांच्या डोळ्यांत आशेची ओल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. १० :** पावसाच्या अनिश्चिततेने शेतकऱ्यांच्या संसाराला यंदा पुन्हा चिंतेच्या सावटाखाली आणले असले, तरी वर्षभर शेतकऱ्याच्या सुख-दुःखात खांद्याला खांदा लावून साथ देणाऱ्या सर्जा-राजाप्रती असलेली कृतज्ञता मात्र तसूभरही कमी झालेली नाही. दुष्काळाच्या वेदनेवर कृतज्ञतेचा लेप लावत महागाव शहरात बैलपोळा पारंपरिक उत्साह आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला.

पहाटेपासूनच शेतकरी कुटुंबांची लगबग सुरू झाली होती. बैलांना आंघोळ घालून त्यांची शिंगे रंगविण्यात आली. अंगावर आकर्षक झुली, गळ्यात फुलांचे हार आणि विविध पारंपरिक अलंकार घालून सर्जा-राजाची सजावट करण्यात आली. घराघरांत बैलांची पूजा, आरती आणि नैवेद्य करून वर्षभर शेतकऱ्याच्या कष्टात सहभागी होणाऱ्या या मुक्या श्रमिकाप्रती ऋण व्यक्त करण्यात आले. त्यानंतर शहरातील मानकरी व प्रतिष्ठित नागरिकांच्या उपस्थितीत बैलांची सामूहिक आरती करण्यात आली. यावेळी शेतात भरघोस पीक यावे, पावसाची कृपा व्हावी, शेतकऱ्यांच्या अडचणी दूर व्हाव्यात आणि बळीराजाच्या जीवनात सुख-समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना करण्यात आली. यंत्रयुग आले; पण नाते अजूनही कायम आज शेतीमध्ये आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. ट्रॅक्टर आणि आधुनिक साधनांनी बैलांची शेतीतील भूमिका कमी झाली असली, तरी ग्रामीण महाराष्ट्राच्या संस्कृतीत सर्जा-राजाचे स्थान आजही अढळ आहे. बैल हा केवळ शेतातील पशू नसून शेतकऱ्याच्या कष्टाचा, घामाचा आणि जगण्याचा विश्वासू सोबती मानला जातो. दुष्काळाच्या छायेतही आशेचा सण यंदा पावसाच्या लहरीपणामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. वाढता उत्पादन खर्च, पिकांचे नुकसान आणि बाजारभावाची अनिश्चितता यामुळे बळीराजाच्या चिंतेत भर पडली आहे. अशा कठीण परिस्थितीतही बैलपोळ्याच्या निमित्ताने शेतकऱ्यांनी आपल्या परंपरेची नाळ घट्ट धरून ठेवली. सर्जा-राजाच्या पूजेतून निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करताना शेतकऱ्यांच्या मनात पुढील हंगामाच्या आशेचा किरणही दिसून आला. दुष्काळाने डोळ्यांत पाणी आणले असले, तरी सर्जा-राजाच्या पूजेतून शेतकऱ्यांच्या मनात आशेची ज्योत तेवत असल्याचे चित्र महागावात पाहायला मिळाले.

# पुसदच्या १३५ गावांत सरपंचपदाची आरक्षण सोडत..!

## ६९ गावांत ‘महिला राज’ आरक्षण बदलताच इच्छुकांची धावपळ गावागावात राजकीय मोर्चेबांधणीला वेग

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. १० :** पुसद तालुक्यातील १३५ ग्रामपंचायतींच्या २०२५ ते २०३० या कार्यकाळासाठी सरपंचपदाची बहुप्रतीक्षित आरक्षण सोडत ९ सप्टेंबर रोजी यशवंत स्टेडियम येथील सभागृहात ईश्वर चिठ्ठीद्वारे जाहीर करण्यात आली. उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल व तहसीलदार रेखा वाणी यांच्या उपस्थितीत झालेल्या सोडतीत तब्बल ६९ ग्रामपंचायतींचे सरपंचपद महिलांसाठी राखीव झाले आहे.

आरक्षणाचा निकाल लागताच पुसद तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. अनेक गावांतील विद्यमान राजकीय समीकरणांना आरक्षणामुळे धक्का बसला असून, इच्छुकांच्या आशा-अपेक्षांनाही नवे वळण मिळाले आहे. काही ठिकाणी पुरुष इच्छुकांचे राजकीय गणित कोलमडले, तर महिला आरक्षण पडलेल्या गावांत कुटुंबातील महिला सदस्यांना सरपंचपदाच्या मैदानात उतरविण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नामाप्र व सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षण निश्चित करण्यात आले असून, प्रत्येक प्रवर्गातील काही पदे महिलांसाठी राखीव आहेत. त्यामुळे गावागावातील गटबाजी, उमेदवारांची जुळवाजुळव आणि स्थानिक राजकीय ताकदीचे गणित आता नव्याने मांडले जाणार आहे. आरक्षण अनुकूल लागलेल्या गावांत इच्छुकांच्या गोटात उत्साहाचे वातावरण आहे; तर अनपेक्षित आरक्षणामुळे काही मातब्बरांच्या राजकीय महत्त्वाकांक्षांना ब्रेक लागला आहे. आता निवडणुकीपूर्वी कोणता गट कोणाला पुढे करतो आणि सरपंचपदाची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात पडते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# उमरखेड येथील भोई समाजाची मुबईत वज्रमूठ..!

## ५०० जणांच्या सहभागातून ताकदीचे प्रदर्शन विवेक टोकलवाड यांच्या नेतृत्वात ४२ गावांत जनजागृती शिक्षण

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. १० :** मुंबई येथे आयोजित ‘शिवसेना भटके-विमुक्त हक्क व न्याय परिषदेत’ उमरखेड तालुक्यातील भोई समाजाने ५०० हून अधिक महिला, पुरुष, युवक-युवतींच्या सहभागातून आपली संघटित ताकद दाखवून दिली. उमरखेडच्या इतिहासात प्रथमच एवढ्या मोठ्या संख्येने समाजबांधव मुंबईत एकवटल्याने तालुक्यातील भोई समाजाच्या एकजुटीची चर्चा सुरू झाली आहे.

या संघटना मागे तरुण नेतृत्व विवेक टोकलवाड (कारखेडकर) यांचा पुढाकार राहिला. समाजाच्या प्रश्नांसाठी त्यांनी उमरखेड परिसरातील तब्बल ४२ गावांत कॉर्नर सभा घेत जनजागृती केली. अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, गावागावांत समाजासाठी सभागृहे उभारणे, शासनाच्या योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचविणे आणि भोई समाजाचा राज्यस्तरावर प्राधान्याने विचार व्हावा, यासाठी त्यांनी समाजाला संघटित केले.मुंबईतील परिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भोई समाजासाठीच्या विविध कल्याणकारी योजनांबाबत भूमिका मांडली. त्यामुळे उपस्थित समाजबांधवांनी समाधान व्यक्त केले. दरम्यान, शिक्षणापासून वंचित बालकांना मुख्य प्रवाहात आणणे, बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी मिळवून देणे आणि महिलांच्या आर्थिक-सामाजिक अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार विवेक टोकलवाड यांनी व्यक्त केला. आगामी काळात शिक्षण जनजागृतीसह विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा त्यांचा मानस आहे.

# नेत्रदानातून अंधत्वावर मात यवतमाळ मेडिकलमध्ये जनजागृतीचा प्रभावी जागर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १० :** मृत्यूनंतरही एखाद्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याची ताकद नेत्रदानात आहे. कॉर्नियल अंधत्वामुळे दृष्टी गमावलेल्या व्यक्तींच्या जीवनात नव्या आशेचा किरण निर्माण करण्यासाठी नेत्रदानाची चळवळ अधिक व्यापक करण्याची गरज आहे. याच उद्देशाने श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील नेत्ररोग विभागाच्या वतीने नेत्रदान पंधरवडा उत्साहात साजरा करण्यात आला.

महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत अरुण उईके यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमाला उप-अधिष्ठाता डॉ.रविंद्र राठोड, नेत्ररोग विभागप्रमुख डॉ. राजेश जोशी, सहयोगी प्राध्यापक डॉ. स्नेहल बोंडे, डॉ. चौरसिया, डॉ. अक्षय पडगीलवार, डॉ.सुप्रिया सुटे तसेच जिल्हा नेत्र शल्यचिकित्सक डॉ.मनोज तगडपल्लीवार यांची प्रमुख उपस्थिती होती. नेत्रदानाबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करून नागरिकांना या सामाजिक कार्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. नेत्ररोग विभागातील डॉक्टर, वरिष्ठ निवासी विद्यार्थी आणि सन २०२३ बॅचच्या एमबीबीएस विद्यार्थ्यांनी नियोजनापासून अंमलबजावणीपर्यंत सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी रांगोळी, पोस्टर स्पर्धे सह नेत्रदानाचे महत्त्व अधोरेखित करणारे पथनाट्य सादर केले. यावेळी नेत्रदान केलेल्या स्व. अग्रवाल यांच्या कुटुंबीयांचा विशेष सत्कार करून त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. तसेच कॉर्नियल प्रत्यारोपणातून दृष्टी प्राप्त झालेल्या रुग्णांनी आपल्या जीवनात झालेला सकारात्मक बदल उपस्थितांसमोर मांडला. मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करता येतो. त्यामुळे नेत्रदानाचा संकल्प करा आणि अंधत्वाविरुद्धच्या लढ्यात सहभागी व्हा असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले. वैद्यकीय विद्यार्थी, डॉक्टर आणि समाज यांच्या संयुक्त सहभागातून झालेल्या या उपक्रमामुळे यवतमाळमध्ये नेत्रदान चळवळीला नवी दिशा मिळण्यास हातभार लागला.

# खुनाच्या गुन्ह्यातील चार आरोपी २४ तासांत पोलिसांच्या गजाआड

## धारणी पोलिसांची कारवाई; शेतात लपून बसलेल्या आरोपींना घेतले ताब्यात

**मेळघाट/वार्ताहर**

तालुक्यातील भुलोरी येथे तरुणाचा खून केल्याप्रकरणी धारणी पोलिसांनी चार आरोपींना गुन्हा दाखल झाल्यापासून अवघ्या २४ तासांच्या आत ताब्यात घेतले. आरोपी शेतशिवारात लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्यांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी हिरालाल भैय्यालाल जावरकर (वय ५५, व्यवसाय शेती, रा. भुलोरी, पोस्ट रानामालूर, ता. धारणी, जि. अमरावती) यांनी धारणी पोलिस ठाण्यात जबानी रिपोर्ट दिला. त्यानुसार त्यांचा मुलगा मुकेश हिरालाल जावरकर (वय २७) हा ७ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजेपासून ९ सप्टेंबर रोजी सकाळी ७.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत घराबाहेर असताना त्याच्यावर हल्ला करण्यात आला.

फिर्यादीनुसार, गावातील सुरेश मावस्कर याच्या पत्नीची छेडछाड केल्याच्या रागातून सुरेश मावस्कर याने त्याचे नातेवाईक सुरेश काल्या धांडे, कुवरसिंग भिलावेकर आणि सुनिल मावस्कर यांच्या संगनमताने मुकेश याच्या डोक्यावर व उजव्या



खांद्यावर अज्ञात हत्याराने दुखापत केली. त्यानंतर गळा दाबून त्याचा खून केल्याचा आरोप आहे.

या फिर्यादीवरून धारणी पोलिस ठाण्यात अपराध क्रमांक ६४२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अमरावती ग्रामीणचे पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी आरोपींचा तातडीने शोध घेऊन पुढील कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलिस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांनी तपास पथक स्थापन करून पथकाला भुलोरी येथे रवाना केले.

पोलिसांनी आरोपींच्या राहत्या गावात शोध घेतला असता ङसुरेश सुभाष मावस्कर (वय २२), सुनिल लालचंद मावस्कर, कुवरसिंग झिंग-या भिलावेकर आणि सुरेश काल्या धांडेङ हे मिळून आले नाहीत. दरम्यान, गुप्त बातमीदाराकडून आरोपी एका शेतात लपून बसल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी भुलोरी येथील शेतशिवारात शोधमोहीम राबवून चौघांनाही ताब्यात घेतले.

धारणी पोलिस ठाण्यात आणून आरोपींची चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. गुन्हा दाखल झाल्यापासून २४ तासांच्या आत आरोपींना ताब्यात घेतल्याने पोलिसांनी खुनाचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

ही कारवाई अमरावती ग्रामीणचे पोलिस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड, एसडीपीओ तथा सहायक पोलिस अधीक्षक ङङइशानी आनंदङ आणि उपविभागीय पोलिस अधिकारी ङमाधवराव गरुडङ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

धारणी पोलिस ठाण्याचे ठाणेदार अवतारसिंग चव्हाणङ, सपोनि ङङशिवचरण डोंगरे, सपोनि ङङसंदीप पाटील, पोउनि ङङविशाल राठोड , स. फौ. गोरेलाल चिमोटे , पोहेकॉ सतीश राठोड, पोहेकॉ भीमसिंग उईके, पोहेकॉ जयकुमार मेटांगे, पो. कॉ. जगत तेलगोटे आणि पो. कॉ अविनाश राजणेकर यांनी ही कारवाई केली.

## अ. भा. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संचालकपदी डॉ. अर्चना अडसड-रोठे अविरोध

**धामणगाव रेल्वे/वार्ताहर**

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांच्या वतीने झालेल्या संचालक पदाच्या निवडणुकीत धामणगाव नगर परिषदेच्या नगराध्यक्ष डॉ.अर्चना अडसड रोठे यांची अविरोध निवड झाली आहे.



अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेची स्थापना १९२६ या वर्षात झाली. शहरी भागातील नगर योजना ,आरोग्य, पर्यावरण शिक्षण, सामाजिक अशा ५४ क्षेत्रामध्ये ही संस्था कामे करते या संस्थेची संचालक पदाची निवडणूक प्रक्रिया नुकतीच पार पडली. महाराष्ट्रातून केवळ दोन जागा उपलब्ध होत्या आणि विशेष बाब म्हणजे या दोन्ही जागांवर अविरोध निवड झाली.यामध्ये धामणगाव रेल्वेच्या नगराध्यक्ष डॉ. अर्चना अडसड-रोठे यांची संचालक पदी निवड झाल्याने धामणगाव रेल्वेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांचे विविध स्तरातून कौतुक होत आहे.

# गणेशोत्सवात डीजे, बेन्जो आवाजावर पोलिसांची करडी नजर

## लेझर लाईटवर बंदी, नियम मोडल्यास होणार कडक कारवाई

**अमरावती/का.प्र.**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहर पोलीस प्रशासनाने ध्वनी प्रदूषण आणि सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत कठोर पावले उचलली आहेत. शहरात गणेश विसर्जन व मिरवणुकांदरम्यान डीजे आणि बेन्जो चालकांसाठी कडक नियमावली लागू करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे तंतोतंत पालन करण्याचे स्पष्ट आदेश अमरावती पोलिसांनी दिले आहेत.



पोलीस आयुक्तालयाकडून राजापेठ पोलीस ठाणे आणि पोलीस आयुक्तालय येथे डीजे आणि बेन्जो चालक, मालक यांची बैठक पार पडली. या बैठकांना पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, शाम घुगे, पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते.बैठकीत मिरवणुकीदरम्यान डोळ्यांना व आरोग्यास धोकादायक ठरणारे लेझर लाईट आणि प्लाझ्मा लाईट वापरण्यास पूर्णपणे मनाई करण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली. तसेच वाद्य वाजवताना केवळ 'दोन बेस व दोन टॉप' लावण्याचीच परवानगी राहणार आहे. यामुळे लहान मुले, वृद्ध नागरिक आणि आजारी व्यक्तींना ध्वनी प्रदूषणाचा त्रास होणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या आणि ध्वनी प्रदूषण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या डीजे व बेन्जो चालक, मालकांवर प्रचलित कायद्यानुसार कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.बैठकीला उपस्थित असलेल्या सर्व डीजे आणि बेन्जो चालक, मालकांनी लेझर व प्लाझ्मा लाईट लावण्यात येऊ नये आणि दोन बेस-दोन टॉपच्या नियमाचे पालन करून सहकार्य करण्याचे मान्य केले.

## संक्षिप्त

### मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचा शुक्रवारी दौरा

**अमरावती** - सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) शिवेंद्रराजे भोसले शुक्रवार, ११ सप्टेंबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत.सकाळी ११ वाजता अमरावतीतील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या मागील 'सारथी' इमारतीच्या कामाची पाहणी करतील. त्यानंतर वलगाव-रेवसा-कठोरा-नांदगावपेठ रस्ता कॉंक्रीटीकरण करणे कामाची आणि राजकमल चौकातील बडनेरा-अमरावती रेल्वे मार्गावरील उड्डाणपुलाची पाहणी करतील. दुपारी ३ वाजता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागाची शासकीय विश्रामगृहात आढावा बैठक घेतील. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता नागपूरकडे प्रयाण करतील.

### विजय किटे यांचा सत्कार

**अमरावती** - गजानन कॉलनी, खुळे प्लॉट, परतवाडा येथील विजय केशवराव किटे हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी परिमंडल कार्यालया मधुन मुख्य लिपिक म्हणून प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्याबद्दल राष्ट्रीय



चर्मकार महासंघातर्फे शाल,सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ तसेच संत रविदास महाराज फोटो प्रतिमा भेट देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त पीएसआय उत्तमराव थोटे तर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे, जिल्हा उपाध्यक्ष मनोहर कोथळकर,अचलपूर तालुका अध्यक्ष राम लाहाहके, तालुका उपाध्यक्ष जय घोरे, अचलपूर शहराध्यक्ष उमेश गायकवाड, गजानन सावळे प्रमोद सावळे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन डॉ.गजानन रेवसकर यांनी केले.कार्यक्रमाला सुनीता किटे, शुभम किटे,गौरव किटे यांच्यासह महासंघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### जल,जमीन ,जंगल हे मानवाच्या कल्याणाकरीता - ॲड राजीव अंबापुरे

**चांदुर रेल्वे** - जल,जमीन,जंगल हे माणसाच्या कल्याणाकरीताच असून सर्वांनी त्यांचे संवर्धन केले पाहिजे असे मत महाराष्ट्र राज्य जल जमीन जंगल संघटनेचे अध्यक्ष ॲड. राजीव अंबापुरे यांनी व्यक्त



केले.सध्या पाण्याचा प्रश्न बिकट बनत असून भूगर्भातील पातळी कमी झाल्याने पाण्याचे संवर्धन केल्याशिवाय पर्याय नाही त्याचप्रमाणे पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न करायला पाहिजे अन्यथा रोगांचा प्रादुर्भाव दिसून येईल. सांडपाणी,औद्योगिकीकरणामुळे वाहणारे पाणी तसेच जमिनी मधील वाहून जाणारे केमिकल युक्त पाणी यामुळे पाण्याचे प्रदूषण होते.तालुक्यातील ब्रम्ही वनक्षेत्रात पाण्याचे झरे आणि वृक्ष यांची होणारी देखभाल पाहण्यासाठी ॲड अंबापुरे व त्यांचे टीममधील पठाण,दिनेश जगताप,विशाल चव्हाण,नितीन इत्यादी लोकांनी दौरा करून पाहणी केली.

### जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट अनिवार्य

**अमरावती** - प्रादेशिक परिवहन कार्यालयाद्वारे दि. १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसवणे अनिवार्य करण्यात आले आहे. एचएसआरपी बसविली नसल्यास दंडात्मक कारवाईसह परिवहन विभागाची कामे बंद होणार आहे.केंद्र सरकारच्या केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५० नुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. जुन्या वाहनांवर एचएसआरपी बसवण्यासाठी शासनाकडून दि. ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. ही मुदत संपल्यामुळे वाहनधारकांनी किंवा शासकीय कार्यालयांनी अद्याप नंबर प्लेट बसवलेली नाही अथवा अपॉइंटमेंट घेतलेली नाही, अशा वाहनांवर दि. १ जुलैपासून कारवाईचे निर्देश देण्यात आले आहे.वायुवेग पथकाद्वारे १ जुलैपासून मोटार वाहन अधिनियमातील नियम ५० व कलम १७७ नुसार थेट कारवाई केली जाणार आहे. तसेच एचएसआरपी बसविलेली नाही अशा वाहनांची परिवहन विभागाद्वारे कामे पूर्णपणे थांबवली जातील. यात वाहन हस्तांतरण, नोंदणी प्रमाणपत्रात बदल, फायनान्सचा बोझा चढवणे किंवा उतरवणे, ना-हरकत प्रमाणपत्र जारी करणे, दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र देणे यांचा समावेश राहणार आहे.मात्र ज्या वाहनधारकांनी एचएसआरपी बुकिंग केल्याची पावती कार्यालयात सादर केली आहे किंवा ज्यांनी आधीच अपॉइंटमेंट घेतली आहे, त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली.जाणार नाही. त्यांची कामे केली जातील, अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी दिली.

### म. फुले द्विशताब्दी चिंतन बैठक रविवारी

**अमरावती** - क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या क्रांतिकारी विचारांचा वर्तमान सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय संदर्भात पुनर्विचार करण्यासाठी महात्मा ज्योतिराव फुले द्विशताब्दी चिंतन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही बैठक रविवार १३ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता शासकीय विश्रामगृह, बायपास रोड, अमरावती येथे होणार आहे.

# चांदूर रेल्वे शहरातील स्मशानभूमीचे रूपडे पालटले!

## नगराध्यक्षा प्रा. प्रियंका निलेश विश्वकर्मा यांचा पुढाकार

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

शहरातील नागरिकांसाठी अत्यंत संवेदनशील आणि आवश्यक असलेल्या स्मशान भूमीच्या परिसराला आता नवे रूप मिळाले आहे. नगरपरिषदेच्या माध्यमातून स्मशानभूमीमध्ये विविध विकासकामे करण्यात आल्याने परिसर अधिक स्वच्छ, सुबक आणि व्यवस्थित झाला आहे.

स्मशानभूमी परिसरात गट्टू बसविण्यात आले असून, तुटलेल्या भिंतीची दुरुस्ती करून रंगरंगोटी करण्यात आली आहे. तसेच ज्या ठिकाणी अंत्यसंस्कारावेळी चितेला अग्नी दिला जातो, त्या ठिकाणी फ्लोरिंगचे काम करण्यात आले आहे. त्यामुळे पावसाळ्यासह इतर दिवसांतही नागरिकांना



अधिक सोयीचे वातावरण उपलब्ध होणार आहे.

स्मशानभूमी ही नागरिकांच्या अंतिम संस्काराशी निगडित अत्यंत महत्त्वाची जागा आहे. त्यामुळे या ठिकाणी स्वच्छता, सुरक्षितता आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या कामांचे नागरिकांकडून स्वागत होत आहे. नगराध्यक्षा प्रा. प्रियंका निलेश विश्वकर्मा यांच्या पुढाकारातून ही कामे करण्यात आली. कामाच्या पाहणीदरम्यान नगरसेवक अनिस सौदागर, सुमेद सरदार, गजानन ठाकरे, हर्षल वाघ, प्राविण्य देशमुख व सतपाल वरठे यांनी स्मशानभूमीला भेट देऊन सुरू असलेल्या कामांची पाहणी केली.

'शहराचा विकास म्हणजे केवळ रस्ते आणि इमारती नव्हे, तर नागरिकांच्या प्रत्येक गरजेच्या ठिकाणी सुविधा निर्माण करणे होय,' या भूमिकेतून स्मशानभूमीच्या विकासाकडे पाहिले जात असल्याचे या कामातून दिसून येत आहे.

# मेळघाटातील शेतकरी दुहेरी संकटात

## एकीकडे पाऊस गायब, दुसरीकडे वन्यप्राण्यांचा हैदोस

**मेळघाट/वार्ताहर**

यंदा पावसाने मोठी दडी मारल्याने धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील खरीप पिके अडचणीत आली आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांत चिंता निर्माण पसरली आहे.

धारणीत फक्त ५५ङ पाऊस: धारणी तालुक्यात आत्तापर्यंत सरासरीच्या फक्त ५५ ते ५८ टक्के पाऊस झाला आहे. पाण्याअभावी सोयाबीनचे झाड पिवळे पडून करपू लागले आहे. कापसाची वाढ खुंटली आहे.

चिखलदरातही पावसाची तूट: चिखलदरा तालुक्यातही फक्त ६२ ते ६५ टक्के पाऊस झाला आहे. जुलै महिन्यात पाऊस बरा होता, पण ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये पावसाने पूर्ण दगा दिला.

पावसाच्या संकटात असतानाच जंगली जनावरांनी शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. सध्या रानडुक्कर, माकडे, नीलगाय आणि हरणे रात्रीच्या वेळी कळपाने शेतात घुसून उभ्या पिकांचे मोठे नुकसान करत आहेत.दिवसा पिके पाण्याअभावी करपत आहेत, तर रात्री जनावरे उरलेसुरले पीक फस्त करत आहेत. याहून गंभीर बाब म्हणजे रात्रीच्या वेळी वाघ, बिबट, अस्वल आणि रानडुक्कर शेत-शिवारात स्वैरपणे संचार करत असल्याने शेतकरी रात्री शेतात राखणीसाठी जाणेही टाळत आहेत. नुकताच मोर्शी परिसरात वाघिणीने केलेल्या हल्ल्यानंतर तर लोकांच्या मनात वन्यप्राण्यांची प्रचंड दहशत बसली आहे.

या पार्श्वभूमीवर वनविभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, वनविभाग फक्त पंचनामा करण्यापुरता मर्यादित राहिला आहे. ज्या प्रमाणे ताडोबाच्या जंगलात वनविभागाने संवेदन शील भागात तार फेन्सिंग करून गाव आणि जंगलाची सीमा सुरक्षित केली आहे, त्याच धर्तीवर मेळघाटातही तातडीने तार फेन्सिंग करावी, अशी मागणी गेल्या अनेक दिवसांपासून होत आहे.शिवाय,पिकांच्या नुकसानीचा मोबदला वेळेत मिळत नाही आणि वन्यप्राण्यांना जंगलातच रोखण्यासाठी पाणवठे व फळझाडांची कोणतीही ठोस उपाययोजना होत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

हवामान खात्याने ११ आणि १२ सप्टेंबरला मुसळधार पावसाचा अंदाज दिला आहे. या पावसावर सर्वांचे लक्ष आहे. हा पाऊस झाला तर पिकांना मोठा दिलासा मिळेल.पावसाची तूट आणि वन्यप्राण्यांच्या नुकसानीची प्रशासनाने तातडीने पाहणी करून शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.

# कौशल्य विकास आणि स्वायत्ततेवर भर देण्याची गरज-प्राचार्य अनिल राव

## प्रथम कुलगुरू डॉ.के.जी. देशमुख व्याख्यानमाला, मातोश्री विमलाबाई महाविद्यालयाचे यशस्वी आयोजन

**अमरावती/का.प्र.**

सध्याच्या बदलत्या जागतिक प्रवाहात उच्च शिक्षण व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने उभी ठाकली आहेत. पारंपारिक शिक्षण पद्धती आणि पदव्यांच्या पलीकडे जावून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष रोजगाराभिमुख आणि कौशल्यपूर्ण बनवणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कार्यबल गटाचे सदस्य तथा वरिष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य अनिल राव यांनी केले.



विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग आणि मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथम कुलगुरू डॉ.के.जी. देशमुख व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी 'उच्च शिक्षण : वेध परिवर्तनाचा' या विषयावर व्याख्यान देतांना प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर, सचिव श्री विजय ठाकरे, सदस्य श्री हेमंत काळमेघ, श्री खोटरे, माजी कुलसचिव प्रा.सी.डी. देशमुख, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख व विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.




उच्च शिक्षणातील एका दशकाचा आढावा घेतांना त्यांनी आकडेवारीनिशा दिलेली माहिती खूप महत्वपूर्ण आहे. मुलांच्या तुलनेत मुलींचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढलेले आहे. याशिवाय अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणातील प्रमाण सुद्धा वाढले असून हा देशाचा सामाजिक आणि शैक्षणिक समतेचा एक अत्यंत सकारात्मक आणि प्रेरणादायी टप्पा आहे. देशात विद्यापीठे आणि महाविद्यालयांची संख्या झपाटयाने वाढली असली तरी शासकीय सहभाग कमी होवून खाजगीकरणाचा टक्का वाढत आहे.खाजगी विद्यापीठांची संख्या २६१ वरुन ५५६ वर पोहोचली, तर एकूण महाविद्यालयांपैकी जवळपास ५१ टक्के विद्यार्थी आज विनाअनुदानित महाविद्यालयां मध्ये शिक्षण घेत आहेत.त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणात २०३५ पर्यंत जीईआर चे प्रमाण ३१.५ टक्क्यांवरुन ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. असे त्यांनी सांगितले

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख मनोगत व्यक्त म्हणाले, डॉ.के.जी. देशमुख यांनी १९८३ साली अमरावती विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून सलग नऊ वर्षे यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठात अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले गेले. नवीन शैक्षणिक विभागांची स्थापना, नानिन्यपूर्ण क्रेडीट सिस्टीम, वित्तीय संहिता तयार केली. विद्यापीठाला केवळ शैक्षणिकच नव्हे, तर सर्वसमावेशक विकासाच्या मार्गावर नेऊन एक मजबूत पाया त्यांनी रचला, ज्यामुळे विद्यापीठ प्रगतीच्या उच्च शिखरावर पोहोचले. तसेच १९९० मध्ये विद्यापीठाला युजीसीची मान्यता मिळवून देण्यात त्यांचे मोठे योगदान असल्याचेही ते याप्रसंगी म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणाया नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी अमरावती विद्यापीठात सुरु झाली आहे.निती आयोगाच्या अहवालानुसार बीए, बीकॉम आणि बीएस्सी सारख्या पदव्यांना आता कमी रोजगार लिकेंज मिळत असून त्यात सुधारणा करण्याची मोठी गरज आहे. एआय चे आक्रमण टाळता येणार नाही. शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी एआय ला आव्हान न मानता एक वरदान समजून आपली मानसिकता तयार करणे गरजेचे आहे. विद्यापीठाने सर्व पदवी अभ्यासक्रमाच्या पाचव्या सत्रात फाऊंडेशन ऑफ एआय हा कोर्स सक्तीचा केला असून त्याचे गुण मार्कशीटवर दर्शविले जाणार आहेत. जुन्या चौकटी मोडून शाश्वत विकास, नैतिक मूल्ये आणि जागतिक बदलांचा वेध घेवून विद्यार्थ्यांना भविष्यातील सक्षम नागरिक बनविण्याची मोठी जबाबदारी प्राध्यापक आणि शिक्षकांवर आहे. विद्यापीठाच्या या उपक्रमामुळे येणाया काळात विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, एआय आणि रोजगाराभिमुख शिक्षणाशी जोडले जाण्यास मोठी मदत होणार असल्याचेही ते म्हणाले.

महाराष्ट्र गीत, विद्यापीठ गीत व संस्था गीताने सुरु झालेल्या कार्यक्रमात सुरुवातीला शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख, कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा व प्रथम कुलगुरू डॉ.के.जी. देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.प्रास्तविकतेतून विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी व्याख्यानमाला आयोजनामागील भूमिका मांडली. स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांनी केले.संचालन डॉ. मंदा नांदुरकर आभार प्रा. ममता म्हस्की यांनी मानले.

कार्यक्रमाला माजी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. हेमंत देशमुख, माजी सहसंचालक डॉ. केशव तुपे,प्राचार्य डॉ. दिपक धोटे, प्राचार्य डॉ. विजय भांगडिया, प्राचार्य डॉ. महेंद्र मेटे,डॉ. ओमप्रकाश मुंदे, छायाताई देशमुख, महाविद्यालयाचे अधीक्षक श्री प्रफुल्ल घवळे तसेच संस्थेचे विश्वस्त संचालक, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते



# ज्ञानाचे ओझे नव्हे, प्रकाश व्हा

**शिक्षकाच्या ज्ञानाबरोबर त्याचे वर्तन अधिक महत्वाचे असते, अहंकारविरहीत, संवेदनशील, सतत शिकत राहणारा असणे हीच शिक्षकाची खरी ओळख आहे. कारण असेच शिक्षक आयुष्यभर स्मरणात राहतात.**

शिक्षक हा समाजाला आदरणीय व प्रिय असणारा घटक आहे. विविध पदांवरील व्यक्ती, डॉक्टर, इंजिनीअर पासून अधिकारी, शास्त्रज्ञांपर्यंत सर्वांना घडवणारा शिक्षक असतो. प्रत्येक माणसाच्या आयुष्यात शिक्षकाचे स्थान अनमोल असते. शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नाते आदराने व आपुलकीने भरलेले असते. हे नाते अधिक उच्च पातळीवरचे असते जेव्हा शिक्षक व विद्यार्थी अहंकार सोडून आपआपल्या भूमिका बजावतात.

एखाद्या शिक्षकाचा स्वभाव अहंकारी असला तर तो विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे ज्ञान देऊ शकणार नाही. स्वतःच्या विद्येचा गर्व करीत राहील. काही बाबी लपवून ठेवेल. ज्ञान ही शिक्षकाची ताकद असते. परंतु त्याच ज्ञानाचा गर्व करणे ही दुर्बलता ठरू शकते. 'मी खूप अभ्यास करून, वाचन करून ज्ञान मिळवले आहे' हा ज्ञानार्जनाचा गर्व शिक्षकांने ठेवल्यास तो, ते योग्य प्रकारे विद्यार्थ्यांना देऊ शकणार नाही. सध्याचा विद्यार्थी अनेक माध्यमांतून माहिती मिळवत असतो. कितीतरी गोष्टी वर्गात शिकविण्याआधी त्यांना माहीत असतात. त्यातून ते प्रश्न विचारतात, वेगवेगळी मते मांडतात. अशा वेळी विद्यार्थ्यांची जिज्ञासा ओळखून समजून घेऊन समर्पक उत्तरे देणे महत्वाचे आहे. उत्तर तात्काळ येत नसेल तर, 'तुला काय करायचय, मी सांगतो ते नीट ऐक, उगीच काहीही प्रश्न विचारू नको' अशा भाषेपेक्षा मला या प्रश्नाचे उत्तर आता माहीत नाही, आपण शोधूया' असे म्हणणारा शिक्षक विद्यार्थ्यांच्या नजरेत कमी होत नाही, उलट आदर वाढतो. ज्ञानी माणसाने अज्ञानाची जाणीव ठेवून वागल्यास ते ज्ञान आदरास पात्र ठरते. कधी कधी विद्यार्थी चुकतात, चुकणारच. अशावेळी शिक्षकाचे काम चूक समजावून देणे असते.

'तुला एवढेसुद्धा येत नाही?', 'तू कधीच काही करू शकणार नाहीस', अशी वाक्ये मुलांच्या मनावर वाईट परिणाम करतात. त्याऐवजी काय चूक झाली ते नीट समजावून सांगून ती सुधारण्याची संधी व योग्य दिशा दाखवायला हवी. ते विद्यार्थ्याला चुकांतून बाहेर पडून उभे राहायला शिकवते आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांतून स्वतःला शिकण्याची संधी मिळते ही भूमिका शिक्षकांनी घेतली पाहिजे. शिक्षक वेगवेगळ्या पदांवर कार्य करीत असतो त्या पदांचा गर्व देखील येऊ शकतो. खरे तर अधिकारासोबत गर्व वाढण्याऐवजी नम्रता वाढली पाहिजे. परंतु अधिकार आले की, तो शिक्षक आपल्या कनिष्ठ पदावरील व्यक्ती, शिपाई वर्गाला, विद्यार्थ्यांना कसे वागवतो याचे निरीक्षण विद्यार्थी करत असतो. त्यातून त्यांचा आदर किंवा अनादर करतात.

विद्यार्थी अनुकरणप्रिय व निरीक्षण करणारे बोलतो, कसे वागतो याची फार मोठी दक्षता असतात. त्यामुळे त्यांच्यासमोर आपण काय शिक्षकाने घ्यायला हवी. सरळमार्गाने, शांतीने, सत्याने, निगर्वी शिक्षकाचे सहजतेने वागणे असते तेच विद्यार्थ्यांना भावते. 'बोले तैसा चाले। वंदावी पाऊले।।'असा शिक्षक विद्यार्थ्यांना आवडतो. विद्याथ्यर्थ्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील दोष काढून नकारात्मक बोलणे व वागणे न घेणारा शिक्षक प्रिय असतो. कारण तो जमिनीवर करता त्यांना त्यांच्या पातळीवर जाऊन समजून त्यांच्यासोबत चालत असतो.

काही शिक्षकांना वाटते मी श्रेष्ठ आहे. विद्यार्थ्यांनी माझ्यासारखे बनायला हवे. सतत मला भाव देत राहिले पाहिजे. माझ्यापुढे नमले पाहिजे. शिक्षकाची श्रेष्ठता मान मागण्यात नाही तर विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभे करण्यात असते. आपल्या विचारांचे अनुयायी बनवण्यापेक्षा विद्यार्थ्यांना स्वबुद्धीने विवेकशील बनवणे, त्यांना स्वतःचे अनुभव घेऊ देणे. योग्य वेळी दिशा दाखवणे हेच खऱ्या शिक्षकाचे आद्य कर्तव्य असायला हवे. जे. कृष्णमूर्ती म्हणतात, 'शिक्षणाचे कार्य म्हणजे विद्याथ्यर्थ्याला सखोल आणि चिकित्सक विचार करायला लावणे. माझेच म्हणणे अंतिम हा शिक्षकाचा अहंकार शिक्षण विषयक उद्देशाला विरोधी आहे.'

शिक्षकाने आर्थिक स्तरावरील सर्व जातीधर्मातील व सर्व प्रकारच्या बौद्धिक पातळीवरील विद्यार्थ्यांना समान दृष्टीने 'विद्यार्थी' म्हणून पाहायला हवे व तसेच वागायला देखील हवे. श्रेष्ठ कनिष्ठ ही तुलना अहंभाव निर्माण करत किंवा न्यूनगंड निर्माण करते. ज्ञान, पद, अनुभव, आदर यामुळे शिक्षकाच्या मनात नकळत अहंकार वाढू शकतो. या अहंच्या बाघेपासून शिक्षकांनी सावध राहायला पाहिजे. अहंकार आला तर ज्ञानाचे ओझे होते. परंतु नम्रता आली तर ते ज्ञान प्रकाश असणे हीच शिक्षकाची खरी ओळख आहे. कारण असेच शिक्षक आयुष्यभर स्मरणात राहतात. बनून वाटा उजळवते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणतात, 'शिक्षक हे देशातील सर्वोत्तम बुद्धिमतेचे लोक असायला हवेत. त्याचबरोबर ते नैतिक जडणघडणीत आधार बनायला हवेत.' शिक्षकाच्या ज्ञानाबरोबर त्याचे वर्तन अधिक महत्वाचे असते, अहंकारविरहीत, संवेदनशील, सतत शिकत राहणारा 'या हृदयीचे त्या हृदयी देतो तोच खरा शिक्षक' म्हणूनच अहंकाररहित निर्मळ, प्रेमळ शिक्षक विद्यार्थ्यांच्या हृदयात स्थान निर्माण करतो. अशा संस्कारातून घडलेले विद्यार्थी परिपूर्ण व्यक्तिमत्व असणारे, समाजाप्रती संवेदना असणारे, सुजाण नागरिक घडतील.

**डॉ. वर्षा खोत**
९४२३५६५८८६

# 'मारबत उत्सव'-विडंबना दडपण्याचा सत्ताधारी पक्षाचा प्रयत्न

नागपूरचा मारबत उत्सव हा महाराष्ट्रातील विदर्भ भागात पोळ्याच्या दुस-या दिवशी म्हणजेच तान्हा पोळ्याच्या दिवशी साजरा केला जाणारा एक अद्वितीय आणि ऐतिहासिक उत्सव आहे. ही सुमारे १४० ते १४४ वर्षे जुनी परंपरा आहे, जी प्रामुख्याने नागपूरातच साजरी केली जाते. याची सुरुवात १८८१-१८८५ च्या सुमारास त-हाणे तेली समाजाने केली. या उत्सवात पिवळी व काळी मारबत यांचे मोठे पुतळे तयार करून त्यांची मिरवणूक काढली जाते. कृष्णाला मारण्यासाठी आलेल्या पुतना मावशीचे प्रतीक म्हणून 'काळी मारबत' तर लोकांचे रक्षण करणा-या शक्तीचे प्रतीक म्हणून 'पिवळी मारबत' मानली जाते. समाजातील वाईट चालीरीती, अंधश्रद्धा, रोगराई, महागाई आणि अनिष्ट प्रवृत्ती दूर जाव्यात यासाठी 'इडा-पीडा घेऊन जा गे मारबत' असा नारा देत हा उत्सव साजरा होतो. एकूणच इडा-पीडाचे निरोपण होते. मारबतीच्या बरोबरीने चालू घडामोडी, राजकीय विडंबन आणि सामाजिक समस्यांवर भाष्य करणारे 'बडग्या' नावाचे पुतळेही मिरवणुकीत रांगेत फिरवले जातात आणि शेवटी त्यांचे दहन केले जाते.

रसाळ संत्री, झिरो माईल, दीक्षाभूमी आणि वाघ अशी शहराची ओळख सांगणारी अनेक वैशिष्ट्ये डोळ्यासमोर येतात. मात्र नागपूरच्या सांस्कृतिक ओळखीचा अनोखा भाग म्हणजे मारबत-बडग्यांची मिरवणूक. धार्मिक आणि सांस्कृतिक मिरवणुका देशभरात पाहायला मिळतात. मात्र वाईट प्रवृत्ती, सामाजिक अनिष्ट रूढी-परंपरा तसेच ब्रिटिश सत्तेविरोधातील भावना प्रतीकात्मक पद्धतीने व्यक्त करणारा मारबत उत्सव नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासात विशेष स्थान राखतो.राज्यविकास पर्यटन मंडळाने मान्यता दिलेल्या नागपूर शहराने वर्षानुवर्षे मारबत मिरवण्याची परंपरा जपली आहे आणि त्यामुळे संपूर्ण देशातील मारबत मिरवणुकीच्या वेगळेपणासाठी नागपूर हे शहर ओळखले जाते. मारबत उत्सव म्हणजे नागपूर शहराला लाभलेला ऐतिहासिक वारसा. नागपूरमध्ये दरवर्षी बैल पोळ्याच्या दुस-या दिवशी पिवळी व काळी मारबत तसेच बडग्याची भव्य मिरवणूक धूमधडाक्यात काढली जाते. कोरोना अपवाद वगळता यात कधीच खंड पडला नाही.



काळी व पिवळी मारबत उत्सव समिती व बडग्या उत्सव समितीकडूनच मिरवणुकीसह विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.मात्र यावर्षी प्रथमत: महापालिकेतील सत्ताधारी भाजपने तो साजरा करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे मारबत उत्सव आयोजक समितीकडून 'हायजॅक' करण्याचा प्रयत्न केला जात आहे. 'ईडा पिडा घेऊन जा गे मारबत' असा जयघोष करीत तरुण या मारबत मिरवणुकीत सामील होतात. स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मुद्द्यांकडे लक्ष वेधणारे बडगेही या मिरवणुकीत सामील केले जातात. अर्थात अनेक बडगे हे राज्य किंवा केंद्र सरकारच्या धोरणाविरुद्ध असतात. अशावेळी सरकारच्या नावानेही या मिरवणुकीत बोंब ठोकली जाते. सरकारविरोधात एका दिवसासाठी दिलेल्या घोषणांमुळे सत्ताधा-यांविरोधात वातावरण तयार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महापालिकेतील भाजप सत्ताधा-यांनी या महोत्सवासाठी प्रथमच अर्थसंकल्पात तरतूद केल्याने आताच या महोत्सवाला महापालिकेने हातात का घेतले? अशी चर्चा रंगली आहे.

मारबत मिरवणुकीत ८० टक्के तरुणांचा समावेश असतो. नुकताच जंतर-मंतरवरील आंदोलनातून तरुण दूर जात असल्याचे भाजपच्या लक्षात आल्याचे केंद्र सरकारने घेतलेल्या एक विद्यापीठ एक मंत्री संवादाच्या निर्णयातून दिसून येत आहे. त्यामुळे तरुणापर्यंत पोहोचण्यासाठी मारबत महोत्सव उत्तम संधी असल्याने भाजप सत्तेत असलेल्या महापालिकेने हा उत्सव हातात घेतल्याचीही चर्चा यानिमित्त रंगली आहे. सत्ताधा-यांच्या या प्रयत्नातून तरुण भाजपच्या गळाला लागणार काय, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल. आतापर्यंत काळी व पिवळी मारबत उत्सव समिती व बडग्या उत्सव समितीचे पदाधिकारी व्यापारी वर्गाकडून वर्गणी गोळा करून देखणी व आकर्षक मिरवणूक काढत होती. एका लाखापेक्षा जास्त नागरिक यात सहभागी होत असल्याने महापालिकेची भूमिका मिरवणूक गेल्यानंतर रस्ते स्वच्छ करण्याची होती. परंतु यंदा महापौर नीता ठाकरे यांच्या नेतृत्वात सध्या महापालिकेकडून मारबत महोत्सवाची जोरदार तयारी सुरु आहे. महापालिकेच्या स्थायी समिती सभापती शिवानी दाणी यांनी अर्थसंकल्पात या महोत्सवासाठी २ कोटींची तरतूद केली आहे. हा नागरिकांचा उत्सव असल्याने यात नागरिकांच्या सहभागासाठी महापालिकेला प्रयत्न करावे लागणार नाही. परंतु महापालिकेने या महोत्सवासाठी केंद्रातील मंत्री, देशातील व्यक्तिविशेषच नव्हे तर परदेशातील भारतीयांनाही बोलावण्याचा निर्धार केला असून निमंत्रण दिले जात आहे. आता या महोत्सवाच्या निमंत्रणाला केंद्रीय स्तरावरील नेते, परदेशी पाहुणे किती प्रतिसाद देतात, यावर महापालिकेचे यश अवलंबून राहणार असल्याचे उत्सव समितीतील काहींनी नमूद केले. त्यामुळे महापालिकेला या डावपेचात यश मिळेल का याकडे डोळस नजरेने पाहिल्या जाईल.

**सुनील शिरपुरे,**
मो.७४९८८८५०६१

## त-ड-का

### हे वरूण राजा..

पावसा अभावी
नदी नाले कोरडे
सांग ,सर्जा राजाला
आता पोहाडू कुठे रे?..

ये ये येरे पावसा म्हणून
केली तुझी विणवणी
पोळ्याला तरी येऽरे
आनंद कर द्विगुणी ..

भर ज्वानीत पिके
टाकून राहीलेत माना
आता तरी तुला..
फुटू दे रे पान्हा !

पिके कोमेजली-
वातावरण झाले भकास
बळीराजाच्या नशिबी का रे
चिंतेचे सावट बारोमास?



**-प्रा.अशोक सारडा, मेहकर**
मो९४२१३ ९४३३९

# प्रा. पंडित मनोहरराव कविश्वर : बहुआयामी कलासाधक

काही माणसे काळाच्या पलीकडे जातात, तर काही काळाच्या ओघात मागे पडत नाहीत. काळ पुढे सरकत असतानाही त्यांच्या पाऊलखुणा सांस्कृतिक स्मृतीच्या वाटेवर उमटलेल्या दिसतात. काही व्यक्तिमत्त्वे एखाद्या पदापुरती, संस्थेपुरती किंवा एका कलाप्रकारापुरती मर्यादित राहत नाहीत; ती हळूहळू एका शहराच्या सांस्कृतिक स्वभावाचा अविभाज्य भाग बनतात. अमरावतीच्या सांस्कृतिक विश्वात असेच एक बहुआयामी, प्रतिभासंपन्न आणि कलासक्त व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रा. पंडित मनोहरराव कविश्वर. कवीचा संवेदनशील शब्द, गीतकाराची कल्पनाशक्ती, गायकाचा स्वर, संगीतकाराची अंतःप्रेरणा, नटाची अभिनयशक्ती आणि दिग्दर्शकाची रंगदृष्टी यांचा अद्भुत संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झाला होता. ते प्राध्यापक होते; मात्र त्यांची ओळख केवळ अध्यापनापुरती मर्यादित नव्हती. कलेची साधना करताना तिचा उपयोग समाजजागृती आणि राष्ट्रसेवेसाठीही करता येतो, याची त्यांना खोल जाणीव होती. म्हणूनच त्यांच्या जीवनाचा मागोवा घेताना आपण केवळ एका कलाकाराचे चरित्र वाचत नाही, तर अमरावतीच्या एका समृद्ध सांस्कृतिक पर्वात प्रवेश करतो.

### शब्दांना स्वरांची पंखे लाभली..

कविश्वर दादांच्या सर्जनशील व्यक्तिमत्त्वाचा विचार केला की सर्वप्रथम स्मरणात येते ते त्यांचे अद्वितीय सांगीतिक स्वप्न 'गीत गोविंद'. सन १९६० मध्ये त्यांनी रचलेले 'गीत गोविंद' म्हणजे भगवान श्रीकृष्णाचे जीवन,त्याचे कार्य, कर्मयोग आणि त्यामागील जीवनतत्त्वज्ञान यांचा गीतरूपाने केलेला सांगीतिक आविष्कार. गदिमांच्या 'गीत रामायण'च्या धर्तीवर श्रीकृष्णाचे चरित्र गीतरूपाने मांडण्याचा हा प्रयत्न होता. मात्र हा केवळ कृष्णचरित्राचा गायनप्रयोग नव्हता; कृष्णाच्या जीवनातून माणसाला काय मिळते, कर्तव्य म्हणजे काय, कर्म आणि जीवन यांचा संबंध काय, मानवतेचा खरा अर्थ कोणता, अशा प्रश्नांना स्वरांच्या माध्यमातून भिडण्याचा तो प्रयत्न होता.

### भाषांच्या विश्वातून उमललेली काव्यप्रतिभा

कविश्वर दादांच्या कलासृष्टीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे मराठी, संस्कृत, हिंदी, ब्रज आणि इंग्रजी या भाषांवरील त्यांचे प्रभुत्व.हे भाषाज्ञान केवळ वाचन, लेखन किंवा संभाषणापुरते मर्यादित नव्हते. प्रत्येक भाषेतील साहित्य, काव्यपरंपरा, प्रतिमा-प्रतीके, भावछटा आणि सांस्कृतिक संदर्भांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. संस्कृतच्या गांभीर्यापासून ब्रजच्या माधुर्यापर्यंत आणि हिंदीच्या सहज प्रवाहापासून मराठीच्या भावस्पर्शी अभिव्यक्तीपर्यंत भाषेच्या विविध रूपांचा त्यांनी आपल्या कलासाधनेत समर्थ उपयोग केला.

### भावातून रस..आणि रसातून अभिनय

भाव, रस, काव्य आणि अभिनय या घटकांचा परस्परसंबंध त्यांच्या कलादृष्टीत अत्यंत महत्त्वाचा होता. शब्दांचा अर्थ समजणे ही कलेची सुरुवात आहे; परंतु त्या शब्दांमधील भाव कंठातून, चेहऱ्यावरील भावमुद्रांतून, देहबोलीतून आणि साभिनय सादरीकरणातून रसिकांपर्यंत पोहोचणे ही खरी कलासाधना आहे, याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे त्यांच्या सादरीकरणात संगीत आणि अभिनय हे स्वतंत्र घटक न राहता एकमेकांत मिसळलेले दिसत. काव्यातील भावानुसार चेहऱ्यावरील भाव, प्रसंगानुसार अंगविक्षेप, संवादातील चढ-उतार आणि गाण्याच्या आशयाशी सुसंगत अभिनय यांचे ते बारकाईने नियोजन करीत.

### गायकाचा कंठातील 'लगाव' शोधणारा संगीतद्रष्टा

गायकाच्या आवाजातील 'लगाव' आणि उत्तम सादरीकरणाचा त्यांचा अभ्यासही विलक्षण होता. प्रत्येक गायकाचा कंठ, आवाजाची जात, स्वरांची ठेवण, उच्चारपद्धती आणि भाव व्यक्त करण्याची क्षमता वेगळी असते. या वैशिष्ट्यांची जाण ठेवून रचना गायकाच्या आवाजाला अनुरूप कशी फुलवायची, याचा ते विचार करीत. कोणत्या शब्दावर किती वजन द्यायचे, कुठे स्वराचा विस्तार करायचा, कुठे मृदू स्पर्श द्यायचा आणि कुठे काव्याचा अर्थ ठळक करायचा, या सूक्ष्म बाबी त्यांच्या रचनांमध्ये जाणवत. त्यामुळे गायक केवळ रचना गात नसे; तो तिचा भावार्थ आपल्या कंठातून जगत असे.

या सर्व कलाप्रकारांना एका सुसंवादी कलाकृतीत एकत्रित करण्याची विलक्षण क्षमता त्यांच्यात होती. काव्य, भाषा, भाव, रस, अभिनय, राग, स्वर, ताल, लय, गायकाचा आवाज आणि रंगमंचीय मांडणी या प्रत्येक घटकाची स्वतंत्र जाण असूनही ते त्यांना वेगवेगळे ठेवत नसत. या सर्व संवेदनांना एका कलात्मक केंद्रबिंदूवर आणून एकसंध कलानुभव निर्माण करणे, ही त्यांच्या सर्जनशीलतेची खरी ताकद होती.

'गीत गोविंद'मधील दोन गीतांना महाराष्ट्राच्या सांगीतिक विश्वातील अमूल्य आवाज लाभला.सुप्रसिद्ध गायक-संगीतकार सुधीर फडके अर्थात बाबूजींचा. कविश्वर दादांनी अमरावतीतील प्राध्यापकाची नोकरी सोडून मुंबईकडे प्रयाण केले त्या काळात या गीतांचे ध्वनिमुद्रण सुधीर फडके यांच्या आवाजात झाले. 'गीत गोविंद'चे वैशिष्ट्य केवळ कविश्वरांच्या प्रतिभेत नव्हते; त्यामागे समृद्ध कुटुंबीय सांगीतिक संस्कारही होते. त्यांच्या तीनही कन्या डॉ. मुक्ता, विना आणि डॉ. वर्षा गायिका होत्या आणि सादरीकरणात त्या वडिलांना साथ देत.त्यांचे तीनही पुत्रही संगीताशी संबंधित होते. प्रदीप पुढे मुंबईत स्थायिक झाले; दुर्दैवाने एका अपघातात त्यांचे निधन झाले. संजय गायनाचे कार्यक्रम करीत राहिले, तर दिलीप 'गीत गोविंद'च्या सादरीकरणावेळी साथीला बसत असे. त्यामुळे 'गीत गोविंद' हा एका कलाकाराचा एकल प्रवास न राहता कविश्वर कुटुंबाच्या सांगीतिक संस्कारांचा सामूहिक स्वरानुभव ठरला.



### स्वरांच्या मागे असलेली माणसे

या स्वरविश्वाला अमरावतीतील अनेक दिग्गज कलाकारांचीही साथ लाभली. प्रा. कुमुदताई हिरुरकर, पंडित मनोहरराव कसलीकर, सुरमणी कमाल भोंडे, पंडित डॉ. भोजराज चौधरी,निशाताई चिपळूणकर, प्रा. सुरेखा जोशी आणि प्रा. डॉ. ज्वाला नागले यांनी त्यांच्या अनेक मैफिलींना व रचनांच्या सादरीकरणाला साथ दिली. बाळासाहेब रत्नपारखी तबल्यावर, तर मनोहर कोळेश्वर व्हायोलिन आणि बासरीवर साथ करीत. पेटी दादा स्वतः वाजवीत आणि गरजेनुसार तबलाही वाजवीत असत.

### स्वर जेव्हा रंगमंचावर उतरले..

संगीताची साधना करताना कविश्वर दादांचा प्रवास रंगभूमीपासूनही दूर गेला नाही. ते नट होते, दिग्दर्शक होते आणि संगीत नाटकांचे जाणकार शिल्पकार होते. त्यांनी 'अभिरुची कला व क्रीडा मंदिर' ही संस्था उभी करून स्वतः तिचे संस्थापक अध्यक्षपद भूषविले. 'अभिरुची' ही अमरावतीच्या कलावंतांसाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी 'संगीत शारदा', 'संगीत संशयकल्लोळ','संगीत एकच प्याला' आणि 'संगीत साष्टांग नमस्कार' यांसारखी संगीत नाटके बसविली.

### 'संगीत साष्टांग नमस्कार':शब्दांमध्ये दडलेले सूर शोधणारा कलावंत..

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या 'साष्टांग नमस्कार' या मूळ नाटकातील गीतांमधील सांगीतिक शक्यता ओळखून कविश्वर दादांनी त्यांना प्रभावी चाली दिल्या आणि 'संगीत साष्टांग नमस्कार' रसिकांसमोर आणले. या प्रयोगाचे दिल्ली येथे सादरीकरण झाले. प्रयोगानंतर दिल्लीतील रसिकांनी गीतांच्या कॅसेटची मागणी केली. दादांनी मात्र अत्यंत साधेपणाने सांगितले की, चाली त्यांनी लावल्या असल्या तरी त्या गीतांच्या कॅसेट उपलब्ध नाहीत. त्यांच्या कलाकृतीची लोकप्रियता आणि त्यांचा साधेपणा या प्रसंगातून एकाच वेळी जाणवतो.

### दिल्लीच्या रंगमंचावर अमरावतीचा झेंडा

'अभिरुची कला व क्रीडा मंदिर'च्या वतीने सादर झालेले 'संगीत शारदा' दिल्लीच्या नाट्यस्पर्धेत प्रथम क्रमांकावर आले. अमरावतीच्या कलाकारांनी दिल्लीच्या रंगभूमीवर मिळविलेले हे यश म्हणजे शहराच्या सांस्कृतिक क्षमतेचा गौरव होता आणि त्यामागे कविश्वर दादांची दिग्दर्शकीय दृष्टी होती.

### जेव्हा कलेने राष्ट्रधर्म स्वीकारला

१९६२च्या भारत-चीन युद्धाच्या काळात त्यांनी कलेला राष्ट्रसेवेचे माध्यम बनविले. भारतीय सैनिकांच्या मदतीसाठी गावोगावी लोकजागराचे कार्यक्रम घेतले. स्वतः लिहिलेले आणि संगीतबद्ध केलेले 'तुम्ही म्हणा चीन, मी म्हणतो कुचीन' हे गीत त्या काळात विशेष प्रसिद्ध झाले. देश संकटात असताना कलाकार म्हणून आपली भूमिका काय असावी, याचे उत्तर त्यांनी आपल्या कलेतून दिले. त्यांच्या दृष्टीने कला ही केवळ मनोरंजन नव्हती; ती समाजजागृती, संस्कार आणि राष्ट्रभावना जागविण्याचे साधन होती.

### एका कलावंताच्या जीवनाचा अर्थ..

कविश्वर दादांचे जीवन अनेक रंगांनी आणि स्वरांनी विणलेले होते. कवी म्हणून त्यांनी शब्दांना जिवंत केले, गीतकार म्हणून त्यांना भावविश्व दिले, संगीतकार म्हणून भावनांना स्वर दिले, गायक म्हणून त्या स्वरांना प्राण दिला, नट म्हणून भावनांना देहभाषा दिली आणि दिग्दर्शक म्हणून त्यांना रंगमंच दिला. संस्थापक म्हणून त्यांनी कलाकारांच्या स्वप्नांना व्यासपीठ दिले. मात्र त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खरे मोठेपण या सर्व ओळखींच्या बेरीजेत नव्हते; तर या सर्व कलांना एका अखंड संवेदनामध्ये विलीन करण्याच्या त्यांच्या सामर्थ्यात होते.

### कविश्वर दादांच्या आठवणी

आज त्यांच्या आठवणी जाग्या करताना जाणवते की,त्यांनी निर्माण केलेले स्वर केवळ भूतकाळाचा भाग नाहीत. त्यांच्या कलेत त्यांचा अभ्यास, चिंतन, संवेदना आणि रसिकांच्या मनापर्यंत पोहोचण्याची तळमळ होती. ज्या हातांनी पेटीवर स्वर जागवले, ज्या शब्दांना त्यांनी अर्थ दिला आणि ज्या रंगमंचावर त्यांनी कलाविश्व उभे केले, ते हात आज आपल्यात नाहीत; पण त्यांनी जागवलेली संवेदना अजूनही जिवंत आहे.

काळाच्या कप्प्यात जपलेल्या या सांस्कृतिक वारशाचे दस्तऐवजीकरण करणे, जुन्या आठवणी संकलित करणे, उपलब्ध ध्वनिमुद्रिका, छायाचित्रे आणि कार्यक्रमपत्रिका जतन करणे ही आजची जबाबदारी आहे. कारण दस्तऐवज काळ जपतो; पण आठवणी काळाला अर्थ देतात.

### 'गीत गोविंद' ते 'गीत मनोहर'

आणि आता या सांस्कृतिक स्मृतीला नवे पर्व लाभत आहे. अमरावतीचे सांस्कृतिक भूषण कै. प्रा. मनोहर कविश्वर यांनी रचलेले, सादर केलेले आणि तीस वर्षांहून अधिक काळ रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवलेले 'गीत गोविंद' पुन्हा नव्या रूपात रसिकांसमोर येत आहे. या पुनरुज्जीवित आविष्काराला 'गीत मनोहर' हे नाव लाभले आहे.

आल्हाद आणि आलोक आळशी हे सृजनशील कलाकार बंधू आणि स्पृहा जोशी, पुणे यांच्या माध्यमातून हा पुनराविष्कार साकार होत आहे. अमरावतीमध्ये या पुनरुज्जीवित आविष्काराचा पहिला प्रयोग शुक्रवार, ११ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता श्री. शिवाजी महाराज सभागृह, अमरावती येथे होणार आहे. काळ बदलला, रसिक बदलले, तंत्रज्ञान बदलले; मात्र चांगल्या कलेची तहान बदललेली नाही. त्यामुळे 'गीत मनोहर' हा केवळ कार्यक्रम नसून एका महान कलावंताच्या स्मृतीला केलेला मुजरा आणि अमरावतीच्या सांगीतिक वारशाला नव्याने जागविणारा प्रयत्न आहे.

काही स्वर ऐकले जात नाहीत; ते अनुभवले जातात. काही कलाकार काळाच्या पडद्याआड गेले तरी त्यांच्या कलेतून जिवंत राहतात. 'गीत गोविंद' ते 'गीत मनोहर' हा अशाच अमर स्वरप्रवासाचा पुढचा टप्पा आहे. प्रा. पंडित मनोहरराव कविश्वर यांनी अमरावतीला केवळ कलाकृती दिल्या नाहीत; त्यांनी एक सांस्कृतिक परंपरा दिली. त्यांच्या कलेचा प्रकाश आजही स्मृतीच्या आकाशात तेवत आहे. हीच त्यांच्या कलासाधनेची खरी अमरता आणि त्यांना रसिकांनी दिलेली सर्वांत मोठी आदरांजली.

**प्रा.एम.टी.नाना देशमुख**
अम,मो.९८२२५६६४९१६

# गौमातेच्या नावाने मतांचे राजकारण; पोळ्याला मात्र कोंडवाड्यातील गोवंश उपेक्षित!

■ आ. साजिद खान पठाण यांचा भाजपवर घणाघात
■ कोंडवाड्यात जाऊन गोवंशांचे पूजन, पुरणपोळी-चारा देत केली सुटका

■ प्रतिनिधी | अकोला ■

गोवंश आणि 'गौमाता'च्या नावाने राजकारण करीत सत्ता मिळविणाऱ्या भाजपला पोळ्याच्या दिवशी महापालिकेच्या कोंडवाड्यात बंदिस्त असलेल्या गोवंशांचा विसर पडल्याचा आरोप पश्चिम अकोल्याचे आमदार साजिद खान पठाण यांनी केला. 'गौमातेच्या नावाने घोषणा करायच्या आणि सत्ता मिळाल्यानंतर मुक्या जीवांकडे ढुंकूनही पाहायचे नाही,' अशा शब्दांत त्यांनी सत्ताधारी भाजपवर निशाणा साधला.

पोळा हा शेतकरी आणि गोवंशाच्या जिव्हाळ्याचा सण. जिल्ह्यात सर्वत्र बैलांना सजवून त्यांची पूजा केली जात असताना डाबकी रोड, श्रीवास्तव चौक परिसरातील महापालिकेच्या कोंडवाड्यातील गोवंश मात्र बंदिस्त अवस्थेत होते. रस्त्यावर फिरणाऱ्या मोकाट गोवंशांना पकडून आणल्यानंतर



त्यांना कोंडवाड्यात ठेवण्यात आले होते. पोळ्याच्या दिवशी तरी त्यांच्या पूजेची, चाऱ्याची व्यवस्था होईल, अशी अपेक्षा असताना प्रशासनाकडून कोणतीही हालचाल झाली नसल्याचे आ. पठाण यांनी सांगितले.

### मुक्या जीवांची उपेक्षा; राजकारण मात्र 'गौमाते'च्या नावाने!

गोवंशांच्या नावाने राजकारण करणाऱ्यांनी पोळ्याच्या दिवशी कोंडवाड्यातील गोवंशांची अवस्था पाहावी. घोषणांपेक्षा प्रत्यक्ष कृती महत्त्वाची आहे. सत्ता आणि राजकारणाच्या पलीकडे मुक्या जीवांप्रती संवेदना जपणे गरजेचे आहे, असेही आ. पठाण यांनी म्हटले. यावेळी नगरसेवक आकाश कवडे, राहुल सारवान, अभिजित तवर, अंकुश तायडे, विजय जामनिक, राम कोकाटे, ऋषिकेश जामोदे, अंकुश भेंडेकर, अजय खंडारे, साहिल तेलगोटे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### 'गौमातेच्या नावाने सत्ता; मग पोळ्याला कुठे गेले गोप्रेम?'

गोवंशाच्या नावाने राजकीय भावनिक वातावरण निर्माण करायचे, मात्र प्रत्यक्ष सत्तेत आल्यानंतर त्याच गोवंशांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष करायचे, हा दुटप्पीपणा असल्याचा आरोप आ. पठाण यांनी केला. गोवंशांप्रती खरोखरच आस्था असेल तर ती केवळ भाषणांतून नव्हे, तर कृतीतून दिसली पाहिजे, असे त्यांनी सुनावले.या पार्श्वभूमीवर आ. पठाण यांनी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह थेट महापालिकेचा कोंडवाडा गाठला. बंदिस्त गोवंशांचे विधिवत पूजन करून त्यांना पुरणपोळी आणि चारा खाऊ घातला. त्यानंतर गोवंशांची कोंडवाड्यातून सुटकाही करण्यात आली. पोळ्याच्या दिवशी उपेक्षित राहिलेल्या या मुक्या जीवांसोबत काँग्रेसने सण साजरा करून माणुसकीचा संदेश दिला.

# जिल्ह्यात डीजेला बंदी घालण्याची मागणी

## गणेशोत्सव मंडळांनी ढोल-ताशा, झांज, संबळसारख्या पारंपरिक वाद्यांचा वापर करावा : निखीलेश दिवेकर



■ प्रतिनिधी | अकोला ■

गणेशोत्सव व नवरात्रोत्सवादरम्यान डीजेच्या वाढत्या दणदणाटामुळे नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता अकोला जिल्ह्यात डीजे तसेच लेझर लाइट्सच्या वापरावर पूर्णतः बंदी घालावी, अशी मागणी माजी उपमहापौर निखीलेश दिवेकर यांनी केली आहे. याबाबत त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांना निवेदन दिले.

उत्सव काळात ध्वनिक्षेपकाच्या वाढत्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, लहान मुले तसेच सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. डीजेचा आवाज घरासमोर पोहोचल्यास खिडक्यांच्या काचा हादरण्याइतका तीव्र असतो. त्यामुळे ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्यासाठी डीजेवर पूर्णतः बंदी घालण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

डीजेऐवजी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेतील ढोल, ताशा, झांज, संबळ आदी पारंपरिक वाद्यांचा वापर गणेशोत्सव मंडळांनी करावा, असे आवाहन दिवेकर यांनी केले. पारंपरिक वाद्यांमुळे महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा जपण्यास मदत होईल आणि ध्वनिप्रदूषणाचा त्रासही कमी होईल, असे त्यांनी निवेदनात नमूद केले.

यावेळी चंद्रपूर जिल्ह्यात पोलिसांनी डीजेच्या वापरावर संपूर्ण बंदी घातल्याचा दाखलाही पोलीस अधीक्षकांना देण्यात आला. अकोला जिल्ह्यातही याच धर्तीवर निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली. निवेदन देताना ओंकार वानखडे, महादेव मेहंगे, बंटी खंडारे, विठ्ठल नाकट, प्रवीण बचे, धनंजय उजाडे आणि विनोद भिसे उपस्थित होते.

## साखरसाठ्याची मर्यादा आता २ हजार क्विंटलवर

■ प्रतिनिधी | अकोल ■

केंद्र शासनाच्या आदेशानुसार जीवनावश्यक वस्तू अधिनियमाअंतर्गत १ ऑगस्टपासून साखरेची साठा मर्यादा लागू झाली. आता साखरसाठ्याची मर्यादा ४ हजारहून २ हजार क्विंटलवर कमी करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित व्यावसायिकांना २ हजार क्विंटलपर्यंतच साठवणूक करता येईल. जिल्हा पुरवठा कार्यालयातर्फे जिल्ह्यात नऊ तपासणी पथके गठित करण्यात आली आहेत. त्याद्वारे वेळोवेळी भेटी, पडताळणी, तपासणी केली जात आहे. तपासणी वेळी साखर व संबंधित व्यावसायीकांनी पथकास सहकार्य करावे व साठ्याबाबत निर्देशांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वर्षभराच्या पाठपुराव्यानंतर न्यायालयाचा दणका!

## स्मार्ट टीव्ही, शैक्षणिक सॉफ्टवेअर परत करण्याबाबत दोन आठवड्यांत निर्णय घ्या

### मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे जिल्हा परिषद प्रशासनाला निर्देश

■ प्रतिनिधी | अकोला ■

जेम निविदेसाठी नमुना म्हणून जमा केलेला स्मार्ट टीव्ही आणि शैक्षणिक सॉफ्टवेअर असलेला पेनड्राईव्ह परत मिळविण्यासाठी वर्षभर पाठपुरावा करूनही निर्णय न झाल्याने अखेर प्रकरण उच्च न्यायालयात पोहोचले. या प्रकरणाची दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने संबंधित प्राधिकरणाला दोन आठवड्यांत निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत.

शासकीय ई-मार्केटप्लेस (जेम) अंतर्गत एलईडी स्मार्ट टीव्ही आणि शैक्षणिक सॉफ्टवेअर असलेला




पेनड्राईव्ह याचिकाकर्त्यांनी निविदा प्रक्रियेत नमुना सामग्री म्हणून संबंधित विभागाकडे जमा केला होता. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ही सामग्री परत मिळावी, यासाठी याचिकाकर्त्यांनी तब्बल एक वर्ष अर्ज, निवेदने, स्मरणपत्रे तसेच कायदेशीर नोटीसद्वारे प्रशासनाकडे पाठपुरावा केला.

दरम्यान, स्मार्ट टीव्ही घेण्यासाठी याचिकाकर्त्यांना उपस्थित राहण्यास सांगण्यात आले. मात्र, मूळ स्मार्ट टीव्ही परत न करता वेगळाच नमुना संच देण्यात आल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी न्यायालयात केला. त्यामुळे संबंधित सामग्रीच्या परताव्याचा प्रश्न अधिक गंभीर झाला.

९ सप्टेंबर रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान संबंधित प्राधिकरणाने या प्रकरणी अद्याप निर्णय घेतला नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्याची दखल घेत न्यायालयाने प्राधिकरणाला प्रकरणावर तातडीने निर्णय घेऊन स्मार्ट टीव्ही व इतर सामग्री परत करण्याबाबत कायद्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. तसेच दोन आठवड्यांच्या आत निर्णय घेण्याची स्पष्ट कालमर्यादा निश्चित केली.

### वर्षभर प्रशासनाकडे हेलपाटे

नमुना म्हणून जमा केलेली सामग्री परत मिळविण्यासाठी याचिकाकर्त्यांनी विविध स्तरांवर पाठपुरावा केला. मात्र, वारंवार अर्ज व स्मरणपत्रे देऊनही ठोस निर्णय होत नसल्याने अखेर न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्यात आला. न्यायालयाच्या निर्देशानंतर आता संबंधित प्रशासनाला निश्चित कालमर्यादेत या प्रकरणावर निर्णय घ्यावा लागणार आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर ॲड. साहिल खुशालराव देशमुख यांनी युक्तिवाद केला.

## गणेशोत्सवात प्रसाद, मिठाईऐवजी विद्यार्थ्यांना पुस्तके व शैक्षणिक साहित्य द्या!

■ प्रतिनिधी | अकोला ■

गणेशोत्सव हा आनंद, भक्ती आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव आहे. या उत्सवाच्या काळात गणेशभक्त विविध गणेश मंडळे, मित्रपरिवार, नातेवाईक व परिचितांच्या घरी भेट देताना प्रसाद म्हणून मिठाई, पेढे किंवा इतर गोड पदार्थ घेऊन जातात. मात्र यावर्षी या परंपरेला एक आगळे आणि समाजोपयोगी वळण देत मिठाई किंवा गोड पदार्थांच्या ऐवजी गरजू विद्यार्थ्यांसाठी पुस्तके, वह्या व शैक्षणिक साहित्य देण्याचे आवाहन रेडक्रॉस सोसायटी अकोल्याचे वतीने करण्यात आले आहे.गणपती बाप्पाला प्रसाद म्हणून आपण मिठाई घेऊन जातो.


## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५१६/२०२६ प्रोसेस नं.११४५०/२०२६
चौ.ता. २७/१०/२०२६ दिनांक : ०७/०९/२०२६

**अर्जदार :** आशाबाई विठ्ठलराव राउत रा. मु. आपातापा, पो. आपोती, ता. जि. अकोला,

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** नामदेवराव रंगरावजी टापरे रा. आखतवाडा, ता. जि. अकोला.
**मयताचा पत्ता :-** मयत : रंगरावजी गोपालरावजी टापरे
**पत्ता :-** रा. आपोती खुर्द, आखतवाडा, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रंगरावजी गोपालरावजी टापरे यांचे दि. २१/१२/२०२१ रोजी आखतवाडा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


# मुंडगावच्या पोळ्यात 'शिव-मल्हार'चा डंका!

## अशोक भिसे यांच्या बैलजोडीला प्रथम क्रमांक; सामाजिक एकतेचेही घडले दर्शन

■ प्रतिनिधी | अकोट ■

बैलांच्या सजावटीने नटलेले वातावरण, ढोल-ताशांचा गजर आणि शेतकऱ्यांचा उत्साह... अशा जल्लोषात मुंडगाव येथे सार्वजनिक पोळा उत्सव पार पडला. ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित या उत्सवात अशोक तुकाराम भिसे यांच्या 'शिव-मल्हार' या बैलजोडीने प्रथम क्रमांक पटकावत मानाची झुल मिळवली. विशेष म्हणजे विविध जाती-धर्मांचे शेतकरी एकाच ठिकाणी आपल्या बैलजोड्यांसह सहभागी झाल्याने पोळ्याच्या माध्यमातून सामाजिक एकतेचा संदेशही अधोरेखित झाला.

अकोट तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगावात सार्वजनिक पोळ्याची परंपरा अनेक वर्षांपासून जपली जात आहे. पहिले लोकनियुक्त सरपंच अवधूतराव अंबळकार यांनी सुरू केलेली ही परंपरा



आजही ग्रामस्थांनी कायम ठेवली आहे. पोळ्यानिमित्त शेतकऱ्यांनी आपल्या बैलजोड्यांची आकर्षक सजावट केली होती. काही बैलजोड्यांसोबत विविध सामाजिक व सांस्कृतिक देखावेही सादर करण्यात आले. ग्रामपंचायतीने आयोजित केलेल्या स्पर्धेत अशोक भिसे यांच्या 'शिव-मल्हार' जोडीने बाजी मारली. विजेत्या जोडीला झुल चढवून सन्मान करण्यात आला. तसेच जोडीचे मालक अशोक भिसे यांचा उमाकांत अंबळकार, सरपंच मीना उईके, ग्रामीण पोलिस ठाण्याचे ठाणेदार श्रीधर गट्टे आणि उपसरपंच अनिल गाढे यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर विजेत्या बैलजोडीची गावातून वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमाकांत अंबळकार होते, तर प्रमुख उपस्थिती ठाणेदार श्रीधर गट्टे यांची होती. यावेळी प्रदीप वानखडे, काशीराम साबळे, पंचायत समिती सदस्य जुगल पिंपळे, श्रीकृष्ण रोठे, श्रावण भरषे, विजय ढोरे, विलास बहादुरे, ग्रामपंचायत सदस्य नितीन गाढगे, सुरेश गवई, इम्रान पठाण, भगवान गावंडे, अरविंद फुसे, जुगल चिंचोलकार, भास्कर पोहरकार, अजीज अहमद, विलास ठाकरे, भीमराव सरकटे, सचिन सरकटे, नितीन चांदणे, विशाल ढोरे, कमलेश राठी, राहुल भेले, योगेश घाटोळ, निलय मालधुरे, दिलीप भरक्षे, बीट जमादार शिवकुमार तोमर, निलेश खंडारे, सचिन कुलट, अर्चना इंगळे, प्रतिक्षा शिवरकार, पत्रकार स्वप्निल सरकटे, राजकुमार वानखडे, संजय सपकाळ, विशाल गवई यांच्यासह ग्रामस्थ व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४५८/२०२६ प्रोसेस नं.१११६९/२०२६
चौ.ता. १९/१०/२०२६ दिनांक : ०१/०९/२०२६

**अर्जदार :** १. विजया संजोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. श्रीमती सुमित्रा पुंडलिकराव तायडे २. मीनाक्षी देवेंद्र तायडे ३. जान्हवी देवेंद्र तायडे ४. ओम देवेंद्र तायडे सर्व रा. वाशिंबा, पो. डोंगरगाव, ता. जि. अकोला. मो. क्र. ८७६७८१३६९७
**यताचा पत्ता :-** मयत : देवेंद्र पुंडलिकराव तायडे
**पत्ता :-** रा. वाशिंबा, पो. डोंगरगाव, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत देवेंद्र पुंडलिकराव तायडे यांचे दि. ३०/०७/२०२६ रोजी वाशिंबा, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी आज दिनांक ०१/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



Change In Name

I Have Changed My Name From
**UJJWALA CHHAGAN SUDOKAR**
-TO- **UJJWALA AJAY TANKAR**
My Residential Address in :- At. Botha. Po. Warwand
Dist. Buldhana - 443304


# मातृशक्तीचा अवैध दारूविरोधात एल्गार

## झरंडीतील महिलांची एकजूट; गावातील दारूचे अड्डे उद्ध्वस्त

■ प्रतिनिधी | पातूर ■

वाढत्या अवैध दारूविक्रीमुळे त्रस्त झालेल्या चान्नी पोलीस स्टेशन हद्दीतील झरंडी येथील महिलांनी अखेर आक्रमक पवित्रा घेतला. सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी बुधवारी, ९ सप्टेंबर रोजी सकाळी गावातील अवैध दारूविक्रीच्या अड्ड्यांवर धडक देत ते उद्ध्वस्त केले. या कारवाईत महिलांसह ग्रामस्थांनीही सहभाग घेतला.

गावात अवैध दारूविक्रीमुळे अनेक कुटुंबांमध्ये कौटुंबिक वाद,



भांडणे तसेच आर्थिक अडचणी निर्माण होत असल्याचा आरोप महिलांनी केला. दारूच्या व्यसनाचा परिणाम लहान मुलांवरही होत असल्याने गावातील वाढत्या व्यसनाधीनतेला आळा घालण्याची गरज असल्याचे महिलांनी सांगितले. दारूमुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त होत असल्याने झरंडी गाव दारूमुक्त करण्याचा निर्धार महिलांनी व्यक्त केला. अवैध दारूविक्रीला पायबंद घालण्यासाठी प्रशासन व पोलिसांनीही ठोस कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या मोहिमेत मंगलाबाई हांडे, बेबीबाई ठाकरे, संगिता पांडे, फुलाबाई हांडे, सुंदाबाई हांडे, पद्मिनीबाई ठाकरे, परबाबाई चवारे, कल्पनाबाई लताड, इंदूबाई शिंदे, लीलाबाई कांडकर, वंदना लताड, नादबाई पांडे यांच्यासह सुभाष राठोड, विक्रम जाधव, अनिल ठाकरे आणि ग्रामस्थ सहभागी झाले.


## जाहीर नोटीस

**अकोला वन विभाग, अकोला.**

अकोला वनविभागातील आकोला येथील आरागिरणी परवाना क्र. २५/२०१८ आय.डी.न. MH1059AMAK हया आरागिरणीचे मुळ परवानाधारक श्री. सचिन गिरीशचंद्र शहा एम. आय. डी. सी. फेस॥ अकोला यांनी, त्यांचे मालकीची आरागीरणी मुळ परवान्यातील आरासह (एक ४२ एच.पी उभा बैंड सॉ) डेक्कन वुड तर्फे श्री सुशांत काशिनाथ चासकर बल्लारपुर जि. चंद्रपुर यांना सर्व साहीत्यासह रजिस्टर खरेदीखताद्वारे विक्री केली आहे.

श्री. डेक्कन वुड तर्फे श्री सुशांत काशिनाथ चासकर यांनी सदर मशीन मौजे बल्लारपुर जि. चंद्रपुर येथील MIDC मधील श्री.क्रितेश राजेंद्र टांग रा बल्लारपुर यांच्या मालकीचा मालमत्ता क्र.डब्लु २७०००१४३ शिट नं. ४८ न.मु.क्र.१०९१ आराजी १६७०५.०० चौ. मी. पैकी माझे मालकीच्या आराजी ५५६८.६० चौ.मी. पैकी २७०० चौ. फुट प्लॉटची खाली जागा ३५ महीन्याचे मुदतीकरीता करारनाम्यावर भाड्याने दिलेले आहे. त्यानुसार अर्जदाराने (अकोला वनविभागातुन उपवनसंरक्षक, मध्य चांदा प्रा. वनविभाग चंद्रपुर वनविभागात) पुनर्स्थान निश्चयन करण्यासाठी दिनांक ०४/०९/२०२६ रोजी अर्ज दिला आहे.

सदर आरागिरणी परवाना क्र. 25/2018 आय.डी.न. MH1059AMAK श्री. डेक्कन वुड तर्फे श्री सुशांत काशिनाथ चासकर यांचे नावे मौजे बल्लारपुर जि. चंद्रपुर येथील MIDC मधील श्री. क्रितेश राजेंद्र टांग रा बल्लारपुर यांच्या मालकीचा मालमत्ता क्र.डब्लु २७०००१४३ शिट नं.४८ न.मु.क्र. १०९१ आराजी १६७०५.०० चौ.मी. पैकी माझे मालकीच्या आराजी ५५६८.६० चौ.मी. पैकी २७०० चौ. फुट प्लॉटची खाली जागा ३५ महीन्याचे मुदतीकरीता करारनाम्यावर भाड्याने घेतलेल्या जागेत (अकोला वनविभागातुन उपवनसंरक्षक, मध्य चांदा प्रा. वनविभाग चंद्रपुर वनविभागात) पुर्नस्थान निश्चयन करण्या करिता डेक्कन वुड सॉ मिल बल्लारपुर या नावाने हस्तांतरीत व स्थानांतरीत करणे बाबत ज्यांचे काही हरकत/आक्षेप असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खालील स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्यांकडे किंवा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे) आकोला यांचे कडे लेखी पुराव्यासह आक्षेप सादर करावे. मुदतीत हरकत/आक्षेप प्राप्त न झाल्यास याबाबत कोणाचीही हरकत नाही असे ग्राह्य समजून नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

**सुमंत एस. सोळंके (भा.व.से)**
उपवनसंरक्षक, (प्रा) अकोला वनविभाग अकोला



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २७२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# विकासाच्या नावाखाली वर्धा येथील टेकड्यांची लूट

## मुरूम उत्खननाला खा.अमर काळेंचा दणका; पंकजा मुंडेंकडे धाव घेत सर्व टेकड्या ग्रीन झोन करण्याची मागणी

**वर्धा/जनमाध्यम**

विकासाच्या नावाखाली वर्ध्याच्या टेकड्यांचा घसा घोटण्याचा प्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोप खा.अमर शरदराव काळे यांनी केला आहे. गेल्या चार ते पाच वर्षांत बांधकामाच्या नावाखाली टेकड्यांमधून मोठ्या प्रमाणात मुरूम काढला जात असून दिवसाढवळ्या सुरू असलेल्या या कथित मुरूम चोरीला प्रशासनाची मूक संमती आहे का असा प्रश्न उपस्थित झाला आहे. टेकड्यांवरील बुलडोझर तातडीने थांबवा अशी मागणी खासदार काळे यांनी पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात खा.काळे यांनी ९ सप्टेंबर रोजी पर्यावरणमंत्र्यांना पत्र पाठवून शासनाचे लक्ष वेधले आहे. वर्धा जिल्ह्यात वाढते तापमान आणि बदलत्या



हवामानाची परिस्थिती गंभीर होत असताना उरलेल्या नैसर्गिक टेकड्यांचे संरक्षण करण्याऐवजी त्यांचेच अस्तित्व संपविले जात असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला आहे.

विकास म्हणजे केवळ सिमेंटचे रस्ते उभारणे दिव्यांची रोषणाई करणे आणि काँक्रीटच्या इमारती उभ्या करणे नव्हे. विकासाच्या नावाखाली निसर्गाची कत्तल सुरू असेल तर तो विकास नसून भविष्यातील संकटाला निमंत्रण आहे अशी भूमिका काळे यांनी मांडली आहे.

टेकड्या या पावसाचे पाणी मुरविण्यासह स्थानिक हवामानाचा समतोल राखण्यासाठी आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे टेकड्या नष्ट झाल्यास भविष्यात तापमान वाढ पर्जन्यमानातील बदल आणि पाणीटंचाईचे गंभीर परिणाम वर्ध्याला भोगावे लागू शकतात.

विशेष म्हणजे विकासकामांच्या नावाखाली टेकड्यांमधून मुरूम काढण्याचे प्रकार सुरू असल्याचा आरोप खासदार काळे यांनी केला आहे. संबंधित बांधकाम विभाग आणि कंत्राटदारांच्या भूमिकेची चौकशी करण्याची गरज निर्माण झाली असून प्रशासन नेमके कोणाच्या हितासाठी डोळेझाक करीत आहे असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

जिल्ह्यातील कोणत्याही टेकडीवर मुरूम उत्खननास परवानगी देऊ नये अशी स्पष्ट मागणी काळे यांनी केली आहे. तसेच उत्खननाला आळा घालण्यात अपयशी ठरणाऱ्या संबंधित ग्राम महसूल अधिकाऱ्यांना जबाबदार धरावे अशी मागणीही त्यांनी केली आहे.

आता पर्यावरणमंत्री पंकजाताई मुंडे आणि राज्य शासन या गंभीर मुद्द्यावर काय निर्णय घेतात याकडे वर्धेकरांचे लक्ष लागले आहे. टेकड्या वाचणार की विकासाच्या नावाखाली त्यांच्यावर बुलडोझर फिरतच राहणार याचे उत्तर प्रशासनाला द्यावे लागणार आहे.

### टेकड्यांना ग्रीन झोनचा कवच


वर्धा जिल्ह्यातील सर्व टेकड्या आणि शासकीय मोकळ्या जागा ग्रीन झोन म्हणून घोषित करून तेथे मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करावी अशी मागणी खासदार काळे यांनी केली आहे. त्यामुळे शहर आणि जिल्ह्याच्या पर्यावरणाचे संरक्षण होण्यासोबत वाढत्या तापमानावरही नियंत्रण मिळविण्यास मदत होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

# डोळे गेले, आधारही गेला; शासनाची मदत मात्र कागदावरच

## अस्वलाच्या हल्ल्यात दृष्टी गमावलेल्या साहेबरावांना मदत कधी

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

अस्वलाच्या जीवघेण्या हल्ल्यात दोन्ही डोळ्यांची दृष्टी गमावलेल्या ७० वर्षीय साहेबराव कालोकर यांची अनेक वर्षांपासून शासनाच्या मदतीसाठी फरफट सुरू आहे. बोरखेडी गावाच्या शिवेवर झालेल्या हल्ल्यानंतर उपचारासाठी आष्टी अमरावती आणि नागपूरच्या शासकीय रुग्णालयांची दारे ठोठावूनही दृष्टी परतली नाही. आज ते पूर्णपणे परावलंबी झाले असून शासनाची मदत मात्र अद्याप प्रतीक्षेतच आहे.



मुबारकपूर येथील साहेबराव शेती आणि पशुपालनातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. दूध दही तूप लोणी विक्रीसाठी पायी जात असताना अस्वल आणि तिच्या दोन पिलांनी त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात डोळ्यांना गंभीर दुखापत झाली. उपचारानंतरही कायमस्वरूपी दृष्टी गेल्याने त्यांच्या कुटुंबाचा आधारच हिरावला.

परिस्थितीमुळे साहेबरावांनी गाव सोडून खरंगना मोरंगना येथे भावाच्या शेजारी आश्रय घेतला. एकुलत्या मुलाचे शिक्षण थांबवून त्याला पशुपालनाकडे वळावे लागले.

वन विभागाकडून प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविण्याचे आश्वासन दिले जात असले तरी प्रत्यक्ष मदत कधी मिळणार याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही. शासनाच्या नियमांनुसार वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास आर्थिक मदतीची तरतूद आहे. मग साहेबरावांच्या मदतीला विलंब का असा संतप्त प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे.दृष्टी हिरावली आता तरी शासनाने संवेदना दाखवून मदतीचा हात द्यावा अशी मागणी होत आहे.

## संक्षिप्त

### दगडाने मारून मजुराला जखमी

**आर्वी-** संजयनगर परिसरात किरकोळ कारणावरून एका मजुराच्या डोक्यात दगडाने मारून त्याला जखमी केल्याची घटना घडली. याप्रकरणी अर्जुन संतराव डोंगरे वय ५० वर्षे रा. संजयनगर आर्वी यांनी आर्वी पोलिसांत तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार अर्जुन डोंगरे हे नेहरू मार्केट परिसरातील हॉटेलमध्ये मजुरीचे काम करतात. कामावर जात असताना ते तेजस उर्फ अनिकेत लिखारे याच्या घराजवळून जात होते. त्यावेळी तेजस आरडाओरड करीत होता. आरडाओरड करण्याचे कारण विचारल्याने आरोपीने हातातील दगड अर्जुन यांच्या डोक्यात मारला. त्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन रक्तस्राव झाला. उपचारानंतर अर्जुन यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. या प्रकरणी पोलिसांनी कलम ११८ एक बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### गोठ्यातून दोन बोकडांसह शेळ्या चोरीला

**हिंगणघाट-** घराजवळील गोठ्यात बांधून ठेवलेल्या दोन बोकडांसह दोन शेळ्या अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना निशानपुरा वार्ड परिसरात उघडकीस आली. याप्रकरणी शेख कुतुब हुसेन रा. निशानपुरा वार्ड हिंगणघाट यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार त्यांनी आपल्या गोठ्यात काळ्या रंगाच्या पाच शेळ्या आणि बोकड बांधून ठेवले होते. मध्यरात्रीच्या सुमारास ते लघुशंकेसाठी उठले असता जनावरे गोठ्यात असल्याचे दिसले. मात्र सकाळी गोठ्याची साफसफाई करण्यासाठी गेले असता दोन बोकड आणि दोन शेळ्या गायब असल्याचे निदर्शनास आले. परिसरात शोध घेऊनही जनावरे मिळून आली नाहीत. चोरीस गेलेल्या जनावरांची अंदाजे किंमत ३५ हजार रुपये आहे. हिंगणघाट पोलिसांनी कलम ३०३ बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### स्वस्त धान्य दुकान फोडून दोन लाखांचा माल लंपास

**आर्वी-** बोरगाव हातला येथील स्वस्त धान्य दुकानाचे कुलूप तोडून चोरट्यांनी तब्बल दोन लाख १२ हजार ६२९ रुपयांचे धान्य लंपास केल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी शिरपुरकर वय ४२ वर्षे रा. आशिय कॉलनी आर्वी यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे. तक्रारदार यांच्या घरातूनच स्वस्त धान्य दुकान चालविले जाते. दुकान बंद करून गेल्यानंतर अज्ञात चोरट्यांनी दुकानाच्या दरवाजाचा कोंडा तोडून आत प्रवेश केला. दुकानातील गहू २४ क्विंटल २६ किलो किंमत ७६ हजार २७९ रुपये. तांदूळ २७ क्विंटल ३३ किलो किंमत एक लाख २० हजार रुपये. मका चार क्विंटल ८५ किलो किंमत १४ हजार ५५० रुपये आणि साखर ३६ किलो किंमत १८ हजार रुपये असा माल चोरीला गेला. आर्वी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### अवैध रेती वाहतुकीवर पोलिसांची कारवाई

**देवळी-** देवळी पोलिसांनी अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करून सुमारे दोन लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. निपाणी परिसरात संशयास्पदरीत्या रेती वाहतूक करणारे ट्रॅक्टर आढळून आल्यानंतर पोलिसांनी तपासणी केली. यावेळी लाल रंगाचा महिंद्रा स्वराज ट्रॅक्टर आणि ट्रॉली तसेच रेती वाहतूक करणारे अन्य साहित्य पोलिसांच्या निदर्शनास आले.

# रिकामे पाण्याचे भांडे घेऊन महिलांचा नगरपंचायतीवर हल्लाबोल

## महिनोन्महिने नळ कोरडे; ‘दहा दिवसांत पाइपलाइन’चे आश्वासन, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

आष्टी शहरातील इंदिरानगर परिसरातील नागरिकांच्या संयमाचा अखेर बांध फुटला. महिनोन्महिने नळाला पाणी नाही आणि पिण्याच्या पाण्यासाठी महिलांची अक्षरश वणवण सुरू असताना संतप्त महिलांनी रिकामे गुंडे घेऊन आष्टी नगरपंचायतीवर धडक मोर्चा काढत प्रशासनाला जाब विचारला.

इंदिरानगरचा संबंधित भाग पहाडालगत असल्याने पाण्याचा कोणताही पर्यायी स्रोत उपलब्ध नाही. त्यामुळे नगरपंचायतीचा नियमित पाणीपुरवठाच नागरिकांची जीवनवाहिनी आहे. मात्र अनेक महिन्यांपासून पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. प्रशासनाच्या उदासीनतेमुळे महिलांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला होता.

चर्चेनंतर संबंधित पाणीटंचाईग्रस्त भागात येत्या दहा दिवसांत नवीन पाइपलाइन टाकण्यात येईल आणि त्यानंतर लवकरात लवकर पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येईल, असे आश्वासन मुख्याधिकाऱ्यांनी दिले. मात्र आश्वासनावर आता नागरिकांचा किती विश्वास राहणार, हा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण यापूर्वीही पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर नागरिकांना आश्वासनांचा सामना करावा लागला आहे.

दहा दिवसांची मुदत प्रशासनाला देण्यात आली असून या कालावधीत पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही तर आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नगरसेवक ॲड. मनिष ठोंबरे यांच्यासह महिलांनी दिला आहे.यावेळी नगरसेविका पोहणे ताई, शीतल नासरे, सलमा परवीन, अनिता सानेसर, बेग बी पठाण, गणेश नासरे, सदाशिव शेळके, साठे, रखमाबाई कोसेकर, सायबी पवार, रखमा दरोकर, उमेश पोहणे, अंबादास शेळके, सागर लांडगे, जियातुल्ला खा पठाण यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व नागरिक उपस्थित होते.



# बहुमताचा अखेर विजय, संतोष डंभारे बँकेच्या अध्यक्षपदी

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्हा परिषद एम्प्लॉईज अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेतील सत्तासंघर्षाला अखेर निर्णयक वळण मिळाले. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ पुरस्कृत समृद्धी पॅनलचे संतोष डंभारे यांची आज बँकेच्या अध्यक्षपदी बहुमताने निवड झाली. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या सत्तासमीकरणाला अखेर धक्का बसला आहे.

बँकेच्या सभागृहात झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीचे कामकाज जिल्हा उपनिबंधक कार्यालयाचे अध्यासी अधिकारी यादव यांनी पार पाडले. सात



शाखा आणि एक मुख्यालय असलेल्या या बँकेची उलाढाल शंभर कोटी रुपयांहून अधिक आहे.जून २०२३ मध्ये झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीत समृद्धी पॅनलला बहुमत मिळाले होते. मात्र त्यानंतरच्या सत्तासमीकरणात मोहन कुंभारे अध्यक्ष झाले होते. त्यांनी नुकताच राजीनामा दिल्याने अध्यक्षपद रिक्त झाले होते.

आज झालेल्या निवडणुकीत समृद्धी पॅनलच्या नऊ संचालकांनी संतोष डंभारे यांच्या नावाला बहुमताने पसंती दिली.

विशेष म्हणजे, एकता पॅनलने अध्यक्षपदासाठी कोणताही अर्ज दाखल केला नाही आणि निवडणूक प्रक्रियेतून माघार घेतली.नवनिर्वाचित अध्यक्ष डंभारे यांचे समृद्धी पॅनलचे प्रमुख लोमेश वऱ्हाडे, माजी अध्यक्ष अजय काकडे, रवींद्र राठोड, धनंजय केचे, शेखर लाजूरकर, सुनील तेलतुंबडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सभासदांनी अभिनंदन केले.बहुमताच्या जोरावर ‘समृद्धी’ने पुन्हा बँकेच्या सत्तेची सूत्रे हाती घेतल्याने कर्मचारी बँकेच्या राजकारणात नव्या पर्वाला सुरुवात झाली आहे.

# गांजाची वाहतूक करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अटक

## एलसीबीची धडक कारवाई; १ किलो ८३ ग्रॅम गांजासह १.६४ लाखांचा मुद्देमाल जप्त



**हिंगणघाट/जनमाध्यम**

अंमली पदार्थांची विक्री आणि वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने धडक मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत हिंगणघाट परिसरात गांजाची विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रंगेहाथ पकडले. त्याच्याकडून १ किलो ८३ ग्रॅम गांजा, मोबाईल आणि मोपेड असा एकूण १ लाख ६४ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी अंमली पदार्थ बाळगणाऱ्या तसेच विक्री करणाऱ्या गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले आहेत. माहितीच्या आधारे जाम ते हिंगणघाट राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील सर्व्हिस रोडवर हॉटेल रायगडसमोर सापळा रचण्यात आला. यावेळी सुझुकी बर्गमन मोपेड क्रमांक एमएच ३२ एडब्ल्यू ७४४२ वर आलेल्या साहिल उर्फ नायडू सतीश माणिके वय २४ रा. भीमनगर वॉर्ड हिंगणघाट याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे तपासणी केली असता १ किलो ८३ ग्रॅम गांजा आढळून आला. चौकशीत सदर गांजा शेख अलीम शेख रमजान रा. बडा ताजबाग, आदर्शनगर नागपूर याने पुरविल्याचे निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले.ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक सदाशिव बाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, पोलीस उपनिरीक्षक सिनूकुमार बानोत तसेच पोलीस अंमलदार अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, रवि पुरोहित आणि सागर भोसले यांच्या पथकाने केली.

# सगुना कंपनीच्या पशुखाद्याचा अपहार करणारे दोघे उत्तर प्रदेशातून अटकेत

**हिंगणघाट/जनमाध्यम**

सगुना कंपनीचे सुमारे २९ लाख रुपयांचे पशुखाद्य नियोजित ठिकाणी न पोहोचविता त्याचा अपहार करणाऱ्या ट्रेलर चालकासह क्लिनरला हिंगणघाट पोलिसांनी उत्तर प्रदेशातून अटक केली. आरोपीकडून ५० लाख २० हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सगुना कंपनीचे मॅनेजर जानकीराम आदिविरा यांनी १९ ऑगस्ट रोजी हिंगणघाट पोलिसांत तक्रार दिली होती. त्यानुसार १ ऑगस्ट रोजी ट्रेलर क्रमांक यूपी ४२ डीटी ३६४४ मधून ४१.९६० मेट्रिक टन सोया डीओसी पशुखाद्याची किंमत २९ लाख २८ हजार ९५ रुपये असून ते बिहार येथे पाठविण्यात आले होते. मात्र चालकाने हा माल नियोजित कंपनीत न पोहोचविता परस्पर विक्री करून अपहार केल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलीस पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे मिर्झापूर येथे कारवाई करीत क्लिनर युगराजसिंग यादव याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने चालक अंशुल वर्मासोबत संगनमत केल्याची माहिती दिली. त्यानंतर चालकासही अटक करण्यात आली. आरोपीकडून ९६ पोती पशुखाद्य किंमत ४ लाख ३० हजार ५६० रुपये तसेच ४५ लाख रुपयांचा ट्रेलर जप्त करण्यात आला. याशिवाय मोबाईल, अंगठी आणि चांदीचे दागिने असा मुद्देमालही जप्त करण्यात आला.ही कारवाई पोलीस अधीक्षक



सौरभ कुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# वन्यजीव सप्ताह चांगल्या पध्दतीने साजरा करण्यासाठी नियोजन करा-पालकमंत्री

## वृक्ष लागवड व संवर्धन, वन्यजीव सप्ताहाचा आढावा

**वर्धा/जनमाध्यम**

संपूर्ण राज्यात २ ते ८ ऑक्टोबर दरम्यान वन्यजीव सप्ताह राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यात हा सप्ताह जास्तीत जास्त नागरिक तसेच वन्यजीव प्रेमींचा सहभाग घेऊन अधिक चांगल्या पद्धतीने साजरा करण्यासाठी नियोजन करा. सप्ताहात वने व वन्यजीव संरक्षण जनजागृतीवर भर द्या, अशा सूचना पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात वृक्ष लागवड व संवर्धन तसेच वन्यजीव सप्ताह नियोजनाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी पालकमंत्र्यांनी या सूचना केल्या.

यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल,उप वनसंरक्षक हरवीर सिंह,बोर व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक मंगेश ठेंगडी,जिल्हा नियोजन समिती सदस्य संजय गाते, सामाजिक वनीकरणचे अधिकारी, बोर व्याघ्र प्रकल्पातील कोअर व बफर झोनचे वनपरिक्षेत्र अधिकारी, मानद वन्यजीव रक्षक प्रणव जोशी,कौस्तुभ गावंडे,पीपल्स फॉर ॲनिमलचे आशिष गोसामी आदी उपस्थित होते.



१ ऑक्टोंबर रोजी व्याघ्र प्रकल्पातील कोअर झोन मधील सफारी गेट पर्यटकांसाठी सुरु करण्यात येणार आहे. वन्यजीव सप्ताहाच्या शुभारंभप्रसंगी २ ऑक्टोबर रोजी सफारी गेटच्या उद्घाटन कार्यक्रमाचे नियोजन करावे. जास्तीत जास्त पर्यटकांना सफारीचा लाभ कसा देता येईल यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देश पालकमंत्री डॉ.भोयर यांनी दिले.

राज्यात वृक्षलागवड मोहिम मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात विविध विभागांनी सामूहिक प्रयत्नातून अधिकाधिक लागवड करावी. यासाठी योगदान देऊन उत्तम काम करणारे अधिकारी, कर्मचारी, स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था व त्यांचे पदाधिकारी यांचा विशेष सत्कार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून करण्यात यावा, असे पालकमंत्र्यांनी सांगितले.

वन व सामाजिक वनीकरण विभागाने वन विभागाच्या जागेवर तारेचे कुंपण करुन शेजारी बांबू लागवड करावी. सेवाग्राम येथे वर्धा एमआयडीसी परिसरात वन विभागाच्या जागेवर असलेला बायोडायव्हर्सिटी प्रकल्प पर्यटकासाठी कसा विकसित करता येईल याचे नियोजन करावे. सेवाग्राम येथील अण्णा तलावाचे खोलीकरण करुन तलावाचे सौंदर्यीकरण करण्याच्या सुचनाही यावेळी डॉ.पंकज भोयर यांनी दिल्यात. शहर व शहराबाहेर जाणाऱ्या रस्त्याच्या दुभाजकांवर वृक्षलागवड करण्याच्या सूचना देखील केल्या.

वन्यजीव सप्ताहाचे नियोजन करतांना शाळांमध्ये निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घेण्यासोबतच वन्यजीव विषयावर रील स्पर्धेचे आयोजन करावे. या जनजागृतीपर रील सोशल मिडियावर प्रसारीत कराव्यात. सोबतच छायाचित्र स्पर्धेचे सुध्दा आयोजन करावे. वन्यजीवबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती होईल याबाबत नियोजन करावे, अशा सुचना यावेळी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केल्या.

### दोन पिकअपमधून कोंबून गोवंशाची वाहतूक

**समुद्रपूर-** हिरडी गाव परिसरात दोन पिकअप वाहनांमधून गोवंशाची दाटीवाटीने वाहतूक होत असल्याचे आढळून आल्याने समुद्रपूर पोलिसांनी कारवाई केली. बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी दोन्ही वाहने अडविल्यानंतर पोलिसांना माहिती देण्यात आली.

जनमाध्यम न्यूज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्ष आवृत्ती वर्ष-१४ अंक २८५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय

# १८०० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई, ५५ तडीपार

## ■ पोलीस आयुक्त राकेश ओला यांची माहिती ■ गणेशोत्सव दरम्यान नियम मोडणाऱ्यांची खैर नाही

**अमरावती/प्रतिनिधीः-** गणेशोत्सवात गोंधळ घालणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे. या दरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कार्यवाही केली जाणार आहे. पोलीस विभागाची आरोपींवर करडी नजर आहे. गणेशोत्सावानिमित्त १,८०० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. ५५ गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले आहे.१५० जण तात्पुरते तडीपार होणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी आज गुरुवार १० सप्टेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत दिली आहे.

शहरात गणेशोत्सव शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडावा यासाठी पोलीसांनी कंबर कसली आहे. त्यांनी सांगितले की,कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आतापर्यंत शहरातील सुमारे १,८०० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. तर गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या ५५ सराईत गुन्हेगारांना जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले असून, आणखी १५० जणांना उत्सव काळात तात्पुरते तडीपार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यंदा शहरात ५५० सार्वजनिक गणेश मंडळांना मूर्ती स्थापनेची परवानगी देण्यात आली आहे. सर्व मंडळांनी नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे. गणेशोत्सव दरम्यान शहरात १८०० पोलीस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त राहणार आहे यामध्ये १३५ अधिकारी आहे. तसेच एस आर पी एफ जवानांची एक तुकडी आणि होमगार्ड सैनिकांची पण बंदोबस्तात नियुक्ती करण्यात येणार आहे. चौका चौकात सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांचा बंदोबस्त राहणार आहे तसेच विसर्जन मार्गावर पोलिसांची नजर राहणार आहे. संवेदनशील क्षेत्रामध्ये विशेष बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. पत्रकार परिषद मध्ये डीसीपी शाम घुगे, यशवंत सोळंके उपस्थित होते.



### एक मंडळ एक पोलीस संकल्पना-

पोलीस आयुक्तांनी सांगितले की यंदा गणेशोत्सवात एक मंडळ एक पोलीस ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. प्रत्येक गणेश मंडळासाठी एक पोलिस अंमलदार नियुक्त केला जाणार असून गणेश उत्सवाच्या सुरुवातीचे विसर्जनापर्यंत संबंधित मंडळापर्यंत संपर्कात राहून सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक समन्वय साधला जाणार आहे.

### डीजे आणि लेझर लाईटवर बंदी

यंदा ध्वनी प्रदूषणाबाबत कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा आयुक्त ओला यांनी दिला.मंडळांना डीजे चा आवाज ५५ डेसिबलच्या मर्यादितच ठेवावा लागेल. मिरवणूक आणि मंडपांमध्ये लेझर लाईटच्या वापरास संपूर्ण बंदी घालण्यात आली आहे.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांवर आणि संबंधित व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात येईल. बंदी असलेली लेझर लाईट किंवा नियमबाह्य डीजे साऊंड सिस्टीम वापरताना आढळल्यास वाहना सह संपूर्ण साहित्य जप्त केले जाणार आहे.

# आज अमरावतीत 'गीतमनोहर'चे सादरीकरण



**अमरावती/प्रतिनिधीः-** संगीत क्षेत्रातील अमरावतीचे अग्रगण्य व्यक्तिमत्त्व कै.प्रा.मनोहर कवीश्वर यांचा अत्यंत गाजलेला 'गीतगोविंद' हा कार्यक्रम पुन्हा एकदा रसिकांच्या मेजवानीसाठी येत आहे.

पुणे येथील 'कलावधान' संस्थेतर्फे 'गीतगोविंद' कार्यक्रम 'गीतमनोहर' या नव्या नावाने प्रस्तुत होत आहे. मूळचे अमरावतीकर व सद्या पुणे येथे आयटी क्षेत्रात अभियंते म्हणून कार्यरत असलेले उमेदीचे गायक आल्हाद व आलोक विजयराव आळशी , मृण्मयी जोशी हे गायक 'गीतगोविंद' ची गाणी आपल्या दमदार आवाजात 'गीतमनोहर' या कार्यक्रमात पुनरुज्जीवित करतील.

अश्विन चितळे व सृजना मुळे-कथलकर हे कार्यक्रमाचे सुत्रधार असून सौमित्र क्षीरसागर ( हार्मोनियम) पार्थ ताराबादकर (तबला) आदित्य आपटे (तालवाद्य ) वेधा पोळ , सिद्धी देशपांडे ( व्हायोलिन ) रिया पितळे ( व्हीओला) हे कलाकार गायकांच्या आवाजांना मनोहारी साज चढवणार आहेत. पंचवटीस्थित पीडीएमसीच्या छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृहात शुक्रवार दि.११ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता 'गीतमनोहर' कार्यक्रम सादर होणार आहे.कार्यक्रमासाठी कोणतेही प्रवेशशुल्क नसून सर्व संगीतप्रेमींसाठी कार्यक्रम खुला आहे.

अमरावतीकर रसिकांनी 'गीतमनोहर' कार्यक्रमाला आपल्या आप्तमित्रांसह मोठ्या संख्येत उपस्थित राहून ज्या आयोजक व गायक - वादक कलाकारांनी अमरावतीचे सुपुत्र असलेल्या संगीतरत्न कै.प्रा.मनोहर कवीश्वर यांच्या 'गीतगोविंद' ला पुनरुज्जीवन देण्याचा अभिनंदनीय उपक्रम सुरू केलाय त्याला मनस्वी दाद द्यावी असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

प्रा.मनोहर कवीश्वर यांच्या कन्या वीणा कवीश्वर - सत्यनाथन यांच्याही शुभेच्छा व आशीर्वाद 'गीतमनोहर' च्या चमूला मिळाल्या आहेत.

# दस्तूर नगर येथे बैल पोळा उत्साहात साजरा

**अमरावती/प्रतिनिधीः-** दस्तूर नगर येथे पारंपरिक बैल पोळा सण मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी सुनील राणा आणि महानगरपालिकेचे उपमहापौर सचिन भेंडे यांच्या हस्ते नंदी बैलाचे विधिवत पूजन करण्यात आले. उपस्थित शेतकरी बांधवांना पोळ्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा देत त्यांच्या कष्टाला आणि शेती संस्कृतीला अभिवादन करण्यात आले.



बैल पोळा हा शेतकरी आणि त्यांच्या जीवनाशी जोडलेल्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा पारंपरिक सण आहे. या निमित्ताने दस्तूर नगर परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

कार्यक्रमाला संजय हिंगासपुरे, शिक्षण सभापती प्रीती रेवणे, प्रशांत वानखडे, नंदा सावदे, महेश मुलचंदानी, नितीन बोरेकर, मनोज डहाके, छोटू अकोटकर, निखिल अडसपुरे, अमोल पवार यांच्यासह अनेक मान्यवर, नागरिक आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खासदार वानखडे यांच्याकडून वाघाच्या हल्ल्यातील मृतकांच्या कुटुंबीयांचे सांत्वन

## सोनोरी व करजगाव येथे भेट देऊन व्यक्त केली सहवेदना

**चांदूरबाजार/प्रतिनिधीः-** चांदूरबाजार तालुक्यातील सोनोरी व करजगाव परिसरात वाघाच्या भीषण हल्ल्यात निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागल्याची अत्यंत हृदयद्रावक घटना नुकतीच घडली. या दुर्दैवी घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या उर्मिला बाजीराव इंवने आणि स्व. दिनेश बाबुराव आवरे यांच्या निधनाने संपूर्ण परिसरावर शोककळा पसरली आहे. या भीषण संकटसमयी अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे यांनी दोन्ही कुटुंबीयांच्या निवासस्थानी प्रत्यक्ष जाऊन त्यांची भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले.

कुटुंबातील कमावत्या व आधारवड असणाऱ्या व्यक्तीचे असे अचानक निघून जाणे हा त्या कुटुंबावर झालेला अत्यंत मोठा आघात आहे, अशा शब्दांत खासदार बळवंत वानखडे यांनी तीव्र दुःख व्यक्त केले. 'या दुःखाच्या प्रसंगी आम्ही संपूर्णपणे आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत,' असा भावनिक दिलासा देत त्यांनी शोकाकुल कुटुंबीयांचे अश्रू पुसले. अचानक उद्भवलेल्या या संकटाने शोकाकुल झालेल्या नातेवाइकांचे



आक्रंद पाहून उपस्थितांचेही डोळे पाणावले होते. याप्रसंगी खासदार वानखडे यांनी उपस्थित वनविभाग व पोलीस प्रशासनाच्या अधिकाऱ्यांशी थेट चर्चा करून तातडीने कठोर पावले उचलण्याचे निर्देश दिले. पीडित कुटुंबांना वनविभागाकडून मिळणारी शासकीय आर्थिक मदत कोणत्याही विलंबविना त्वरित मिळावी, तसेच परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी वन्यजीवांचा त्वरित बंदोबस्त करून गस्त वाढवण्यात यावी, अशा कडक सूचना त्यांनी दिल्या. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी वनविभागाने सदैव सतर्क राहण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.या सांत्वनपर भेटीदरम्यान अमरावती ग्रामीण काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, वनपरिक्षेत्र अधिकारी (आर.एफ.ओ.) मोकाशे मॅडम, शिरजगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक प्रशांत जाधव, भाई देशमुख, योगेश इसळ यांच्यासह इंवने व आवरे कुटुंबातील सदस्य तसेच करजगाव आणि सोनोरी परिसरातील गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हँड्स-ऑन टर्बोबॉट ईएसपी३२ आधारित रोबोटवर जी एच रायसोनी विद्यापीठात कार्यशाळा

**अमरावती/प्रतिनिधीः-** जी एच रायसोनी विद्यापीठ, अमरावती येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग (ईएक्सटीसी) विभागाने टर्बोबॉट–ईएसपी३२ आधारित रोबोट विकसित करण्याबाबत पाच दिवसीय हँड्स-ऑन कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यक्रमात ९६ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि त्यांना रोबोटिक्स, एम्बेडेड सिस्टम्स तसेच ईएसपी३२ आधारित रोबोटिक अनुप्रयोगांचा बहुमूल्य व्यावहारिक अनुभव मिळाला.

कार्यशाळेचा शुभारंभ ८ ऑगस्ट रोजी उद्घाटन समारंभाने झाला. यावेळी विशिष्ट अतिथी, संकाय सदस्य आणि सहभागी विद्यार्थी उपस्थित होते. कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले आणि विद्यार्थ्यांना उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा सक्रिय अन्वेषण करण्याचे तसेच हँड्स-ऑन शिक्षणातून व्यावहारिक कौशल्य विकसित करण्याचे आवाहन केले. विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. प्रशांत अवचट यांनी सहभागींना या संधीचा पूर्ण वापर करण्यासाठी प्रेरित केले आणि उदयोन्मुख तांत्रिक आव्हानांसाठी विद्यार्थ्यांना तयार करण्यात व्यावहारिक ज्ञान, नवोपक्रम आणि कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित केले.

इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग विभागाचे प्रमुख डॉ. श्रीकांत चवाटे यांनी कार्यशाळेचे उद्दिष्ट आणि महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी एम्बेडेड सिस्टम्स, रोबोटिक्स आणि आयओटी आधारित अनुप्रयोगांची तांत्रिक समज विकसित करण्यात अनुभवजन्य शिक्षणाचे महत्त्व सांगितले. समारंभात डॉ. अमित गायकवाड आणि विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. स्नेहिल जायसवाल उपस्थित होते. ईएक्सटीसी विभागाचे संकाय सदस्य डॉ. राजश्री वानखेडे, प्रा. रूपाली चोपडे, प्रा. वीना चौधरी, प्रा. यशश्री सोनारे, डॉ. सचिन मेश्राम आणि डॉ. नितिन मांडवगडे यांनीही यावेळी उपस्थित राहून कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात सहकार्य केले.

सैद्धांतिक संकल्पना आणि त्यांच्या व्यावहारिक अंमलबजावणीमधील अंतर कमी करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यशाळेचा मुख्य भर ईएसपी३२ प्लॅटफॉर्मवर टर्बोबॉट विकसित करण्यावर होता. सहभागींना ईएसपी३२ मायक्रोकंट्रोलर प्रोग्रामिंग, इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर इंटरफेसिंग, मोटर कंट्रोल, सेन्सर इंटीग्रेशन, सर्किट कनेक्शन, प्रोग्रामिंग, रोबोटिक हालचाल आणि ट्रबलशूटिंग या विषयांचे प्रशिक्षण देण्यात आले. लर्निंग-बाय-डूइंग पद्धतीचा अवलंब करून विद्यार्थ्यांनी स्वतः आपल्या रोबोटिक प्रणालींची असेंब्ली, प्रोग्रामिंग, चाचणी आणि ट्रबलशूटिंग केली. या व्यावहारिक अनुभवामुळे एम्बेडेड प्रोग्रामिंग, इलेक्ट्रॉनिक्स, रोबोटिक्स, समस्या-निराकरण आणि सिस्टम इंटीग्रेशनमधील त्यांची कौशल्ये अधिक मजबूत झाली.




ईएक्सटीसी विभागातील विद्यार्थी प्रथमेश सपाटे, श्रेयस पचाडे आणि वंश धोबले यांनी तांत्रिक अंमलबजावणी, सादरीकरण आणि हँड्स-ऑन उपक्रमांच्या समन्वयात महत्त्वपूर्ण योगदान दिले. ९६ विद्यार्थ्यांचा मजबूत सहभाग विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि व्यावहारिक अभियांत्रिकी अनुप्रयोगांबद्दल असलेली गहन रुची दर्शवतो. या कार्यशाळेने इलेक्ट्रॉनिक्स, एम्बेडेड सिस्टम्स, रोबोटिक्स आणि आयओटी तंत्रज्ञानाच्या एकत्रीकरणाद्वारे नवीन उपाय विकसित करण्याची समज देणारे प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

# डोळ्याच्या आजाराने अचलपूर-परतवाडा शहरातील नागरीक हैराण

## -डोळे येणाऱ्या रुग्णांचे प्रमाण वाढले

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात सध्या मोठ्या प्रमाणात डोळे येण्याची साथ आली आहे. अनेक रुग्ण या साथीने त्रस्त झाले आहेत. जुळ्या शहरात खासगी आणि शासकीय रुग्णालयात डोळे येणाऱ्या रुग्णांचे प्रमाण वाढले आहे. डोळे येणे हा आजार खूप गंभीर स्वरूपाचा समजला जात नाही; पण तो संसर्गजन्य असल्याने, डोळ्यांसारख्या नाजूक अवयवांवर त्याचा परिणाम होत आहे. तो बरा व्हायला बराच कालावधी लागत असल्याने तो होऊ नये याची काळजी घेणे योग्य आहे.



जुळ्या शहरात लहान मुलांपासून ते मोठ्या माणसांपर्यंत प्रत्येक वयोगटात हा आजार दिसून येतो. या आजाराचा संसर्ग हवेतून पसरत नसून तो स्पर्शातून पसरतो. डोळे येण्याची लक्षणे प्रथमतः एका डोळ्यात दिसतात आणि नंतर दोन्ही डोळ्यांना त्याचा त्रास होण्यास सुरुवात होते. हा संसर्ग हवेतून नाही तर स्पर्शातून पसरतो. यामध्ये डोळे लाल होतात, त्यामधून चिकट स्राव येतो. कदाचित यामुळे हलकासा तापही येऊ शकतो, अशी ही याची लक्षणे आहेत.

हे इन्फेक्शन बॅक्टेरियल (जिवाणू), व्हायरल (विषाणू) किंवा ॲलर्जी यापैकी एका कारणामुळे होऊ शकते. ही साथ संसर्गजन्य असल्याने रुग्णांना सर्व कामकाज सोडून घरामध्ये विभक्त व्हावे लागत असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान देखील मोठ्या प्रमाणात होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.याची लक्षणे पुढील प्रमाणे आहे.डोळे हलके लाल होऊ लागतात.

तसेच पाण्यासारखा चिकट द्रव्य येतो. अनेक रुग्णांच्या डोळ्यांवर सूज येत आहे.सोबतच डोळ्यातून पाणी येऊन खाज येते.आणि सर्दी, खोकला, ताप अशी लक्षणेही दिसत असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीशी बोलताना नेत्र शल्यचिकित्सक डॉ. आशय डांगरे यांनी दिली .आणि काय काळजी घ्यावी ? याची माहिती सुद्धा नेत्र शल्यचिकित्सक डॉ. आशय डांगरे यांनी दिली आहे.यामध्ये डोळे आलेल्या व्यक्तीने वापरलेला रुमाल, टॉवेल, साबण वापरणे टाळावे.आणि बाहेरून आल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुवावेत. तसेच डोळ्यांना सतत हात लावू नये आणि डोळे स्वच्छ पाण्याने धुवावेत असे त्यांनी सांगितले.डोळे आल्यानंतर ते बरे होण्यासाठी साधारणपणे दोन आठवड्यांचा कालावधी लागतो. आजार बरा होण्यासाठी शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीला पूरक औषधे डॉक्टर देतात. डोळ्यांत टाकण्यासाठी ड्रॉप देतात. तसेच ताप किंवा तत्सम काही लक्षणे असतील त्यावरही काही औषधे दिली जातात. ते वापरण्याबरोबरच कॉन्टॅक्ट लेन्सचा वापर टाळावा. घरामध्ये टॉवेल, रुमालाचा वापर करावा. आजार संसर्गजन्य असल्यामुळे सार्वजनिक ठिकाणी जाणे पूर्णपणे टाळण्याचे आवाहन नेत्र शल्यचिकित्सक डॉ. आशय डांगरे यांनी केले आहे.

### स्वच्छतेची विशेष काळजी घ्या-

जुळ्या शहरात डोळे येण्याच्या आजाराची तीव्रता खूप आहे. आजार गंभीर स्वरूपाचा गणला जात नसला तरी यामुळे डोळ्यांना इन्फेक्शन होण्याची शक्यता दाट आहे. त्यामुळे आजाराची लक्षणे जाणवू लागल्यास तज्ज्ञ डॉक्टरांशी संपर्क करून औषधोपचार चालू करा. स्वतःच्या स्वच्छतेची विशेष काळजी घ्यायला हवी.

**– डॉ. आशय डांगरे,**
नेत्र शल्यचिकित्सक, परतवाडा.

रुग्णांनी सेल्फ मेडिकेशन करू नये. हे व्हायरल इन्फेक्शन आहे. मेडिकलवरून परस्पर औषध घेतल्यास आणि त्यांनी अँटिबायोटिक ड्रॉप दिल्यास हा संसर्ग बरा होण्याऐवजी तो वाढत जाऊन बुब्बुळावर डाग पडू शकतो किंवा दृष्टी अंधुक होऊ शकते. तसेच हा रुग्ण आणखी काही लोकांना संसर्ग देत असतो. काचबिंदू किंवा डोळ्याला मार लागल्यामुळे किंवा इतर कारणामुळे ते लाल होऊ शकतात. त्यामुळे नेत्ररोग तज्ज्ञांना दाखवूनच औषध घ्यावे. मेडिकलमध्ये जाऊन परस्पर औषधे घेऊ नयेत.

**डॉ. अश्लेष तिवारी**
**परतवाडा**

# ब्राह्मणवाडा थडी येथे पोळा सण उत्साहात

**ब्राह्मणवाडा थडी/प्रतिनिधीः-** शेतकरी बांधवांचा जिव्हाळ्याचा आणि ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविणारा पोळा सण ब्राह्मणवाडा थडी येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मोठ्या उत्साहात आणि आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत ब्राह्मणवाडा थडीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या पोळा उत्सवाला गावातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



पोळ्यानिमित्त गावातील शेतकऱ्यांनी आपल्या बैलजोड्यांना आकर्षक पद्धतीने सजविले होते. बैलांना रंगरंगोटी करून त्यांच्या शिंगांना रंग लावण्यात आला होता. तसेच विविध प्रकारच्या सजावटीच्या साहित्याने बैलजोड्या सजविण्यात आल्या होत्या. सजविलेल्या बैलजोड्या पोळा मैदानात आणण्यात आल्याने संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी ग्रामपंचायत ब्राह्मणवाडा थडीचे प्रशासक सरपंच अतुल दारोकर, ज्येष्ठ ग्रामपंचायत सदस्य नंदूभाऊ वासनकर, बाबुभाई इनामदार तसेच मोंटू दाभाडे यांच्या उपस्थितीत बैलांची विधिवत पूजा करण्यात आली. बैलांना औक्षण करून त्यांना नैवेद्य दाखविण्यात आला. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने पोळा फोडण्यात आला.

पोळा उत्सवासाठी गावातील अनेक शेतकरी आपल्या सजविलेल्या बैलजोड्यांसह उपस्थित होते. बैलजोड्यांची संख्या मोठी असल्याने पोळा पाहण्यासाठी नागरिकांनीही मोठी गर्दी केली होती. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी उत्साहाने या पारंपरिक सणाचा आनंद घेतला. यावेळी गावातील नागरिकांमध्ये मोठा उत्साह आणि आनंद पाहायला मिळाला.

पोळा हा केवळ धार्मिक किंवा पारंपरिक सण नसून शेतकऱ्याच्या जीवनात बैलांचे असलेले महत्त्व अधोरेखित करणारा सण आहे. वर्षभर शेतकऱ्याच्या शेतीकामात मोलाची साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची परंपरा या सणातून जपली जाते. त्यामुळे ग्रामीण भागात पोळा सणाला विशेष महत्त्व असून ब्राह्मणवाडा थडी येथेही ही परंपरा उत्साहाने कायम ठेवण्यात आली.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामपंचायत कर्मचारी प्रशांत दारोकर, सचिन सावरकर आणि प्रतीक दाभाडे यांनी विशेष परिश्रम घेतले. ग्रामपंचायत प्रशासन, कर्मचारी आणि ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे पोळा उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**

## बहुउद्देशीय नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अमरावती र.नं.३१४

**फोन नं.०७२१-२६७८३७४/७७७००३६७९४**
**(२०२५-२०२६) (फक्त सभासदांकरीता)**

संस्थेच्या सर्व भागधारक सभासदांना सुचित करण्यात येते की, संस्थेची सन २०२५-२०२६ ची वार्षिक आमसभा दिनांक २७.०९.२०२५ रोजी रविवार सकाळी ठिक ११.०० वाजता अहिल्या मंगलम विवेकानंद कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती येथे घेण्यात येत आहे. त्या बाबत सभेचा अहवाल संस्थेजवळ उपलब्ध आहे. तरी संस्थेच्या सर्व सन्माननीय

**प्र.वा.बोके,**
**अध्यक्ष,**
**बहुउद्देशीय नागरी सहकारी पतसंस्था**

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की माझे पक्षकार नामे **विजयकुमार निर्मलकुमार वर्मा** यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे --

**मिळकतीचे वर्णन** - मौजे -परतवाडा, नझूल शिट नं.१९-डी, मधील नझूल प्लॉट नं.१७, ता.अचलपूर, जि.अमरावती

सदर मिळकत **विजयकुमार निर्मलकुमार वर्मा** यांच्या मालकीची आहे. त्यानंतर **विजयकुमार निर्मलकुमार वर्मा** यांनी PIRAMAL FINANCE LTD. येथे गृहकर्जासाठी अर्ज केला असता सदर मिळकतीचे मूळ सेल सर्टिफिकेट दिनांक २०.०९.२००७ रोजीचे दस्त **क्र.** २३५६ हे मूळ सेल सर्टिफिकेट जे **दि.खामगांव अर्बन को-ऑप.बँक शाखा परतवाडा तर्फे श्रीकृष्ण यशवंत देशपांडे आणि मोहनलालजी पुरुषोत्तम झुनझुनवाला** यांच्यात झाले आहे. ते गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास गहाण/राष्ट्रीयकृत/खाजगी/पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या **७** दिवसांच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही, आणि सदर मालमत्ता ही PIRAMAL FINANCE LTD. येथे गहाण करण्यात येईल, करीता ही जाहीर सुचना.

ठिकाण - अचलपूर-अमरावती
दि.१०.०९.२०२६

शिक्का

**आपला,**
**ॲडव्होकेट**
**रवींद्र रु.वाटाणे,**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो.नं.9823698745**

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ८**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त



## आरटीओ केंद्रात वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**अमरावती**-वाढते प्रदूषण आणि पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाची गरज अधोरेखित करत प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावतीच्या वतीने अंजनगाव बारी रोड येथील वाहन चाचणी केंद्राच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात झाला.कार्यक्रमास महापौर श्रीचंद तेजवानी, प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी नंदकिशोर काळे,गोशाळा महासंघ, विदर्भ प्रांताचे सचिव विजय शर्मा, मोटार वाहन निरीक्षक मयूर मेहकरे,नीलिमा काळबांडे,जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर व अक्षय राठोड आदी मान्यवरांची उपस्थिती होती.मान्यवरांच्या हस्ते वाहन चाचणी केंद्राच्या परिसरात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली.परिवहन विभागाच्या माध्यमातून रस्ता सुरक्षा जनजागृतीसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. 'वृक्ष लावा, वृक्ष जगवा आणि पर्यावरण वाचवा' असा संदेश यावेळी देण्यात आला.कार्यक्रमास परिवहन विभागातील अधिकारी-कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी वृक्षांची लागवड करण्याबरोबरच त्यांचे संगोपन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे आवाहन केले.



## टायटन्स पब्लिक स्कूलमध्ये पोळा सण

**अंजनगाव बारी** - विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीद्वारे संचालित टायटन्स पब्लिक स्कूल, बडनेरा येथे बैलपोळा सण मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. शाळेच्या सकाळच्या परिपाठात विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रमांचे सादरीकरण केले. काही विद्यार्थ्यांनी बैलांची रूपे साकारून पोळा सणाचे महत्त्व सांगणारे लघुनाट्य सादर केले.तसेच विद्यार्थ्यांनी पोळा सणावर आधारित भाषणे व गीते सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. चिमुकले विद्यार्थी शेतकऱ्यांच्या वेशभूषेत सजून आल्याने शाळेच्या परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते.यावेळी शाळेचे प्राचार्य अजय चौबे यांनी विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांना पोळा सणाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. भारतीय संस्कृती आणि शेतीमध्ये बैलांचे असलेले अनन्यसाधारण महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.



## साक्षरता दिन उत्साहात

**चांदूर रेल्वे**-श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती द्वारा संचालित बापुसाहेब देशमुख शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविदयालय,चांदूर रेल्वे येथे आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक डॉ.अतुल ठाकरे, प्रमुख अतिथि जेष्ठ शिक्षिका व शिक्षक प्रतिनिधि एस.बी.देशमुख व फुके यांच्या हस्ते सर्वप्रथम शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या पुतळ्याचे पुजन व हारार्पण करण्यात आले.यानंतर विद्यार्थ्यांची भाषणे झाली. शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.अतुल ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना साक्षरतेचे महत्व पटवून दिले व विद्यार्थ्यांनी आपल्या घरातील व परीसरातील निरक्षर प्रौढ व्यक्तिंना साक्षर करण्याचे आवाहन केले व त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षकांना साक्षरतेची शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन,संचालन व आभार एम.बी.वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# कोणार्क कॉलनीत पुन्हा रानडुकराची एन्ट्री

- रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण; मध्यरात्री १५ ते २० कुत्र्यांचा पाठलाग
- दुर्घटना घडण्यापूर्वी मनपा व वनविभागाने ठोस उपाययोजना करण्याची मागणी

**अमरावती/का.प्र.**

शहरातील कोणार्क कॉलनी (कठोरा नाका) परिसरात रानडुकराचा वावर आढळून आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी रानडुक्कर थेट नागरी वस्तीत फिरत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विशेषतः यापूर्वी शहरातील रानडुकराच्या हल्ल्यात एका ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना घडल्याने कोणार्क कॉलनीतील या प्रकाराकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे.

कोणार्क कॉलनी येथील रहिवासी असलेले श्रीनाथ वानखडे यांनी ९ सप्टेंबर रोजी रात्री सव्वा वाजता कुत्र्यांच्या भुंकण्यामुळे बाहेर आले असता भल्यामोठ्या रानडुकराच्या मागे १५ -२० कुत्रे पाठलाग करत



असल्याचे बघितले. गत एक आठवड्यापासून दररोज मध्यरात्री कुत्रे भुकत असल्याने काल मुद्दाम बाहेर येऊन बघितले असता त्यांना प्रत्यक्ष रानडुकराचा संचार असल्याचे दिसले.

यापूर्वी २४ जून २०२६ रोजी नजीकच्या आशियाड कॉलनी परिसरात मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या ज्येष्ठ नागरिकावर रानडुकराने हल्ला केल्याची गंभीर घटना घडली. त्यात स्व.गोविंद पिंजरकर या ज्येष्ठ नागरिकाचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला. याच कालावधीत या परिसरात कॉटन ग्रीन कॉलनीत एका वासरावर व एका महिलेच्या अंगावर डुक्कर धावल्याची घटना चर्चेत आली होती.स्व. गोविंद पिंजरकर यांच्या रानडुकराच्या हल्ल्यातील मृत्यूनंतर येथील मोठ्या नाल्यावरील सुरक्षा भिंतीच्या बांधकामाची मागणीने जोर धरला होता. या परिसरातील नाली सफाईचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर असून नगरसेवक आपल्याच कार्यात मग्न असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

### दुर्घटनापूर्वी अंमलबजावणी हवी

प्रशासनाने दुर्घटना घडण्याची वाट न बघता मनपा व वनविभागाने यावर तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात,अशी मागणी रहिवाशांकडून करण्यात येत आहे.तसेच परिसरातील साफसफाई मोहिम राबविण्यात यावी अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष धीरज बारबुद्धे यांनी केली आहे.

### मनपा अनभिज्ञ

शहरात रान डुकरांच्या प्रवेशा संदर्भात मनपा अधिकाऱ्यांना कल्पना नसल्याचे प्रथम दर्शनी लक्षात आले. मनपाचे अधिकारी वैद्यकीय अधिकारी डॉ.राजेंद्र देशमुख यांच्याशी संपर्क केला असता वनविभागाला पत्रव्यवहार करणार असल्याचे सांगितले.

## जल व मृदा संवर्धनावर जनजागृती कार्यक्रम



**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालय, चांदूर रेल्वे येथील उन्नत भारत अभियानाच्या (UBA) वतीने 'पाणी वाचवा, माती वाचवा, भविष्य सुरक्षित करा' या संकल्पनेवर आधारित जल व मृदा संवर्धन जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र प्रयोगशाळेत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तलोकार होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मीनल केचे आणि पाटील उपस्थित होते. कार्यक्रमात बी.एस्सी. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी प्राची कराडे हिने 'Save Water, Save Soil, Secure Tomorrow' या विषयावर शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यानातून प्राची कराडे हिने जलसंधारण व मृदासंवर्धनाचे महत्त्व, पाण्याचा योग्य वापर, जलस्रोतांचे संरक्षण,मृदेची धूप रोखणे तसेच भविष्यातील पाणी व अन्नसुरक्षेसाठी मातीचे संवर्धन याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन उन्नत भारत अभियानाचे समन्वयक डॉ. प्रवीण आर. सरदार यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पराग वाडनेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमास एकूण ६० विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांनी जल व मृदा संवर्धनाची शपथ घेतली. 'पाणी वाचवू, माती जपू आणि भावी पिढीसाठी सुरक्षित भविष्य घडवू' असा संकल्प यावेळी करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये जलसंधारण, मृदासंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रभावी संदेश देण्यात आला.

## पी.आर.पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये पोळा सण उत्साहात साजरा



**अमरावती** - पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये भारतीय संस्कृती व परंपरेचे जतन करत पोळा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून उत्साहाने सहभाग नोंदविला.पोळा सणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. शेतकऱ्यांचा खरा मित्र असलेल्या बैलाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सण असून, विद्यार्थ्यांनी बैलांची सजावट करून तसेच विविध सांस्कृतिक उपक्रमांद्वारे पोळा सणाचा आनंद लुटला.या प्रसंगी विद्यार्थ्यांनी पोळ्याविषयी माहिती, गीते व विविध कलात्मक सादरीकरणे करून कार्यक्रमाची शोभा वाढविली. शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना भारतीय सण-उत्सवांचे महत्त्व समजावून सांगितले.या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपल्या ग्रामीण संस्कृतीची व परंपरांची ओळख झाली.पी.आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये पोळा सण अतिशय आनंदी आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

# शहरात तिसऱ्या दारू दुकानाला महिलांचा तीव्र विरोध

## न.प.चे मुख्य अधिकारी यांना निवेदन

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

आम्हाला विकास हवा विनाश नको असा निर्धार व्यक्त करीत जनवादी महिला संघटनेने देशी दारू दुकानाला विरोध करण्याची भूमिका घेतली असून नांदगाव शहरात आधीच दोन देशी दारूचे दुकाने असताना आणखीन नवीन एका तिसऱ्या दुकानाची आवश्यकता काय असा प्रश्न जनवादी महिला संघटनेच्या वतीने मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून उपस्थित करण्यात आला, असून तिसऱ्या देशी दारूच्या दुकानाला ना हरकत देण्यात येऊ नये अशी मागणी महिला संघटनेच्या वतीने करण्यात आली. नांदगाव खंडेश्वर



नगरपंचायत हद्दीत देशी दारूच्या तिसऱ्या दुकानासाठी अर्ज दाखल झाल्याची माहिती समोर आल्यानंतर नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. एकीकडे बेरोजगारी, महागाई, शिक्षणाचा प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या विविध समस्या गंभीर बनलेल्या असताना दुसरीकडे दारूची दुकाने वाढविण्याची गरज काय, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दारू मुळे कुटुंब व्यवस्था महिलांची सुरक्षितता मुलांचे शिक्षण आणि युवकांच्या भवितव्या परिणाम होऊ शकतो ही भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली असून तिसऱ्या दारूच्या दुकानाला ना हरकत परवानगी देऊ नये निवेदन देते वेळी जनवादी महिला संघटनेच्या जिल्हा कोषाध्यक्ष प्रांजल शिंदे आसमा परवीन, शशिकला घोडाम, अलका सुने, अर्चना उईके, माधुरी वड्डी, कविता मसराम, तेजस्विनी शिंदे, कांचन शिंदे, मोनाली शिंदे, जयश्री शिंदे, पूजा शिंदे आदींचा सहभाग होता.

नांदगाव शहरात कुठलाही रोजगार नसल्याने न.प. प्रशासनाने रोजगाराकडे गांभीर्याने लक्ष केंद्रित करावे नांदगाव शहरात वाढलेल्या अवैध दारू व्यवसायाचे विरोधात महिलांची एकजूट करून जनवादी महिला संघटनेच्या नेतृत्वात लढा उभा करणार आहे.

**प्रांजली शिंदे,**
जिल्हा कोषाध्यक्ष,
जनवादी महिला संघटना
नांदगाव खंडेश्वर

# विनोबा शिक्षण उत्सवात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव

## जिल्ह्यातील ७० शिक्षक, २३ केंद्रप्रमुखांसह शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सन्मान

**अमरावती/का.प्र.**

शिक्षण क्षेत्रात समर्पितपणे कार्य करून उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शिक्षक, केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी तसेच शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आयोजित 'विनोबा शिक्षण उत्सव २०२६' उत्साहात पार पडला.अमरावती येथील तेलाई सेलिब्रेशन हॉल, शेगाव–रहाटगाव रोड, अर्जुन नगर येथे हा कार्यक्रम झाला. या उत्सवात जिल्ह्यातील ७० शिक्षक, २३ केंद्रप्रमुख तसेच शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसह एकूण ९३ मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्राला जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, अमरावतीचे वरिष्ठ अधिव्याख्याता पवन मानकर, प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षण विस्तार अधिकारी प्रवीण खांडेकर, अमरावती पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी श्वेता गोळे, दर्यापूरचे गटशिक्षणाधिकारी नंदकुमार जाधव, भातकुलीचे गटशिक्षणाधिकारी रामेश्वर माळवे, अंजनगाव सुर्जीच्या गटशिक्षणाधिकारी शीला आठवले, शिक्षण विस्तार अधिकारी चंद्रशेखर रामटेके, सुनील खडे तसेच चांदूर रेल्वे पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी किरण पाटील उपस्थित होते.

पुरस्कार वितरण कार्यक्रमात अमरावती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी (IAS) यांनी विनोबा उपक्रमाच्या माध्यमातून झालेल्या शैक्षणिक बदलांचा उल्लेख केला. ते म्हणाले, 'विनोबा उपक्रमाच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या शैक्षणिक हस्तक्षेपांमुळे २०२५–२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांच्या वाचन क्षमतेत सुमारे ५३ टक्के वाढ झाली आहे. आता केवळ वाचनावर नव्हे, तर विद्यार्थ्यांना वाचलेल्या मजकुराचा अर्थ समजणे आणि अपेक्षित अध्ययन निष्पत्ती साध्य करणे यावर शिक्षकांनी विशेष लक्ष केंद्रित करावे.'

उत्सवात शैक्षणिक गुणवत्ता, अध्ययन निष्पत्ती आणि विनोबा उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीवर आधारित पॅनल डिस्कशन आयोजित करण्यात आले.या चर्चेत वरूडचे गटशिक्षणाधिकारी विनोद गाडे, नांदगाव खंडेश्वर व चांदूर रेल्वेचे गटशिक्षणाधिकारी प्रसाद संकपाळ, मोर्शी व तिवसाचे गटशिक्षणाधिकारी डॉ. नितीन उंडे, तिवसा पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी चंद्रशेखर रामटेके, शिक्षिका डॉ. सुनीता लहाने आणि शिक्षक अंकुश गावंडे यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाला संदीप बोडखे, गटशिक्षणाधिकारी, २३ केंद्रप्रमुख, ७० शिक्षक, तसेच विनोबा टीमचे अधिकारी व व्यवस्थापक उपस्थित होते. यावेळी विनोबा टीमचे विभागीय व्यवस्थापक अमोल कुकडे, कार्यक्रम व्यवस्थापक रघुनाथ वानखेडे, वरिष्ठ जिल्हा प्रकल्प अधिकारी सागर गजभिये, जीवनकौशल्य व्यवस्थापक नेहा उपासनी यांच्यासह विनोबा टीमचे १६ व्यवस्थापक व प्रकल्प अधिकारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन नेहा उपासनी व अब्दुल शहजाद यांनी केले. प्रास्ताविक रघुनाथ वानखेडे यांनी केले, तर आभार सागर गजभिये यांनी केले. राज्यगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## स्कूलमध्ये 'माझा बाप्पा उत्सव' कार्यशाळा उत्साहात



**अंजनगाव बारी**-विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावतीद्वारा संचालित बडनेरा येथील टायटन्स पब्लिक स्कूलमध्ये 'माझा बाप्पा उत्सव' ही विशेष कार्यशाळा उत्साहात पार पडली. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमधील कलागुण, कल्पकता व सृजनशीलतेला वाव देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेस मार्गदर्शक म्हणून नवनीत प्रकाशनाचे प्रतिनिधी सारंग नागठाणे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शाडूच्या मातीपासून पर्यावरणपूरक व आकर्षक गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. तसेच कागदावर गणपतीचे सुंदर रेखाटन कसे करावे, याचेही सोपे तंत्र विद्यार्थ्यांना शिकविले. यावेळी नवनीत प्रकाशनातर्फे सहभागी सर्व विद्यार्थ्यांना मोफत पुस्तक संच (बुक किट) वितरित करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेतील शिक्षिका रक्षंदा यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल शाळेचे प्राचार्य अजय चौबे यांनी नवनीत प्रकाशन व मार्गदर्शकांचे विशेष आभार मानले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि सृजनशीलतेला चालना मिळते, असे त्यांनी सांगितले. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी सहभागी सर्व बालगोपाळांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

### सभासदांच्या हितासाठी राष्ट्रीय इलेक्ट्रिकल रुरल वर्कर्स सोसायटी कटिबद्ध

# मृत्युंजय व समृद्ध कन्या योजनेतून मदत

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

राष्ट्रीय इलेक्ट्रिकल रुरल वर्कर्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी मर्यादित, अमरावतीची वार्षिक सर्वसाधारण सभा कठोरा रोडवरील रंगोली मंगल कार्यालयात संस्थेचे अध्यक्ष नितीन दादा करडे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

सभेला महापारेषणचे कार्यकारी अभियंता जयंत एदलाबादकर तसेच यज्ञेश क्षीरसागर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.संस्थेच्या सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून मृत्युंजय योजनेतून दिवंगत स्व. सचिन पळसकर यांच्या



कुटुंबीयांना आर्थिक मदतीचे वितरण करण्यात आले. तसेच समृद्ध कन्या योजनेअंतर्गत सभासद सुमित जामठे यांच्या कन्येला प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. सभेच्या कामकाजात संचालक जयंत इंगळे यांनी संस्थेच्या कार्याची प्रस्तावना व आढावा मांडला. सचिव हनुमंत भोंबे यांनी विविध ठरावांचे वाचन केले, तर संचालिका कविता वाकोडे यांनी लेखापाल अहवाल सादर करून संस्थेच्या आर्थिक कामकाजाची माहिती सभासदांसमोर मांडली.

वार्षिक सभेतील सत्कार सोहळा विशेष आकर्षण ठरला. उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत कामगारांचाही गौरव करण्यात आला. तसेच सभासदांच्या कुटुंबातील इयत्ता चौथी, दहावी व बारावीमध्ये गुणवत्तापूर्ण यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी संस्थेचे संचालक सचिन टोपले, अमोलकुमार बोके, संदीप गजभिये व संजय म्हाला यांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे संचालन प्रफुल्ल हेले यांनी केले. संचालिका नंदा गुंबले यांनी आभार मानले. सभेच्या यशस्वी आयोजनासाठी शुभम महल्ले, देवेंद्र लोणारे, प्रज्वल निघोट, जयकुमार निंघोट, माधुरी खारोकर, नंदू झाडे, निलेश अर्डक, राहुल काळे, पुरुषोत्तम दीक्षित, निशांत लव्हाळे, तन्मय राऊत, सागर उघडे, किरणकुमार घाटोळ, किशोर तेलखडे, निलेश राठोड व आशिष पवार यांनी विशेष सहकार्य केले.सभेच्या निमित्ताने सभासद, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये स्नेहभाव वृद्धिंगत झाला. विविध सामाजिक व कर्मचारीहिताच्या उपक्रमांनी समृद्ध झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सांगता स्नेहभोजनाने करण्यात आली.

## मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात पोषण सप्ताह उत्साहात



**अमरावती**-भारतात दरवर्षी सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात राष्ट्रीय पोषण सप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो.विद्यार्थ्यांमध्ये पोषणाबद्दल व आरोग्य चांगले ठेवण्यासाठी आणि त्याबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी असे कार्यक्रम महाविद्यालयात घेण्यात येतात.यावर्षी अन्न व पोषण विभागातर्फे राष्ट्रीय पोषण सप्ताह २०२६ महाविद्यालयात साजरा करण्यात आला. पोषण सप्ताहाची यावर्षीची थीम Discover the power of Nutrition ही होती.प्राचार्य डॉ स्मिता देशमुख मॅडमच्या मार्गदर्शनाखाली तसेच अन्न व पोषण विभागाच्या विभाग प्रमुख प्रा.डॉ.शर्मिला कुबडे यांनी महाविद्यालयात विविध पोषणावर आधारित स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी आयोजित केल्या होत्या.राष्ट्रीय पोषण सप्ताहाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांच्या हस्ते झाले. या विविध स्पर्धेमध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थिनींना प्राचार्यांच्या हस्ते पुस्तक आणि प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. प्रा.कृपाली शेंडोकार यांनी मुद्राविज्ञान या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.प्रत्येक वयात पोषण वेगळे लागते जसे किशोरवयीन मुलींना जास्त लोह लागते त्यासाठी स्नेहल पोळ यांनी विद्यार्थिनींना किशोरावस्थेमधील आहार व आरोग्य यावर मार्गदर्शन केले.

# जिल्हा बँकेतील सत्ताधारी गटाला सर्वोच्च न्यायालयाचा मोठा दिलासा!

## ११३२ सभासदांच्या निर्णयाला स्थगिती; सत्ताधारी संचालक मंडळात उत्साह

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील वैयक्तिक सभासदत्वाच्या प्रश्नावर सुरू असलेल्या दीर्घ न्यायालयीन संघर्षाला आज महत्त्वपूर्ण वळण मिळाले. बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सत्ताधारी संचालक मंडळाने हा लढा सर्वोच्च न्यायालयापर्यंत नेला. सर्वोच्च न्यायालयाने आज उच्च न्यायालयाच्या ११३२ सभासदांसंदर्भातील निर्णयाला स्थगिती दिल्याने बँकेच्या भूमिकेला मोठा न्यायालयीन दिलासा मिळाला आहे. या निर्णयाचे बँकेच्या सभासदांसह अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून स्वागत होत असून सत्ताधारी गटात उत्साहाचे वातावरण आहे.

अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत वैयक्तिक सभासद होण्यासाठी तब्बल ६००० अर्ज प्राप्त झाले होते. बँकेच्या शेअरची रक्कम १० हजार रुपये असल्याने तसेच बँकेच्या उपविधींमध्ये वैयक्तिक सभासद करून घेण्याची तरतूद नसल्याचा आधार घेत कार्यकारी समितीने हे अर्ज नामंजूर केले.

यानंतर सुमारे १३०० अर्जदारांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांच्याकडे अपील दाखल केले. पुढील कायदेशीर प्रक्रियेत ११३२ जणांनी सहकार मंत्र्यांकडे रिव्हिजन दाखल केली. सहकार मंत्र्यांनी रिव्हिजन मान्य करून संबंधित ११३२ जणांना सभासदत्व देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला बँकेने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान दिले. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर बँकेने हा लढा सर्वोच्च न्यायालयात नेला.

सत्ताधारी संचालक मंडळाचे एकत्रित नेतृत्व-

या संपूर्ण न्यायालयीन आणि संस्थात्मक लढ्यात बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली उपाध्यक्ष (पान २ वर)

### ■ 'हा सभासदांच्या विश्वासाचा विजय'

'या संपूर्ण संघर्षात बँकेच्या सत्ताधारी संचालक मंडळाने एकजुटीने बँकेच्या हिताची भूमिका घेतली. सर्वोच्च न्यायालयापर्यंत हा विषय नेण्यासाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळाने घेतलेली भूमिका महत्त्वपूर्ण ठरली. आजचा न्यायालयीन दिलासा हा सामान्य सभासदांचा आत्मविश्वास वाढविणारा आहे. आता पुढील काळात बँकेला अधिक सक्षम, पारदर्शक आणि शेतकरी-केंद्रित बनविण्यावर आमचा भर राहील.'

**-अभिजीत ठेपे, उपाध्यक्ष**



### 'ही लढाई शेतकऱ्यांची, बँकेच्या स्वायत्ततेची आहे'

'अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही कोणत्याही व्यक्तीची किंवा राजकीय गटाची मालमत्ता नाही; ती जिल्ह्यातील शेतकऱ्यांची बँक आहे. बँकेची स्वायत्तता, सभासदांचा विश्वास आणि शेतकऱ्यांचे हित यांच्याशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. आज सर्वोच्च न्यायालयाने दिलेला दिलासा हा आमच्या भूमिकेला मिळालेला न्यायालयीन आधार आहे. बँकेला राजकीय कुरघोड्यांचे केंद्र न बनवता शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे मजबूत केंद्र बनविणे, हेच आमचे व्हिजन आहे.

**-बच्चू कडू,** अध्यक्ष,
अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

### ■ सत्यजित देसाई आणि पराग कडू यांनी सांभाळली न्यायालयीन बाजू-

या महत्त्वपूर्ण न्यायालयीन लढ्यात सीनियर कौन्सिल सत्यजित देसाई आणि ॲड.पराग कडू यांनी सर्वोच्च न्यायालयात अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची न्यायालयीन बाजू प्रभावीपणे सांभाळली. बँकेच्या भूमिकेतील कायदेशीर मुद्दे सर्वोच्च न्यायालयासमोर सक्षमपणे मांडण्यात आले. आज १० सप्टेंबर २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने ११३२ सभासदांसंदर्भातील उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती दिल्याने बँकेच्या सत्ताधारी गटाच्या भूमिकेला महत्त्वपूर्ण बळ मिळाले आहे.

# अमरावती महानगरपालिकेला उच्च न्यायालयाची चपराक

## ३४८ कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे २० कोटी रुपये एका वर्षात अदा करण्याचे आदेश

**अमरावती/प्रतिनिधीः-** ७ व्या वेतन आयोगानुसार पगार, तसेच निवृत्तीचे लाभाच्या थकबाकीची रक्कम मिळावी यासाठी अमरावती महानगर पालिकेचे कर्मचारी हरीषचंद्र कहाळे व इतर यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठापुढे याचिका दाखल केली होती. सदर याचिका मा. न्यायमुर्ती अनिल पानसरे व न्यायमुर्ती निवेदिता मेहता यांच्या समक्ष दि.७-९-२०२६ रोजी सुनावणी झाली असताना उच्च न्यायालयाने अगोदरच अनेक प्रकरणांमधे अमरावती महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना लाभ देण्यासंदर्भात आदेश पारीत झालेले असतांनासुद्धा महानगरपालिकेने इतर कर्मचाऱ्यांना लाभ न दिल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. याचिकाकर्त्याकडून वकील श्रेयस मिलींद वैष्णव यांनी प्रखर युक्तीवाद सादर केला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून न्यायालयाने दि.९-९-२०२६ रोजी सकाळी सुनावणी घेतल्यानंतर पुन्हा दुपारी १२ वाजता सुनावणी घेण्यात येईल व त्या सुनावणीमधे अमरावती महानगरपालिकेने किती सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे लाभ दिलेले नाही याची माहीती सादर करण्यास सांगण्यात आले. त्याप्रमाणे महानगरपालिकेने एकूण ३४८ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे अंदाजे २० कोटी रुपये थकीत असल्याची बाब कबुल केली. दोन्ही पक्षाकडून प्रखर युक्तीवाद करण्यात आला. दोन्ही ही पक्षाची बाजु नीट ऐकून घेतल्यानंतर कोर्टाने अमरावती महानगरपालीकेला सदर सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे लाभ किती दिवसात देण्यात येतील या संदर्भात स्पष्ट प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले. उच्च न्यायालयाने घेतलेल्या कठोर भुमिकेमुळे अमरावती महानगरपालीकेने त्या सर्व ३४८ कर्मचाऱ्यांचे लाभ एका वर्षाच्या आत अदा करण्यात येतील असे प्रतिज्ञापत्र (पान २ वर)



# बारमधील चोरी दोन तासांत उघड -विधी संघर्षीत बालक ताब्यात

## टॅब, मोबाईलसह ५२ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**अमरावती/प्रतिनिधीः-** वेलकम टी पॉईंटजवळील हॉटेल ब्ल्यु कैसल बारमध्ये झालेल्या चोरीचा गुन्हा गाडगेनगर पोलिसांच्या डी.बी. पथकाने अवघ्या दोन तासांत उघड केला. या प्रकरणात एका विधी संघर्षीत बालकाला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याकडून चोरीचा Lenovo कंपनीचा टॅब, Realme कंपनीचा मोबाईल आणि सात हजार रुपये रोख, असा एकूण ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हॉटेल ब्ल्यु कैसल बारचे व्यवस्थापक शुभम राजुसिंग कोरे (वय ३०) यांनी ९ सप्टेंबर रोजी गाडगेनगर पोलीस ठाण्यात चोरीची तक्रार दिली. ८ सप्टेंबर रोजी रात्री बार बंद करून घरी गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी चोरी झाल्याचे निदर्शनास आले. बारमधून Lenovo कंपनीचा टॅब, Realme कंपनीचा (पान २ वर)



# पोळयाच्या दिवशी पोहण्यासाठी गेलेल्या तरुणाचा पूर्णा नदीत बुडून मृत्यू



**खल्लार/प्रतिनिधीः-** पोळ्याच्या दिवशी मित्रांसोबत पूर्णा नदीपात्रात आंघोळीसाठी गेलेल्या १७ वर्षीय तरुणाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना कुकसा येथील पूर्णा नदीपात्रात आज (दि.१०) दुपारी एक वाजच्या सुमारास घडली. अमित संतोष तायडे (वय १७) रा. कळाशी असे मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेमुळे कळाशी गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

अमित तायडे हा आपल्या मित्रांसोबत कुकसा येथील पूर्णा नदीपात्रात आंघोळ करण्यासाठी गेला होता. नदीपात्रात मित्रांसोबत पोहत असताना अमितने पाण्यात उडी घेतली. मात्र, पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तो अचानक पाण्यात बुडाला.

अमित (पान २ वर)

### मोक्का व एनडीपीएस प्रकरणातील

# फरार आरोपी ताब्यात



### गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** चंद्रपूर जिल्ह्यातील मोक्का आणि एनडीपीएस कायद्यांतर्गत नोंद झालेल्या गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपीला शहर गुन्हे शाखेच्या पथकाने मोठी कारवाई करत अटक केली आहे. आरोपी गेल्या काही दिवसांपासून ओळख लपवून नागपुरी गेट ठाणे क्षेत्रात लपून बसला होता. जुबेर खान करीम खान (पान २ वर)

# दुष्काळाच्या सावटात बळीराजाला धीर

## सदाभाऊ खोतांचा यवतमाळमध्ये शेतकऱ्यांसोबत पोळा

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** जिल्ह्यावर सध्या दुष्काळाचे गंभीर सावट घोंघावत आहे. पावसाने ओढ दिल्याने आणि पिकांची स्थिती नाजूक असल्याने बळीराजा मोठ्या आर्थिक व मानसिक विवंचनेत सापडला आहे. अशा या संकटकाळात शेतकरी खचून जाऊ नये आणि त्याला भक्कम मानसिक आधार मिळावा, या मुख्य उद्देशाने नेते सदाभाऊ खोत यांनी आज, बैलपोळ्याच्या दिवशी यवतमाळ जिल्ह्याचा विशेष दौरा केला.



या दौऱ्यादरम्यान त्यांनी दारव्हा तालुक्यातील किन्हीवळगी या गावाला प्रत्यक्ष भेट दिली. ऐन सणाच्या दिवशी दुष्काळी परिस्थितीमुळे गावात चिंतेचे वातावरण असताना, खोत यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांना धीर दिला. संकटे येतच असतात, मात्र (पान २ वर)

# एअरटेल चे नेटवर्क जुळया शहरात ठप्प

**अचलपूर/प्रतिनिधीः-** एअरटेल ची सुविधा अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात १० सप्टेंबर रोजी तांत्रिक अडचणी मुळे विस्कळीत झाली होती. प्राप्त माहितीनुसार ,सकाळी ११ ते संध्याकाळी ७ पर्यंत संपूर्ण सेवा बंद होती. अंजनगाव सुर्जी मार्गावरील एअरटेल नेटवर्कची फायबर वायर तुटल्याने काल सेवा बंद झाली होती.यामुळे ग्राहकांना याचा मोठा फटका बसला आहे. एकीकडे ही तांत्रिक अडचण लवकर मार्गी लावणे अपेक्षित होते.मात्र ८ तास एअरटेल ची सेवा बंद होती .यामुळे मोबाईल नेटवर्क आणि वायफाय सुविधा ही बंद होती.

# मोटारसायकल चोरीचा गुन्हा उघड

## येवद्यातील तरुणाकडून पल्सर जप्त

अमरावती/प्रतिनिधीः- जिल्ह्यातील वाढत्या मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेने एका मोटारसायकल चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. पोलिसांनी विजय ऊर्फ गजानन प्रभुदास रायबोले (वय २३, रा. इंदिरानगर, येवदा, ता. दर्यापूर) याला ताब्यात घेत त्याच्याकडून सुमारे ८५ हजार रुपये किमतीची बजाज पल्सर मोटारसायकल जप्त केली.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी मोटारसायकल चोरीच्या घटनांचा समांतर तपास करून गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार ९ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दर्यापूर-अंजनगाव उपविभागात रेकॉर्डवरील आरोपींची तपासणी करीत होते.



यावेळी येवदा येथील विजय ऊर्फ गजानन रायबोले याने काळ्या रंगाची मोटारसायकल चोरी करून लपवून ठेवल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली.

माहितीच्या आधारे पोलिसांनी रायबोले याला ताब्यात घेऊन चौकशी केली. पोलिसांच्या माहितीनुसार, त्याने ऑगस्ट २०२५ मध्ये दर्यापूर तालुक्यातील खुर्माबाद येथून सदर मोटारसायकल चोरी केल्याचे सांगितले. ही मोटारसायकल येवदा येथील शासकीय रुग्णालयात ठेवली असल्याची माहितीही त्याने दिली. त्यानंतर पोलिस पथकाने शासकीय रुग्णालय, येवदा येथे पाहणी केली असता तेथे काळ्या रंगाची बजाज पल्सर मोटारसायकल आढळून आली. तिचा क्रमांक एमएच (पान २ वर)

# ४ दिवसापासून बेपत्ता युवकाचा विहिरीत आढळला मृतदेह

### अंजनसिंगी गावात खळबळ

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** तालुक्यातील अंजनसिंगी गावात खळबळ उडवणारी घटना समोर आली आहे. गेल्या चार दिवसांपासून बेपत्ता असलेल्या १८ वर्षीय युवकाचा मृतदेह आज गुरुवार १० सप्टेंबर रोजी गावाच्या शेत शिवारातील विहिरीत आढळून आल्याने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. माहितीनुसार, अंजनसिंगी येथील रहिवासी आकाश गजानन सहारे (वय १८) हा ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास घरातून निघून गेला होता. तो घरी परत न आल्याने कुटुंबीयांनी त्याचा सर्वत्र शोध घेतला. नातेवाईक, मित्र-मंडळींकडे चौकशी करूनही त्याचा थांगपत्ता लागला नाही.अखेर त्याच्या वडिलांनी कुऱ्हा पोलीस स्टेशन गाठून मुलगा बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. पोलिसांनी बेपत्ता प्रकरणाची नोंद करून तपास सुरू केला होता. मात्र चार दिवस उलटूनही आकाशचा कोणताही सुगावा लागत नव्हता.गुरूवारी सकाळी अंजनसिंगीच्या शेतशिवारातील (पान २ वर)



# कुख्यात गुंड शेख सलमानवर एमपीडीए

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी सण- उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस आयुक्तालयाने गुन्हेगारांविरोधात धडक मोहीम सुरू केली आहे. या अंतर्गत पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशान्वये शहरातील सराईत आणि कुख्यात गुन्हेगार शेख सलमान शेख अतीक (वय २८, रा. यास्मीन नगर) याच्यावर एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबद्ध कारवाई करून मध्यवर्ती कारागृहात पाठवण्यात आले आहे. आरोपी शेख सलमान (पान २ वर)



# माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी मातोश्रींसह केले बैलांचे विधिवत पूजन

### -पोळा सण उत्साहात साजरा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शेतकऱ्यांचा सच्चा साथीदार आणि बळीराजाचे दैवत असलेल्या सर्जा-राजाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा बैलपोळा हा सण सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या मंगल दिनाचे औचित्य साधून राज्याच्या माजी मंत्री तथा आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी आपल्या निवासस्थानी बैलांचे विधिवत पूजन करून पोळा साजरा केला.



या प्रसंगी त्यांच्या मातोश्री पुष्पमालाताई ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी व ॲड. यशोमती ठाकूर यांनी परंपरेनुसार बैलांना ओवाळून, शाल-माळ घालून त्यांची पूजा केली आणि पुरणपोळीचा नैवेद्य भरवला.

यावेळी बोलताना ॲड. यशोमती ठाकूर म्हणाल्या की, 'आपली संस्कृती ही कृषीप्रधान संस्कृती आहे. वर्षभर शेतात राबणाऱ्या (पान २ वर)

# खल्लार येथे बैलपोळा उत्साहात साजरा

### उत्कृष्ठ व आकर्षक बैलजोडीला बक्षीस

**खल्लार/प्रतिनिधीः-** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शेतकऱ्यांचा महत्वाचा सण असलेला बैलपोळा खल्लार येथील मुख्य बाजार चौकात मोठया उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला.



खल्लार ग्रामपंचायतच्या वतीने बैलपोळ्यात सहभागी असलेल्या जोळ्यापैकी आकर्षक व उत्कृष्ठ सजावट केलेल्या बैलजोडीला बक्षीस दिल्या जाते. यावर्षी ग्रामपंचायतच्या वतीने दिले जाणारे पहिले १२५१ रुपये बक्षीस भाऊराव (पान २ वर)

# जुळया शहरात बैलपोळा साजरा



**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात सालाबादाप्रमाणे यंदाही बैलपोळा उत्साहात साजरा झाला.परतवाडा शहरातील जयस्तंभ चौक परिसरात बैलजोड्याचा पोळा भरतो.यावेळी अनेक बैलजोड्या सहभागी झाल्या होत्या .जुळ्या शहरात (पान २ वर)